सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, ०४ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २५० | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर आज शिक्कामोर्तब

### उद्याच्या शपथविधी सोहळ्याची जय्यत तयारी



**'या' मुख्यमंत्र्यांना आमंत्रण**

योगी आदित्यनाथ उत्तर प्रदेश, चंद्राबाबू नायडू -, आंध्रप्रदेश, नितीन कुमार - बिहार, प्रेमा खांडू -, अरुणाचल प्रदेश हिमंत बिश्व शर्मा आसाम, विष्णूदेव साय - छत्तीसगढ, प्रमोद सावंत - गोवा, भूपेंद्र पटेल - गुजरात, नायब सिंह सैनी - हरियाणा, मोहन यादव - मध्य प्रदेश, कॉनराड संगमा - मेघालय भजनलाल शर्मा - राजस्थान,मानिक साहा - त्रिपुरा, पुष्कर सिंह धामी - उत्तराखंड,

**निमंत्रित संत महंत :**

नरेंद्र महाराज नानीज, नामदेव शास्त्री, भगवानगड, राधानाथ स्वामी महाराज, गौरांगदास महाराज, इस्कॉन, जनार्दन हरीजी महाराज , प्रसाद महाराज अंमळनेरकर महानुभाव संप्रदायाचे विध्वंस बाबा आणि मोहन महाराज, जैन मुनी लोकेश,

**'एक है तो सेफ है'चे १० हजार टी शर्ट**

विधानसभा निवडणुकीत भाजपने 'एक है तो सेफ है'चा नारा दिला होता. आता महायुतीच्या शपथविधीतही 'एक है तो सेफ है' ही घोषणा लिहिलेले दहा हजार टी-शर्ट भाजप कार्यकर्ते परिधान करणार आहेत. यावेळी मराठी संगीतासह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेदेखील आयोजन करण्यात आले आहे.

तभा वृत्तसेवा जमीर काझी

मुंबई, दि.३ डिसेंबर : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक जागा जिंकलेल्या भाजपाच्या विधिमंडळ नेत्याची बुधवारी निवड होणार आहे. नवनिर्वाचित आमदारांची सकाळी दहा वाजता विधानभवनातील सेंट्रल हॉल मध्ये बैठक होणार आहे . त्याची मते आजमावून घेण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण व गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपानी हे निरीक्षक म्हणून आज मुंबईत दाखल झाले आहेत. नेता निवडीनंतर लगेचच शिष्टमंडळ राज्यपालांना भेटून सत्ता स्थापन करण्यासाठी दावा दाखल करणार आहे.. मुख्यमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीस यांचे नाव निश्चित आहे त्यावर उद्या शिक्कामोर्तब होईल असे सांगण्यात आले,

दरम्यान, गुरुवारी होणाऱ्या शपथविधी सोहळ्यासाठी आजार मैदानावर जय्यत तयारी सुरू आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या सोहळ्यासाठी भाजपाचे देशभरातील ज्येष्ठ नेते व अनेक राज्याचे मुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत .आज महायुतीच्या नेत्यांनी मैदानाची पाहणी करून तयारी पाहिली

विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमत मिळाल्यानंतरही दहा दिवस उलटूनही अद्याप सरकार स्थापन करण्यात आलेली नाही एकनाथ शिंदे हे पुन्हा मुख्यमंत्री पदासाठी इच्छुक असल्याने सुरुवातीची काही दिवस त्यांची समजूत काढण्यात गेले त्यानंतर त्यांनी गृह व अन्य महत्वपूर्ण खात्याची मागणी केल्याने भाजपाचा त्याला विरोध आहे त्यामुळे माहितीची खात्यावर बाबतचे फॉर्मुल्यावर अद्याप बैठक झालेली नाही काळजीवाहू मुख्यमंत्री शिंदे हे दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतल्यानंतर मुंबईत ना थांबता दोन दिवस साताऱ्यात त्यांच्या दरे या जन्मगावी विश्रांतीसाठी गेले होते त्या ठिकाणी तब्येत बिघडल्याने त्यांनी कोणत्याही बैठकीत सहभाग घेतलेला नव्हता रविवारी ठाण्यात परतल्यानंतर घशाचा संसर्ग व ताप असल्याने ते घरीच थांबून होते. त्यानंतर आज ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये जाऊन सर्व चाचण्या करून घेतल्या त्यामध्ये सर्व काही नॉर्मल असल्याचे प्रतिक्रिया त्यांनी पत्रकारांना दिली.

दरम्यान गुरुवारी सायंकाळी पाच वाजता शपथविधी होणार असल्याने सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. त्यावर बुधवारी विधानसभेचा नेता निवडल्यानंतर होईल असे भाजपाच्या गोटातून सांगण्यात आले. त्यासाठी भाजपाचे सर्व नवनिर्वाचित आमदार मुंबईत दाखल झाले आहेत. शपथविधी सोहळ्यासाठी १९ राज्याच्या मुख्यमंत्र्यांनाही शपथविधी सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले आहे. तसेच सोहळ्याला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण, अशोक चव्हाण, सुशिलकुमार शिंदे यांना देखील निमंत्रीत केले जाणार आहे. तर केंद्र सरकारमधील पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रामदास आठवले यांच्यासह महत्वाचे केंद्रातील पाच मंत्री देखील या सोहळ्याला हजेरी लावणार आहेत.

## शपथविधीची तयारी पण शिंदे पडलेत आजारी, उद्याच होणार सर्व घडामोडी



मुंबई : महायुती सरकारचा शपथविधी अवघ्या काही तासांवर येऊन ठेपला आहे. महाराष्ट्राचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बरं वाटत नसल्याने ते आज दुपारी ठाणे येथील ज्युपिटर रुग्णालयात दाखल झाले. ज्युपिटर रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले. एकनाथ शिंदे यांचं चेकअप केल्यानंतर ते काही वेळाने रुग्णालयातून बाहेर पडले. यानंतर ते रस्ते मार्गाने मुंबईच्या दिशेला रवाना झाले.

एकनाथ शिंदे यांना ताप आला होता. तसेच त्यांच्या पांढऱ्या पेशी वाढल्याची माहिती आहे. तसेच त्यांच्या घशात संसर्ग झाल्याची माहिती आहे. गेल्या काही दिवसांपासून शिंदे आजारी आहेत. आजारपणामुळे एकनाथ शिंदे हे दरे या त्यांच्या मूळगावी गेले होते तेव्हा त्यांची तब्येत जास्त बिघडली होती. यानंतर ते मुंबईत परतले होते. तरीसुद्धा त्यांची प्रकृती सुधारली नव्हती. त्यानंतर ते ठाण्यातील त्यांच्या निवासस्थानी आराम करत आहेत. काल रात्री भाजप नेते गिरीश महाजन यांनी एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी जावून भेट घेतली. त्यावेळी शिंदे यांना सलाईन लावली होती, अशी माहिती गिरीश महाजनांनी नंतर माध्यमांना दिली होती. मिळालेल्या माहितीनुसार एकनाथ शिंदे यांची तब्येत अद्यापही ठीक नसल्याची माहिती समोर आली आहे.

एकनाथ शिंदे यांना गेल्या काही दिवसांपासून ताप येत आहे. त्यामुळे त्यांची डेंग्यू आणि मलेरियाची टेस्ट करण्यात आली होती. मात्र, या दोन्ही चाचण्या निगेटिव्ह आल्या आहेत. मात्र, पांढऱ्या पेशी कमी जास्त होत असल्याने अजूनही त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. सतत येणाऱ्या तापामुळे अँटी बायोटिक औषधे सुरु आहेत. त्यामुळे एकनाथ शिंदे यांना सध्या अशक्तपणा जाणवत असल्याचे डॉक्टरांचे म्हणणं आहे. डॉक्टरांनी एकनाथ शिंदे यांची प्रकृती सुधारत असल्याचेही सांगितले. परंतु, डॉक्टरांनी एकनाथ शिंदे यांना तुर्तास आराम करण्याचा सल्ला दिला आहे. ज्युपिटर रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांकडून एकनाथ शिंदे यांच्यावर सध्या उपचार सुरु आहेत.

महायुती सरकारचा ५ डिसेंबरला दुपारी ५ वाजता शपथविधी पार पडणार आहे. त्यासाठी महायुतीच्या नेत्यांनी बुधवारी सकाळी एकत्रितपणे आझाद मैदानातील शपथस्थळाची पाहणी केली. यावेळी चंद्रशेखर बावनकुळे, संजय शिरसाट, धनंजय मुंडे हे उपस्थित होते. भाजपचे केंद्रीय निरीक्षक आज संध्याकाळी मुंबईत दाखल होणार आहेत. गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन पुढील काही तासांमध्ये मुंबईत पोहोचतील. विजय रुपाणी सायंकाळी ७. ३० वाजता, तर निर्मला सीतारामन रात्री ९. ३० वाजता मुंबईत पोहोचणार आहेत. मुंबईतील ओबेरॉय हॉटेलमध्ये दोघे नेते वास्तव्यास असतील. ४ डिसेंबरला दोन्ही निरीक्षक भाजप आमदारांची बैठक घेणार आहेत. या बैठकीत भाजप विधीमंडळ गटनेत्याची निवड होईल.

## गोव्यात नौसेनेच्या पाणबुडीला मासेमारी बोटीची धडक; दोन खलाशांचा मृत्यू

पणजी : अरबी समुद्रात मासेमारी बोट आणि नौसेनाची पाणबुडी यांची धडक होऊन दोन खलाशांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या अपघाताप्रकरणी आता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघातात नौसेनेच्या पाणबुडीचं कोट्यवधी रुपयांचं नुकसान झालं आहे. या प्रकरणी मासेमारी बोटीवरील तांडेल विरोधात यलो गेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बोटीवरील दोन्ही खलाशांचे मृतदेह पोलिसांनी ताब्यात घेऊन जेजे रुग्णालय येथे पाठविण्यात आले असून मृतदेहाची ओळख पटविण्यात येत आहे. ही धडक गोवा किनारपट्टी जवळील अरबी समुद्रात रात्रीच्या सुमारास झाली.



मिळालेल्या माहितीनुसार, कर्नाटक येथील कारवार बंदरातून भारतीय नौसेनेची आय.एन.एस. करंजा ही पाणबुडी २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पैरीस्कोप डेप्थ मेंटेन करुन गोव्याच्या तटावरुन वेगाने जात होती. दरम्यान पाणबुडीच्या उजव्या बाजुस एक मासेमारी बोट दोन ते तीन किलोमीटर अंतरावर दिसून आली, सदर मासेमारी बोट एका जागेवर उभी होती. प्रकाश फार कमी असल्यामुळे समोरची बोट स्पष्ट दिसत नव्हती.

भारतीय नौसेनेचे कार्यकारी अधिकारी कमल प्रीत यांनी सांगितले की, मासेमारी बोटीचे ऑटोमेटीक आयडेन्टीफिकेशन सिस्टम काम करत नव्हते. त्यामुळे मासेमारी नौकेचा वेग, स्थान, दिशा, नाव समजून येत नव्हते.

दोन्ही बोटींमध्ये सुरक्षित अंतर राखून एन.एस. करंजा पाणबुडीने दिशा बदलून आपला वेग कायम ठेवला. पाणबुडीने मासेमारी बोटीपासून वाचण्याचे सर्व प्रयत्न करुनही ती मासेमारी बोट पाणबुडीला धडकली आणि समुद्रात पलटी होऊन बुडाली. ही धडक गोव्याजवळील अरबी समुद्रात रात्रीच्या सुमारास झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. या अपघातात मासेमारी बोटीवरील २ खलाशांचा मृत्यू झाला. या अपघातात बेपत्ता झालेल्या खलाशांचा मृतदेह २८ नोव्हेंबरला सापडला. यानंतर हे मृतदेह पोलिसांनी ताब्यात घेऊन जेजे रुग्णालयात पाठवले असून मृतदेहाची ओळख पटवण्यात येत आहे. या अपघातात नौसेनेच्या पाणबुडीचे जवळपास १० कोटी रुपयांचे नुकसान झाले. ११ खलाशांच्या दुखपतीला आणि दोन खलाशांच्या मृत्यूला कारणीभूत असल्यामुळे मासेमारी बोटीवरील तांडेल विरुद्ध यलो गेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी यलोगेट पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

## इम्रान खान आणि पत्नी बुशरा यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी

लाहोर : पाकिस्तानच्या दहशतवादविरोधी न्यायालयाने माजी पंतप्रधान इम्रान खान, (खीरप घहरप) त्यांची पत्नी बुशरा बीबी, खैबर पख्तूनख्वाचे मुख्यमंत्री अली अमीन गंडापूर आणि इतर ९३ जणांविरुद्ध अजामीनपात्र अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे. इस्लामाबादमध्ये येथे गेल्या आठवड्यात माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या पक्षाच्या समर्थकांनी निदर्शने केली होती.

निदर्शनांदरम्यान हिंसाचार, दंगल आणि इतर गुन्ह्यांच्या आरोपांना उत्तर म्हणून हे वॉरंट जारी करण्यात आले आहे. न्यायालयाच्या या निर्णयानंतर इम्रान खान यांच्या अडचणीत आणखी वाढ होणार आहे. गेल्या



२४ नोव्हेंबर रोजी देशव्यापी निदर्शनासाठी पाकिस्तान तेहरीक-ए-इन्साफ (पीटीआय) चे संस्थापक इम्रान खान यांनी 'करो किंवा मरो'चा नारा दिला होता.

२०२३ पासून तुरुंगात असलेले पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांनी १३ नोव्हेंबर रोजी २४ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या देशव्यापी निषेधाची अंतिम घोषणा केली होती.यावेळी पार्टीच्या समर्थकांनी इम्रान खान आणि इतर नेत्यांची तुरुंगातून सुटका, आठ फेब्रुवारीच्या निवडणुकीत पीटीआयच्या विजयाची मान्यता आणि २६ वी घटनादुरुस्ती रद्द करण्याची मागणी केली होती.

दरम्यान, २६ व्या घटनादुरुस्तीने न्यायाधीश आणि सरन्यायाधीशांच्या नियुक्तीची प्रक्रिया बदलली आहे. पक्षाच्या म्हणण्यानुसार, इस्लामाबादमधील मुख्य निदर्शने हाणामारीत संपली. यामध्ये १२ पीटीआई समर्थकांचा मृत्यू झाला. तर शेकडो जणांना अटक करण्यात आली आहे इस्लामाबाद पोलिसांनी ९६ संशयितांची यादी राजधानी स्थित दहशतवाद विरोधी न्यायालयाला सादर केली, ज्यात पक्षाचे प्रमुख नेते इम्रान खान, बुशरा बीबी, अली अमीन गंडापूर, माजी अध्यक्ष आरिफ अल्वी, नॅशनल असेंब्लीचे माजी अध्यक्ष असद कैसर, पक्षाचे अध्यक्ष गौहर खान, नॅशनल असेंब्लीतील विरोधी पक्षनेते उमर अयुब खान आणि इतर अनेक नेत्यांच्या नावांचा समावेश होता.

इस्लामाबाद पोलिसांनी या सर्वांविरुद्ध अटक वॉरंट जारी करण्याची विनंती न्यायालयाला केली होती आणि एटीसी न्यायाधीश ताहिर अब्बास सिप्रा यांनी त्यांची विनंती मान्य केली. निदर्शनांनंतर दाखल करण्यात आलेल्या एफआयआर मध्ये पाकिस्तान दंड संहिता, दहशतवादविरोधी कायदा आणि शांततापूर्ण असेंब्ली आणि सार्वजनिक सुव्यवस्था कायद्याच्या विविध कलमांचा समावेश आहे.

## निवडणूक आयोगाचे बिंग न फुटण्यासाठी मारकडवाडीत

### मतपत्रिकेवरील मतदानास मज्जाव : नाना पटोले

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. ३ डिसेंबर :

विधानसभा निवडणुका पारदर्शक पद्धतीने पार पडल्या नाहीत अशी राज्यातील जनतेला शंका असल्यानेच विविध मार्गाने ईव्हीएम व निवडणूक आयोगाच्या कारभाराचा पंचनामा जनता करत आहे. सोलापूर जिल्ह्यातील मारकडवाडी ग्रामस्थांनी मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्याची तयारी केली होती पण पोलीस प्रशासनाने बळाचा वापर करून गावक-यांना मतदान करु दिले नाही. निवडणूक आयोगाचे बिंग फुटेल म्हणूनच गावकऱ्यांना मतपत्रिकेवर मतदान करु दिले नाही का?, असा हल्लाबोल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

ते म्हणाले की, मारकडवाडीमध्ये प्रशासन अत्याचारी ब्रिटिशांप्रमाणे वागले, त्यामुळे ईव्हीएम आणि निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेवर जे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे ते अधिक गडद झाले आहे. 'कर नाही तर डर कशाला?' याप्रमाणे प्रशासनाने हे मतदान पार पडू द्यायला हवे होते, पण भाजपा सरकारच्या काळात सर्व सरकारी यंत्रणाच दबावाखाली काम करत आहे. त्यामुळे सोलापूर पोलिसांनी 'वरून' आलेल्या आदेशाची फक्त अंमलबजावणी केली. मारकडवाडीत प्रशासकीय यंत्रणेच्या माध्यमातून जनतेचा आवाज दाबण्याचाच प्रकार झाला आहे आणि हाच लोकशाही व संविधानाचा खून आहे.

निवडणुक प्रक्रियेदरम्यान गैरप्रकाराच्या अनेक तक्रारी निवडणूक आयोगाकडे केलेल्या आहेत. काँग्रेसनेही सातत्याने निवडणुकीतील गैरप्रकाराच्या तक्रारी केल्या. पण निवडणूक आयोग 'कुंभकर्णी' झोपेतून जागे झाले नाही. आयोग फक्त नावालाच स्वायत्त संस्था उरली असून आज ते भाजपाच्या हाताखालचे कठपुतली बाहुले झाले आहे का? असा प्रश्न जनता विचारत आहे. मारकडवाडीच्या ग्रामस्थांनी लोकशाहीच्या रक्षणार्थ एका मोठ्या लढ्याची सुरुवात केली आहे. काँग्रेस पक्ष या लढाईत मारकडवाडीच्या ग्रामस्थांसोबत आहे. या लढ्याचे आगामी काळात मोठ्या युद्धात रुपांतर होऊन हुकूमशाही हरेल व लोकशाहीचाच विजय होईल, असा विश्वासही पटोले यांनी व्यक्त केला आहे.

## जळगावात भीषण अपघात, दाम्पत्याचा जागीच मृत्यू

जळगाव : पारोळा तालुक्यातील म्हसवे गावाजवळील लोणी गावाकडे जाणाऱ्या वळणावर राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या अपघातात दापंत्य ठार झाल्याची घटनास्थळी घडली. भरधाव वेगाने येणाऱ्या कारने समोरून येणाऱ्या कारला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघातात कारमधील दाम्पत्य जागीच ठार झाल्याची घटना घडली आहे.

सुधीर देवीदास पाटील (वय ४८) आणि त्यांची पत्नी ज्योती सुधीर पाटील (वय ४४) दोन्ही रा. लोणी ता. पारोळा ह.मु. गुजरात राज्य असे मयत झालेल्या दाम्पत्याची नावे आहे. पारोळा तालुक्यातील लोणी गावातील रहिवाशी असलेले सुधीर पाटील हे आपल्या पत्नी ज्योती पाटील यांच्यासह गुजरात राज्यात वास्तव्याला होते.

महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग

# जिल्हा रुग्णालय हिंगोली

एकत्रीत आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

निरोगी, सदृढ जीवन हेच जीवनाचे सार, जन आरोग्य योजनेने होईल ते साकार"

"1356 आजारांवर योजनेच्या अंगिकृत रुग्णालया मध्ये 5 लाखा पर्यंत मोफत वैद्यकीय उपचार"

**लाभ घेण्यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे**

- मुळ राशन कार्ड ( पिवळे/ केशरी/ पांढरा/ अंत्योदय / अन्नपुर्णा)
- मुळ ओळखपत्र कुटुंब प्रमुख व रुग्णाचे ( आधार कार्ड/ मतदान कार्ड/ ड्राईव्हीग लाईसन्स/ पॅन कार्ड व शासकीय कोणातेही ओळखपत्र
- आयुष्मान भारत कार्ड असल्यास ते सोबत असावे
- सहा वर्षा खालील असलेले बालकांना लाभ घेण्यासाठी
  - लहान बाळाचा जन्म दाखला
  - बाळाचे आई व वडील यांच्या सोबात फोटो
  - जन्म दाखला नसल्यास तलाठी/ ग्रामसेवक यांचे प्रमाणपत्र व आई वडीलांचे शपथपत्र

**महत्वाच्या सुचना**

- शिधापत्रिका मुळ स्वरुपात असणे आवश्यक आहे
- शिधापत्रिका फाटलेली असल्यास नाव न शिधापत्रिका क्रमांक स्पष्ट असावा किंवा तहसिलदारा मार्फत देण्यात आलेले प्रमाणपत्र असावे
- शिधापत्रीका मध्ये काही खाडाखोड असु नये. खाडाखोड असल्यास तहसिलदारा मार्फत देण्यात आलेले प्रमाणपत्र असावे
- कुटुंब प्रमुख मयत असल्यास शिधा पत्रिका हस्तांतरित केलेली असावी
- शिधापत्रिका क्रमांक स्पष्ट ओळखता येण्यासारखा व मुळ शिक्का असलेलाच असावा
- शिधापत्रीकेवर तहसिल कार्यालयात ऑनलाईन केलेली बारा अंकी क्रमांक असावा

| मा. डॉ.मोहसिन खान | मा. डॉ. मानिष बगडिया | मा. डॉ. नितीन तडस |
|---|---|---|
| जिल्हा समन्वयक,महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना जि.हिंगोली | नोडल अधिकारी, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना जिल्हा रुग्णालय, हिंगोली | जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, हिंगोली |

अधिक माहिती साठी आरोग्यमित्राशी संपर्क साधावा.

नि:शुल्क दुरध्वनी क्रमांक 14555/1800 111 565 155 388/1800 23322 200

## बाउमा कॉनएक्सपो इंडिया२०२४: भारताच्या पायाभूत विकास स्वप्नांना एका सामरिक शक्तीने आकार देणे

मुंबई- भारताच्या पायाभूत विकासाच्या क्षेत्रात, जिथे दृष्टी आणि अंमलबजावणी एकत्र येते, तिथे बाउमा कॉनएक्सपो इंडिया सारख्या काही व्यासपीठांचे प्रभाव कधीही कमी होत नाही. २०२४ च्या या प्रमुख व्यापार प्रदर्शनाचे आयोजन ११ ते १४ डिसेंबर २०२४ दरम्यान इंडिया एक्सपो सेंटर, ग्रेटर नोएडा येथे होणार आहे. या प्रदर्शनाद्वारे केवळ अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रदर्शन केले जाणार नाही, तर बांधकाम आणि खाण उद्योगांच्या भविष्यात नवीन दिशा देखील दिल्या जातील. भारताच्या पायाभूत विकासाचे पारिस्थितिकी तंत्र एक महत्त्वाच्या टप्प्यावर आहे. जीडीपीत वाढत्या बांधकाम आणि शहरीकरणाच्या योगदानामुळे, विविध उद्योगांसाठी यातले धोके आणि संधी कधीही अधिक असू शकतात. बाउमा कॉनएक्सपो इंडिया २०२४ हे १०० हून अधिक देशांमधून ७५,००० हून अधिक व्यापारिक पाहुण्यांना आणि १,००० पेक्षा जास्त प्रदर्शकांना एकत्र आणण्याचे आश्वासन देणारे एक रणनीतिक व्यासपीठ ठरते. हे वर्ल्ड क्लास तंत्रज्ञान आणि ग्लोबल सहयोगाद्वारे या महत्त्वपूर्ण क्षेत्राच्या बदलत्या चेहऱ्याचे प्रतिनिधित्व करते.

## नावीन्यपूर्ण मल्टी असेट अलोकेशन फंड लाँच

छत्रपती संभाजीनगर - सॅम्को असेट मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने आज मल्टी असेट अलोकेशन फंडची (एमएएएफ) न्यू फंड ऑफर जाहीर केली असून, हा फंड ४ डिसेंबर रोजी खुला होणार असून, १८ डिसेंबर २०२४ रोजी बंद होणार आहे. हा फंड धोरणात्मक पद्धतीने इक्विटी, सोने आणि डेट/अर्बिट्रेजमध्ये रोटेट होणार असून, त्यामुळे परतावे वाढतील व जोखीम कमी होईल. या योजनेची किमान अर्ज रक्कम ५,००० रुपये आहे. प्रमुख आर.ओ.टी.ए.टी.ई. धोरणासह या फंडामध्ये प्रामुख्याने इक्विटी तेजीत असताना, प्रामुख्याने इक्विटी मोडमध्ये रोटेट करण्याची क्षमता या फंडामध्ये आहे, तर इक्विटी मंदावल्यानंतर सोने उत्कृष्ट कामगिरी करत असल्यास तो सोन्यात रोटेट करतो. इक्विटी आणि सोने दोन्ही घसरत असल्यास डेट/अर्बिट्रेज मोडमध्ये रोटेट करून गुंतवणुकदाराच्या पैशांचे संरक्षण करतो.

## इन्शुरन्स एजंटना दिले एकाच दिवशी कमिशन

छत्रपती संभाजीनगर - आयसीआयसीआय प्रूडेंशियल लाइफ इन्शुरन्सने सल्लागारांसाठी खास तयार केलेला आयप्रू एज ॲप वापरणाऱ्या सल्लागारांच्या उत्पादकतेत एच१-आर्थिक वर्ष२०२५ मध्ये ३७% वाढीचा अनुभव आला. ज्यामुळे त्यांच्या कमाईतही वाढ झाली. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, आयप्रू एज ॲप (आयपीआरयू एज) वापरणाऱ्या ९८.१% एजंटना एकाच दिवशी त्यांचे कमिशन प्राप्त झाले. आयसीआयसीआय प्रूडेंशियल लाइफ इन्शुरन्स ही पहिली जीवन विमा कंपनी आहे, जी निवडक वितरकांना एकाच दिवशी कमिशन देते. कंपनीकडे २ लाखांहून अधिक इन्शुरन्स सल्लागारांचे भक्कम जाळे आहे. कंपनीचे ६१% प्रमुख सल्लागार आता ॲपचा सक्रियपणे वापर करत आहेत. ज्यामुळे त्यांना व्यवसाय वाढवण्यास मदत मिळते.हे मोबाइल ॲप एजंटसाठी एक कार्यालयासारखे कार्य करणारे टूल आहे. जे त्यांना नवीन व्यवसायाच्या विकासावर लक्ष केंद्रित करण्यास मदत करते. यात प्रत्येक कामासाठी इन्शुरन्स एजंटना प्रशासकीय कार्याच्या वेळखाऊ कामात गुंतण्याची गरज नाही.


## आईकू ने सर्वात वेगवान स्मार्टफोन आईकू १३ लाँच केला

नवी दिल्ली: आईकू , उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँडने आज आईकू १३, भारतातील सर्वात वेगवान स्मार्टफोन, क्वालकॉम स्नॅपड्रॅगन ८ एलिट चिपसेटद्वारे समर्थित भारतातील पहिल्या स्मार्टफोनपैकी एक लॉन्च करण्याची घोषणा केली.आईकू १३ ची किंमत १२ जीबी + २५६ जीबीव्हेरिएंटसाठी रुपये ५४,९९९ (प्रभावी किंमत: ५१,९९९ रुपये) आणि १६ जीबी + ५१२ जीबी व्हेरिएंटसाठी रुपये ५९,९९९ (प्रभावी किंमत: रुपये ५६,९९९) आहे. हे दोन सुंदर रंग पर्याय ङशसशपव आणि नार्डो ग्रेमध्ये उपलब्ध असेल. याव्यतिरिक्त, आईकू १३ ५ डिसेंबरपासून दुपारी १२ वाजता प्री-बुकिंगसाठी उपलब्ध असेल आणि त्याची पहिली विक्री ११ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १२ वाजता विवो विशेष स्टोअर आईकू ई-स्टोअर आणि वर होईल. आईकू १३ विवो विशेष स्टोअर्स आणि इतर मेनलाइन स्टोअर्सवर देखील उपलब्ध असेल. यामुळे आईकू डिव्हाइसचा अनुभव घेणे आणि खरेदी करणे अखंडित होते.

## स्कोडा ऑटो इंडियाकडून कायलॅक श्रेणीच्या किमतींची घोषणा; आजपासून बुकिंगला सुरुवात

छत्रपती संभाजीनगर, ३ डिसेंबर २०२४ : स्कोडा ऑटो इंडियाची सब-४ मीटर एसयूव्ही विभागातील पहिली वेईकल कायलॅक आता व्हेरिएण्ट्स व किमतींच्या संपूर्ण श्रेणीसह लाँच करण्यात आली आहे. कायलॅक आता क्लासिक, सिग्नेचर, सिग्नेचर+ आणि प्रेस्टिज या चार व्हेरिएण्ट पर्यायांमध्ये उपलब्ध असेल. एसयूव्हीची सुरूवातीची किंमत कायलॅक क्लासिक ट्रिमसाठी ७.८९ लाख रूपये आहे. टॉप-ऑफ-द-लाइन कायलॅक प्रेस्टिज एटीची विक्री १४,४०,००० रूपयांमध्ये करण्यात येईल. तसेच, पहिल्या ३३,३३३ ग्राहकांना कॉम्प्लीमेण्टरी ३-वर्ष स्टॅण्डर्ड मेन्टेनन्स पॅकेज (एसएमपी) मिळेल. कायलॅकसाठी बुकिंग आज सायंकाळी ४ वाजल्यापासून सुरू होत असून डिलिव्हरीजना २७ जानेवारी २०२५ रोजी सुरूवात होईल. कायलॅकला आधीच उत्तम प्रतिसाद मिळाला आहे, जेथे कायलॅक हँड-रेझर्स, कायलॅक क्लब सदस्यांकडून १६०,००० हून अधिक एक्स्प्रेशन्स आणि डिलर चौकशी मिळाल्या आहेत.

## विश्वास पाटील जाधव यांचे निधन



तभा वृत्तसेवा

कन्नड - दि.०३ डिसेंबर - विश्वास पाटील जाधव, ७२ वर्षे, रा. पिशोर, यांचे खाजगी दवाखान्यात पहाटे साडे चार वाजेच्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले, विश्वास पाटील जाधव हे निवृत्त अधिकारी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व्ही. पी. जाधव,यांचे धाकटे बंधू तसेच जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार पक्षाचे) जिल्हा सरचिटणीस तथा कन्नड वकील संघाचे अध्यक्ष ॲड. कृष्णा पाटील जाधव,यांचे थोरले बंधू होते, त्यांचा अंत्यविधी दि.०३ रोजी पिशोर येथे खडकी नदीवरील स्मशानभूमीत दुपारी दोन वाजता शोकाकूल वातावरणात झाला, त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## रामचंद्र लक्ष्मण शिरसाठ यांचे निधन



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०३ डिसेंबर - तालुक्यातील आलापूर येथील रामचंद्र लक्ष्मण शिरसाठ वय १०५ वर्ष यांचे वृद्धापकाळाने दि.०२ रोजी रात्री दुखत निधन झाले त्यांच्या पश्चात दोन मुले,एक मुलगी, सुना,जावई,नातवंडे असा परिवार आहे. दि.०३ मंगळवार रोजी सकाळी अकरा वाजेच्या सुमारास शोकाकूल वातावरणात आलापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले, वंचित बहुजन आघाडीचे माजी सचिव सुभाष शिरसाठ सामाजिक कार्यकर्ते गौतम शिरसाठ यांचे ते वडील होते.

## युवराज बाबुसिंग राठोड यांचे निधन



तभा वृत्तसेवा

कन्नड :- शहरातील हिवरखेडा रोडवरील म्हाडा जवळ वास्तव्यास असलेले युवराज बाबूसिंग राठोड वय २८ वर्ष यांचे अल्पशा आजाराने दि.०२ सोमवार रोजी रात्रीच्या सुमारास दुखत निधन झाले. युवराज राठोड या युवकाचा मनमिळाऊ स्वभाव होता,दि.०३ मंगळवार रोजी देवलोक स्मशानभूमीत शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात आई,वडील,बहीण,पत्नी,एक मुलगी,असा परिवार आहे.

# पत्रकारांनी पत्रकारितेशी प्रामाणिक राहत अचूक वार्तांकन करावे : सिद्धार्थ वरदराजन

### एमजीएममध्ये ज्येष्ठ पत्रकार सिद्धार्थ वरदराजन यांचे व्याख्यान संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि.३ : पत्रकारिता हे अत्यंत चांगले क्षेत्र असून विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात काम करीत असताना काही तथ्य पाळणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या पत्रकारिता या व्यवसायाशी प्रामाणिक राहत कार्यरत राहिले पाहिजे. या क्षेत्रात काम करीत असताना कोणत्याही प्रकारची भिती न बाळगत आपले काम करावे. तसेच अचूक आणि सत्य वार्तांकन करण्याची हिंमत बाळगणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन द वायर या न्यूज पोर्टलचे संपादक, ज्येष्ठ पत्रकार सिद्धार्थ वरदराजन यांनी केले.

महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या आणि जनसंवाद महाविद्यालयाच्या वतीने द वायर या ऑनलाइन न्यूज पोर्टलचे संपादक, ज्येष्ठ पत्रकार सिद्धार्थ वरदराजन यांच्या विशेष व्याखानाचे विनोबा भावे सभागृहात आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांनी 'रोल ऑफ जर्नालिस्ट इन कंबाटिंग कमुनीलिज्म इन इंडिया' या विषयावर उपस्थितांशी संवाद साधला. या कार्यक्रमास कुलपती अंकुशराव कदम, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, मुक्त पत्रकार नितीन ब्रह्मे, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

यावेळी बोलताना ज्येष्ठ पत्रकार वरदराजन म्हणाले, आपण जेंव्हा गोध्रा प्रकरणाचा अभ्यास करतो तेंव्हा आपणास समजते की, माध्यमे अशा घटनांच्या माध्यमातून कशाप्रकारे सांप्रदायिकतेद्वारे चिथावणी दिली जाऊ शकते. तसेच, राजकीय नेते आपल्या स्वार्थासाठी सांप्रदायिकता भडकवत असतात. १९८४ सालचा दिल्ली शीख नरसंहार, रामजन्मभूमी-बाबरी प्रकरण १९९२, आफताब हत्याकांड आणि बांगलादेशात सध्या चर्चेत असलेले इस्कॉन प्रकरणांसारख्या घटनांमधून माध्यमे सांप्रदायिकतेला कशी बळी पडतात, हे आपल्या निदर्शनास येते. सांप्रदायिकतेविरुद्ध उभ्या राहणाऱ्या पत्रकारांवर सरकारद्वारे कशा प्रकारचा दबाव आणला जाऊ शकतो, हे आपण सर्वजण जाणतो. अशाच एका प्रकरणात उत्तरप्रदेश पोलिसांनी अल्ट न्यूजचे मोहम्मद झुबेर यांना सांप्रदायिक नेत्यांनी पसरवलेल्या खोट्या बातम्यांचा पर्दाफाश केल्याबद्दल अटक केली होती. विद्यार्थ्यांनी मुक्त पत्रकारितेकडे वळत हे ही क्षेत्र करिअर म्हणून स्वीकारले पाहिजे. कारण मुक्त पत्रकारितेत सत्य शोधण्याची क्षमता विकसित होत असते. विशेषत : या क्षेत्रात हे सत्य शोधून काढण्यासाठी अधिक संधी मिळत असते. या क्षेत्रात कार्यरत राहत असताना आणखी एक महत्वपूर्ण बाब म्हणजे स्वतः ची धार्मिक ओळख बाजूला ठेवून आपण आपले काम करणे गरजेचे असल्याचे ज्येष्ठ पत्रकार वरदराजन यांनी यावेळी सांगितले. संवाद सत्र संपल्यानंतर ज्येष्ठ पत्रकार सिद्धार्थ वरदराजन यांनी विद्यार्थ्यांचे प्रश्नांना उत्तरे दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. रेखा शेळके यांनी केले.

# भक्ति आणि वैराग्याच्या पोटीच ज्ञान जन्माला येते



छत्रपती संभाजीनगर : कर्म, भक्ति व ज्ञान हे मानवी जन्माचा उध्दार करून मोक्ष मिळवून देणारे महान तत्त्वज्ञान सांगणारा व गीतेवरील प्रदीर्घ भाष्य असणारा ज्ञानेश्वरी हा महान ग्रंथ माऊलींनी लिहून जनसामान्यांसाठी ज्ञानाचे भांडार खुले केले. याशिवाय हरिपाठ, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी व अनेक अभंग व विरहण्या लिहून माऊलींनी मराठी साहित्याला एक उंची प्राप्त करून दिली.

स्नेहसावली केअर सेंटर ह्या परावलंबी रुग्णांचे शुश्रुषा केंद्र असलेल्या सामाजिक संस्थेमध्ये दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ रोजी ज्ञानेश्वर माऊलींचा संजीवन समाधी सोहळा निमित्त प्रा. प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

ह्यावेळी अतिशय भक्तिमय वातावरणामध्ये प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी) यांनी ज्ञानेश्वर माऊली व त्यांचे भावंड व समकालीन संतांच्या आयुष्यातील अनेक प्रसंग भाविकांना सांगत डोळ्यासमोर उभे केले. वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी आपल्या आयुष्याचा कार्यभाग संपवल्यानंतर श्री ज्ञानेश्वर माऊलींनी निजधामाला जाण्याचे ठरवले. त्याकरिता पंढरपूरच्या विठूरायांची व सद्गुरू निवृत्त नाथांची अनुमती घेतली आणि कार्तिक वद्य त्रयोदशी शके १२१८ रोजी आळंदी अर्थात अलंकापुरीला त्यांनी इंद्रायणी नदीकाठी सिद्धेश्वराच्या शेजारी एका विवरामध्ये संजीवन समाधी घेण्याची अनुमती पांडुरंगांनी दिली. ७२८ वर्षांपूर्वी पार पडलेल्या ज्ञानोबा माऊलींच्या संजीवन समाधीच्या सोहळ्याचे वर्णन ऐकताना स्नेह सावलीतील अनेक ज्येष्ठांच्या अंगावर रोमांच उभे राहिले व डोळ्यामध्ये पाणी आले. आजही माऊलींची ही संजीवन समाधी आपल्यासाठी दीपस्तंभच आहे. माऊलींच्या चरणी कोटी कोटी प्रणाम. असेही गौरवोद्गार त्यांनी काढले.

सुरूवातीला स्नेह सावलीचे अध्यक्ष डॉ. बालाजी आसेगावकर व विश्वस्त डॉ. रामदास खोडवे यांच्या हस्ते प्रा.श्री ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी) यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला डॉ. रोहिणी व डॉ. मनोहर पिसोळकर, डॉ. शिल्पा आसेगावकर, डॉ. सुनिता भावे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता सौ शारदा येरमुले, गणेश फरकांडे, अरुण नरोटे, गायत्री जोशी व जयश्री मगरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन डॉ.शिल्पा असेगांवकर यांनी केले व शेवटी सामुहिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# वाळूज येथे वंचित बहुजन आघाडीचे स्वाक्षरी मोहिम आंदोलन



त.भा. दि. ३

वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : वंचित बहुजन आघाडीच्यावतीने राज्यभरात इव्हीएमविरोधात जन आंदोलन उभारण्यात आले असून, राज्यभर टप्याटप्याने हे आंदोलन तीव्र करण्यात येणार आहे, या आंदोलनामध्ये वाळूज महानगर येथील वंचित बहुजन आघाडीने सहभाग नोंदवत आज स्वाक्षरी मोहीम राबवली.

वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष अंजन साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली वाळूज महानगर परिसरात आज सकाळी ११ वाजता स्वाक्षरी मोहीम राबवून इव्हीएमविरोधी आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. यावेळी शेकडो कार्यकर्त्यांनी या आंदोलनात सहभाग घेतला होता. यावेळी परिसरातील हजारो नागरिकांनी या इव्हीएमविरोधी आंदोलन स्वाक्षरी मोहीमेत सहभाग नोंदवला. यावेळी तालुकाध्यक्ष अंजन साळवे, माणिकराव करवंजे, पंडितराव तुपे, जिल्हा उपाध्यक्ष रामेश्वर तायडे, तालुका उपाध्यक्ष प्रेम बनकर, अशोक त्रिभुवन, अण्णा जाधव, ज्ञानशील वाघमारे, मिलिंद खंडेराव, महेंद्र तायडे, तारासिंग तरयावाले, बाबासाहेब वक्ते, धीरज खैरे, राजेंद्र साळवे, अनिल कांबळे, सिद्धार्थ मोरे, फकीरचद दाभाडे, भागीनाथ साले, बबन बनसोडे, शुभम साळवे, सूरज मनोहर, कचरू काकडे, बाबासाहेब रायकर, किशोर नितनवरे, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वेंकटेश मुकबधीर विद्यालय येथे जागतिक दिव्यांग दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**

**धर्माबाद,दि. ०३ डिसेंबर**

३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिन व्यंकटेश निवासी मूकबधिर विद्यालय धर्माबाद मध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. दिव्यांग दिनाचे औचित्य साधून सकाळीच प्रभात फेरी काढून जन जागृती करण्यात आली व डॉ.हेलन केलर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्याच्या जीवनकार्याबद्दल माहिती शाळेचे विशेष शिक्षक श्री क्यादरकुंठे एम डी यांनी दिली , आम्ही सुद्धा सामान्य माणसाप्रमाणेच आहोत ,आम्ही सुद्धा समाजाचे एक अंग आहोत हे विद्यार्थ्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.दिवसभर विविध खेळ व सांस्कृतिक कार्यक्रम रेलचेल होती व विद्यार्थ्यांने सर्व कार्यक्रमाचा आनंद घेतला

कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे मु .श्री जोशी डी डी ,विशेष शिक्षक श्री सावळे आर एस,श्री चवरे डी बी, उमाटे एन व्ही, नारसूने आर जी, नरवाडे यू एम,शेख एस बी, कांठाले डी डी,पाटील एस बी,तेलंग एस जे, श्रीमती जोशी एम एस, व सौ. चेनगे के एम यांनी प्रयत्न केले.

# 'प्रोस्टेट' समस्येसाठी रेझ्युम वॉटर थेरपी उपयुक्त

### एशियन इन्स्टिट्यूट ऑफ नेफ्रोलॉजी अँड युरोलॉजीमध्ये नवी थेरपीचे उपचार सुरू



नांदेड : प्रोस्टेट वाढीच्या समस्या आता सर्रास अनेक पुरुषांमध्ये दिसून येत आहेत. त्यावर औषधोपचारासह शस्त्रक्रियेचा पर्यायही उपचार म्हणून वापरण्यात येतो. परंतु, त्या उपचारांच्या काही नकारात्मक बाजू आहेत. त्यामुळे 'इरेक्टाइल डिसफंक्शन' आणि लवकर स्खलन होण्याच्या लैंगिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या समस्या प्रामुख्याने तरुणांमध्ये आढळतात.

त्यामुळेच अशा प्रोस्टेट वाढीच्या समस्येवर 'रेझ्युम वॉटर थेरपी' म्हणून नवी उपचार प्रणाली विकसित होत आहे. ती रुग्णांसाटी फायदेशीर ठरणार आहे, असा विश्वास मूत्ररोग तसेच मूत्रपिंडरोग तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

प्रोस्टेट वाढीच्या समस्येबाबतच्या वॉटर थेरपीच्या उपचाराचा शुभारंभ एशियन इन्स्टिट्यूट ऑफ नेफ्रोलॉजी अँड युरोलॉजीचे (एएनयू) व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य सल्लागार युरोलॉजिस्ट डॉ. सी. मल्लिकार्जुन यांच्या हस्ते झाला. त्यावेळी प्रोस्टेच रुग्णांसाठी अशी थेरपी उपयुक्त असल्याचे मत व्यक्त केले. त्यावेळी या थेरपीचे नेमके कोणते फायदे आहेत याचे महत्व त्यांनी विषद केले. एशियन इन्स्टिट्यूट ऑफ नेफ्रोलॉजी अँड युरोलॉजी बंजारा हिल्सचे प्रख्यात डॉक्टर, वरिष्ठ सल्लागार युरोलॉजिस्ट डॉ. सय्यद मोहम्मद गौस आणि सल्लागार युरोलॉजिस्ट डॉ. विजय कुमार शर्मा मद्दुरी उपस्थित होते.

औषधोपचारामुळे शस्त्रक्रियेची गरज थोडी लांबणीवर टाकता येते. त्या पलिकडे औषधोपचारामुळे प्रोस्टेची समस्या कायमची दूर होत नाही. त्यामुळे भविष्यात उपचारांनी आजार बरा होण्याची वेळ संपली की शस्त्रक्रियेशिवाय पर्याय राहत नाही. परंतु, शस्त्रक्रिया उशिरा केल्याने त्या शस्त्रक्रियेचे परिणाम चांगले दिसून येत नाहीत. औषधांसह शस्त्रक्रियेमुळे इरेक्टाइल डिसफंक्शन आणि स्खलनासारख्या लैंगिक समस्या कमी होत नाहीत. त्या उदभवतात. प्रामुख्याने तरुण वर्गांमध्ये लैंगिकदृष्ट्या या समस्या आणखी त्रासदायक ठरतात.

त्यावेळी रेझ्युम वॉटर व्हेपर थेरपी हे उपचार समस्या दूर करण्यासाठी उपयुक्त आहेत. या थेरपीमुळे १५ दिवस ते एक महिन्याच्या आत चांगले परिणाम दिसून येतात.

# भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी केली महाआरती व अभिषेक



तभा वृत्तसेवा

कन्नड : राज्यात भाजप पक्षाला मोठे यश मिळाले असून राज्याचे

मुख्यमंत्री पदी देवेंद्र फडणीस व्हावे यासाठी कन्नड शहरातील माळीवाडा येथील मारुती मंदिरात दि. २ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वा. भाजप शहराध्यक्ष सुनील पवार यांनी महाभिषेक व महाआरती चे आयोजन केले होते. यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांच्या हस्ते महाभिषेक व महाआरती करण्यात आली. यावेळी प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ. संजय गव्हाणे तालुकाध्यक्ष किशोर आबा पवार, शहराध्यक्ष सुनील पवार यांच्यासह महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्या सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपास्थीत होते. देवेंद्र फडणवीस हे एक हुशार सर्व समाजातील घटकाना सोबत घेऊन चालणारे नेतृत्व असून समाज हिताचे प्रश्न सोडविण्याची ताकद त्यांच्यात असल्याने त्यांची मुख्यमंत्री पदी वर्णी लागावी ही कार्यकर्ते यांची इच्छा असून यासाठी आम्ही सर्वांनी मिळून महाभिषेक करून महाआरती करून ईश्वराकडे प्रार्थना केली असल्याचे मनोगत जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी केले.

## शेतकऱ्यांनी ठराविक मुदतीमध्ये ई-पीकपाहणी करुन घेण्याचे आवाहन

अहिल्यानगर दि. ३- पीकविमा, पीककर्ज, नैसर्गिक आपत्ती, एमएसपी अंतर्गत पिकांची नोंद, ग्रीस्टीक अंतर्गत सर्व योजना तसेच शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी ठराविक मुदतीमध्ये ई-पीकपाहणी करुन घेण्याचे आवाहन उपजिल्हाधिकारी (महसूल) शारदा जाधव यांनी केले आहे.

महाराष्ट्रात १ डिसेंबर २०२४ पासून रब्बी हंगाम सुरू झाला आहे. शेतकऱ्यांना यापूर्वी पीक पाहणीसाठी ई-पीक पाहणी मोबाईल प उपलब्ध होते. परंतू केंद्र शासनाच्या सुचनेप्रमाणे यामध्ये तांत्रिक बदल करत डिजिटल क्रॉप सर्वे (डीसीएस) मोबाईल प उपलब्ध करुन देण्यात आले असून याच पच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात ई-पीक पाहणी होणार आहे. शेतकरी स्तरावरील ई-पीकपाहणी करण्यासाठी १ डिसेंबर २०२४ ते १५ जानेवारी २०२५ ही मुदत असून सहायक स्तरावर ई-पीक पाहणी करण्यासाठी १६ जानेवारी ते २८ फेब्रुवारी २०२५ ही मुदत आहे.

शेतकरी स्तरावरुन मोबाईल पद्वारे पीक पाहणी नोंद करण्यात येऊन शेतकरी स्तरावरील कालावधी संपल्यानंतर सहायकांमार्फत उर्वरित शेतकऱ्यांची पीक पाहणी पद्वारे नोंदविण्यात येते. शेतकऱ्यांच्या पीक पाहणी मदतीसाठी हंगाम सुरू होण्याच्या पहिल्या दिवसापासून सहायक उपलब्ध आहे. डिजिटल क्रॉप सर्वे (डीसीएस) मध्ये गटाच्या हद्दीवर आधारित जीओ फेन्सिंग बंधनकारक करण्यात आलेली आहे. जोपर्यंत संबंधित खातेदार, सहायक निवडलेल्या गटात जाऊन पीक पाहणी करत नाही तोपर्यंत पिकांचे छायाचित्र काढता येत नाही व पीक पाहणी अपलोड करता येत नसल्याचेही कळविण्यात आले आहे.

## लोकशाही दिनी १८ अर्ज प्राप्त

छत्रपती संभाजीनगर,दि.३(जिमाका)- दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिनानिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात १८ अर्ज प्राप्त झाले. त्यात महसुल विभाग १, पुरवठा विभाग १, लिडकॉम संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित जिल्हा कार्यालय १, इतर साधे निवेदन १५ असे एकूण १८ अर्ज प्राप्त झाले असे सामान्य प्रशासन विभागाने कळविले आहे.

## 'आर्यन्स सन्मान' चित्रपट-नाटक सोहळ्याची नामांकने घोषित

### पुण्यात पुरस्कारांची घोषणा; १३ लाख रुपयांचे पुरस्कार देणार

छत्रपती संभाजीनगर - संध्याकाळची प्रसन्न वेळ..वातावरणात काहीसा गारवाचित्रपट, नाटकांशी संबंधितांना ओढ नामांकने घोषित होण्याची..पावले केशवबागेकडे वळलेली..शानदार सूत्रसंचालनमधूनच गाणी आणि नाच.. चित्रपट आणि नाटकाचे लेखक, दिग्दर्शक, अभिनेते, अभिनेत्रीपैकी कुणाची घोषणा होते, याकडे लक्ष लागलेले..अखेर ते क्षण येत गेलेआपल्या आवडत्या कलाकृतीला आणि आवडत्या कलाकाराची घोषणा जेव्हा होत होती, त्या वेळी केशवबाग टाळ्यांच्या गजराने दुमदुमत होती हे दृश्य होते 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक' पुरस्कार सोहळ्याची नामांकने घोषित करण्याच्या वेळचे. दरवर्षी या सोहळ्याची चाहते तितक्याच उत्सुकतेने वाट पाहत असतात. राज्य सरकारनंतर रोख पुरस्कार देणारा हा दुसरा मोठा पुरस्कार सोहळा असल्याने या पुरस्कारावर नाव कोरले जावे, असे अनेकांना वाटत असते. पुण्यातील डी. पी. रोड, कर्वे नगर येथील केशव बागमध्ये 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक' नामांकन सोहळा मोठ्या थाटात पार पडला. 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक' सोहळ्याची नामांकने घोषित झाल्याने कोणकोणते कलाकार-तंत्रज्ञ पुरस्कारांवर आपले नाव कोरण्यात यशस्वी होतात, हे पाहण्याची उत्सुकता वाढली आहे.

या नामांकन सोहळ्यामध्ये 'आर्यन्स नवदुर्गा सन्मान पुरस्कार' प्रदान करण्यात आले. मोटिवेशनल आरती बनसोडे, 'रेस्क्यू टीम'च्या सायली पिलाणे, समाजसेवक सिस्टर लुसी कुरियन, चित्रकार पूजा धुरी, शेतकरी ताराबाई पवार, समाजसेवक तेजस्वी सेवेकरी, समाजसेवक ज्योती सचदा, नेमबाज अदिती गोपीचंद स्वामी, समाजसेवक अहिल्याबाई बर्डे या नवदुर्गांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या नवदुर्गांनी केलेल्या कामाच्या ध्वनिचित्रफिती जेव्हा दाखवल्या जात होत्या, तेव्हा सामान्यांतील असमान्यत्वाची प्रचिती येत होती. साहजिकच उपस्थितांनी त्यांच्या कार्याला सलाम ठोकला नसता, तरच नवल. या 'नवदुर्गां'चा सन्मान अभिनेते मकरंद अनासपुरे, 'ओमा फाऊंडेशन' संचालक अजय जगताप, लेखक श्रीनिवास भणगे, 'आर्यन ग्रुप'चे अध्यक्ष मुकुंद जगताप, 'आर्यन ग्रुप' संचालक संजय शेंडगे, सागर कानडे आदींच्या हस्ते पुरस्कार वितरित करण्यात आले. 'ओमा फाऊंडेशन'च्या वतीने देण्यात आलेल्या या पुरस्काराचे स्वरुप २१हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह आणि सन्मान पत्र असे होते. पूजा धुरी यांनी काढलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र जेव्हा 'आर्यन ग्रुप'चे व्यवस्थापकीय संचालक मनोहर जगताप यांना देण्यात आले, तेव्हा टाळ्यांचा कडकडाट झाला. 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक अंतिम पुरस्कार सोहळा' गणेश कला क्रीडा मंच, पुणे येथे होणार असून लवकरच याची तारीख घोषित करण्यात येणार आहे. पुरस्कारांसाठी दिली जाणारी रक्कम 'ओमा फाऊंडेशन'कडून वितरित करण्यात येणार आहे. या सोहळ्यात एकूण २३ विभागांमध्ये १३ लाख रुपयांचे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. यात प्रायोगिक नाटके, व्यावसायिक नाटके आणि चित्रपटांचाही समावेश आहे. 'श्यामची आई' चित्रपटाने सर्वोत्कृष्ट चित्रपटासोबतच दिग्दर्शन, अभिनेत्री, गायिका (आभा सौमित्र आणि रुचा बोंद्रे), कला दिग्दर्शन, रंगभूषा, ध्वनिमुद्रण, संकलन, वेशभूषा, छायाचित्रण, पार्श्वसंगीत, लक्षवेधी अभिनेता, बालकलाकार अशा तब्बल १४ विभागांमध्ये नामांकन मिळवण्यात यश मिळवले आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महावितरणच्या मोहिमेत वीजचोरांवर धडक कारवाई

## १५ मीटरमध्ये आढळला फेरफार, संशयास्पद १५ मीटर ताब्यात

छत्रपती संभाजीनगर : महावितरणच्या शहर-१ विभागामधील अधिक वीजगळती असलेल्या वीजवाहिन्यांवरील ग्राहकांच्या तपासणीची धडक मोहीम मंगळवारी सुरू करण्यात आली. यात पॉवर हाऊस उपविभागात १५ ग्राहकांच्या मीटरमध्ये फेरफार करून वीजचोरी होत असल्याचे आढळले. तर आणखी १५ ग्राहकांचे संशयास्पद मीटर तपासणीसाठी ताब्यात घेण्यात आले आहेत. महावितरणच्या या कारवाईमुळे वीजचोरांचे धाबे दणाणले आहे.



वीजचोरी तपासणीसाठी महावितरणने महिला कर्मचाऱ्यांचे दामिनी पथक स्थापन केले आहे. शहराच्या मध्यवर्ती भागातील भडकलगेट परिसरात महिला अभियंते आणि कर्मचाऱ्यांनी शून्य वीजवापर तसेच ३० युनिटपेक्षा कमी वीजवापराची नोंद असलेल्या ग्राहकांची तपासणी केली. यात अनेक ठिकाणी ग्राहक मीटरमध्ये फेरफार करून वीज चोरत असल्याचे उघडकीस आले. दामिनी पथकासोबतच महावितरणच्या सुरक्षा व अंमलबजावणी विभागाचे उपसंचालक सतीश कापडणी यांचे पथकही या मोहिमेत सामील झाले होते. कार्यकारी अभियंता प्रसाद महातोले, उपविभागीय अभियंता किरण पवार यांच्यासह शहर-१ विभागाचे अभियंते व कर्मचाऱ्यांनी ही मोहीम यशस्वी केली. वीजचोरी आढळलेल्या ग्राहकांना त्यांच्या वापरानुसार निर्धारित बिले देण्यात येणार आहेत. ही बिले विहित मुदतीत न भरल्यास वीजचोरांवर थेट पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. ही मोहीम संपूर्ण शहरात सुरू करण्यात येणार असून वीज चोरांवर विद्युत कायदा २००३ नुसार कार्यवाही करण्यात येणार असल्याचे कार्यकारी अभियंता प्रसाद महातोले यांनी सांगितले.

# साने गुरुजी कथामालेंतर्गत विद्यार्थ्यांसाठी मराठवाडा विभागीय कथाकथन स्पर्धा



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०३ डिसेंबर** - स्व. दत्तात्रय हेलसकर यांनी १९९४ मध्ये स्थापन केलेल्या अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला शाखा हेलसच्या वतीने (ता. मंठा जि. जालना) अनेकविध संस्कारक्षम शैक्षणिक, सामाजिक, विधायक उपक्रम राबविले जातात. पूज्य साने गुरुजी जयंतीनिमित्त हेलस कथामाला शाखा आणि जालना येथील मानस फाऊंडेशनच्या सहकार्याने मराठवाडास्तरीय विभागीय कथाकथन स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. स्पर्धेचे हे पाचवे वर्ष आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना प्रोत्साहित करण्यासाठी शाळेतील विद्यार्थ्यांना स्पर्धेमध्ये सहभागासाठी प्रेरित करावे. स्पर्धा यशस्वितेसाठी सहभाग नोंदवावा, असे आवाहन शिक्षणाधिकारी (मनपा ) व्यंकटेश चौधरी यांनी केले आहे.

स्पर्धेचे स्वरूप, नियम व अटी पुढीलप्रमाणे आहेत. प्रवेश फी नाही, स्पर्धा मराठवाड्यातील सर्व व्यवस्थापनांच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आहे.

स्पर्धा बालगट : इयत्ता पाचवी ते सातवी व किशोर गट : इयत्ता आठवी ते दहावी या दोन गटात आहे. कथाकथनासाठी विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतील संस्कारक्षम, बोधप्रद कथेची निवड करणे आवश्यक आहे, कथा आठ ते दहा मिनिटांची असावी. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. स्पर्धा नियोजनात ऐनवेळी बदल करण्याचा अधिकार संयोजन समितीकडे असेल. पारितोषिके व सन्मान याप्रमाणे आहे. जिल्हास्तर : प्रथम , व्दितीय व तृतीय पारितोषिक : प्रमाणपत्र व ग्रंथ भेट असे स्वरूप असेल. तर विभागीय स्तर पारितोषिक : बालगट व किशोर या दोन्ही गटातील विभागस्तरीय विजेत्यांना रोख पारितोषिके, प्रमाणपत्र देऊन समारंभपूर्वक गौरविण्यात येईल.

प्रथम : रोख दीड हजार रुपये, द्वितीय : रोख एक हजार रुपये, तृतीय : पाचशे रुपये. उत्तेजनार्थ पारितोषिक म्हणून सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. स्पर्धेत सहभाग नोंदणीची अंतिम तारीख : दि.११ डिसेंबर २०२४, बुधवार अशी असून स्पर्धेत सहभागासाठी https://forms.gle/jUgULXkpo3m4fxK6 या लिंकवर नोंदणी करणे आवश्यक आहे जिल्हास्तरीय स्पर्धा दिनांक १४ डिसेंबर २०२४, शनिवार रोजी नांदेड येथे तर विभागस्तरीय स्पर्धा २४ डिसेंबर २०२४, मंगळवार रोजी होणार आहे. तरी स्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा संयोजक व्यंकटेश चौधरी (९४०५८२१९००), पद्माकर कुलकर्णी (९४२२१८७९४२), विलास कोळनूरकर (९४२०४४८०१९) यांनी केले आहे. तसेच जिल्हास्तरीय स्पर्धेचे स्थळ नोंदणी केलेल्या स्पर्धकांना कळविण्यात येईल असे सांगण्यात आले आहे.

# विविध कलाविष्कारांनी युवा महोत्सवात रंगत ! नेहरू युवा केंद्र, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी विविध लोककला आविष्कारांसह कथा, कविता चित्रकला, वक्तृत्व कला, छायाचित्रकला आदी विविध स्पर्धांनी युवक महोत्सवात रंगत आली. सोमवारी, २ डिसेंबर रोजी गारखेडा परिसरातील विभागीय क्रीडा संकुलात जिल्हा युवा महोत्सव अपूर्व उत्साहात पार पडला.

युवा कार्यक्रम खेळ मंत्रालय भारत सरकार अंतर्गत नेहरू युवा केंद्र, क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२४-२५ चे



आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून नेहरू युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी संकल्प शुक्ला, जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई, क्रीडा अधिकारी गणेश पाळवदे, कार्यक्रम समन्वयक प्रकाश त्रिभुवन यांची प्रमुख उपस्थिती होती. परीक्षक म्हणून अजिंक्य लिंगायत, डॉ. शेषराव पठाडे, प्रा. अजिंक्य लिंगायत (सामूहिक लोकगीत व लोकनृत्य), प्रा. विष्णू सुरासे, प्रा. अनिल मगर, प्रा. सविता लोंढे(कविता व कथालेखन), डॉ. गजानन पेहरकर, डॉ. शिरीष आंबेकर (चित्रकला स्पर्धा), डॉ. पंजाब हजारे, डॉ. निशा वाकोडे, डॉ. वैजनाथ कदम,(भाषण) प्रा. अश्विन जोगदंड, प्रा. लक्ष्मीकांत जाधव, प्रा. सचिन घायाळ (फोटोग्राफी), प्रा. राजेंद्र दांडगे (विज्ञान प्रदर्शन वैयक्तिक व सांघिक) यांनी काम पाहिले.

अदितींच्या हस्तेदीपप्रज्वलन करून युवक महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा अधिकारी गणेश पाळवदे यांनी केले. त्यानंतर परीक्षकांनी नियमावली सांगितल्यानंतर स्पर्धेला सुरुवात झाली. स्पर्धेतील प्रथम विजेत्या संघाला विभागीय स्तरावर पाठविण्यात येणार आहे. स्पर्धेतील विजेते संघ पुढीलप्रमाणे आहेत.

भाषण प्रतियोगिता साक्षी बागुल, चित्रकला स्पर्धा दूरसिंग पंडित, कथालेखन अंकिता केंद्रे, कविता लेखन राधिका दौंडकर, फोटोग्राफी हर्ष गोरे, विज्ञान प्रदर्शन वैयक्तिक रोहित भुमरे, सांघिक राम मुजमुले (औद्योगिक प्रशिक्षण संस्थ्या) समुह गायन देवगिरि संघ हे असून, विजेत्या संघांना मान्यवराच्या हस्ते प्रमाणपत्र ट्रॉफी तसेच रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश छबिलवाड यांनी, तर आभार प्रकाश त्रिभुवन यांनी मानले. कार्यक्रमाला कलारसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतीय संविधान सर्वंकष मानवी कल्याणाचा विचार देणारे

## लसाकमचे प्रदेशाध्यक्ष बालाजी थोटवे यांचे प्रतिपादन; वर्षभर चालणाऱ्या संविधान व्याख्यानमालेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०३ डिसेंबर**

भारतीय संविधान हे जगात सर्वश्रेष्ठ असून जाती धर्मात विभागलेल्या माणसांच्या मनात समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय याबरोबरच धर्मनिरपेक्षता तसेच समाजवाद पेरण्याचे महत्वाचे कार्य करते. भारतीय संविधान हा लोकचळवळीचा विषय आहे. वर्ण, वर्ग व्यवस्थेला मूठमाती देऊन जाती धर्माला राष्ट्रीय एकात्मतेच्या पातळीवर विसर्जित करणाऱ्या भारतीय संविधानात मानवी कल्याणाचा सर्वंकष विचार आहे असे प्रतिपादन लसाकमचे प्रदेशाध्यक्ष बालाजी थोटवे यांनी केले. ते संविधान व्याख्यानमालेच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीपीएसएसचे राष्ट्रीय अध्यक्ष एस. जी. माचनवार हे होते तर प्रमुख उपस्थितीत ज्येष्ठ साहित्यिक बाबुराव पाईकराव, लसाकमचे जिल्हाध्यक्ष संजय मोरे, तसेच निमंत्रक प्रज्ञाधर ढवळे, सतिशचंद्र शिंदे, प्रा. डॉ. दिलीप काठोडे, चंद्रकांत कदम यांची उपस्थिती होती.

भारतीय संविधान दिनाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त भारतीय पिछडा शोषित संघटन, लहुजी साळवे कर्मचारी महासंघ, सप्तरंगी साहित्य मंडळ महाराष्ट्र

**चळवळीच्या कार्यकर्त्यांनी बहाव्यासारखे बहरावे- माचनवार**

**भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर व्याख्यानमालेच्या माध्यमातून संविधानवादी चळवळ उभी करण्याचा हा प्रयत्न आहे. अशा वैचारिक चळवळीची सांगता राजकीय यशस्वीतेत होते. परंतु चळवळीत यश अपयश येत असते. कार्यकर्त्यांनी खचून न जाता फिनिक्स पक्षाप्रमाणे झेप घेण्याची गरज आहे. या कार्यकर्त्यांची बांधणी भारतीय संविधानातील सर्वश्रेष्ठ मूल्यांवर झाली पाहिजे. म्हणूनच कार्यकर्त्यांनी बहाव्यासारखे बहरले पाहिजे अशी अपेक्षा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन ओबीसींचे राष्ट्रीय नेते एस. जी. माचनवार यांनी व्यक्त केली.**

यांच्या संयुक्त विद्यमाने वर्षभर संविधान व्याख्यानमालेचे आयोजन नांदेड शहरात करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेचे उद्घाटन सुप्रसिद्ध व्याख्याते बालाजी थोटवे यांच्या 'भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष : एक दृष्टिक्षेप' या विषयावरील व्याख्यानाने झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रपिता जोतीराव फुले, भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सुप्रसिद्ध गझलकार चंद्रकांत कदम यांनी आपल्या लोकप्रिय गझलेच्या माध्यमातून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकानंतर बाबुराव पाईकराव, संजय मोरे यांनी आपले विचार मांडले. अध्यक्षीय समारोप एस. जी माचनवार यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीपीएसएस जिल्हाध्यक्ष सतिशचंद्र शिंदे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. दिलीप काठोडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बीपीएसएस, लसाकम व सप्तरंगी साहित्य मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# ७४ जळगांव येथील बिबट्याच्या हल्ल्यात मयत झालेल्या मुलीच्या वारसास दहा लाख रुपयाची तात्काळ मदत

तभा वृत्तसेवा
बिडकीन दि ३ डिसेंबर पैठण तालुक्यातील ७४ जळगाव येथील शेतात कापूस वेचणी करत असताना प्रांजल भरत मुळे (वय १०) हिच्यावर बिबट्याने हल्ला करून तिला ठार केले होते. त्या मुलीच्या वारसांना वन विभागामार्फत १० लक्ष रुपयांच्या मदतीचा चेक पाचोड ग्रामपंचायत सरपंच शिवराज भैय्या भुमरे यांच्या हस्ते सुपूर्त करण्यात आला.तसेच उर्वरित १५ लक्ष रुपये हे आठ दिवसात वारसांच्या खात्यावर फिक्स डिपॉझिट करण्यात येणार आहेत अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी शशिकांत तांबे यांनी दिली. याप्रसंगी वनपरिक्षेत्र अधिकारी



शशिकांत तांबे, एरंडे, हरिभाऊ घेगडे, उद्धव एरंडे, गणेश बजारे, बाळू मुळे, विक्रम एरंडे, रामभाऊ मतकर, संतोष मुळे, विष्णू एरंडे, गणेश मुळे, दत्तू घेगडे, सोमनाथ मुळे, भागचंद मतकर, कृष्णा एरंडे, कल्पेश एरंडे, संजय एरंडे, अभिमान एरंडे, गजानन एरंडे, तात्या पवार, दत्तू शिंदे,नारायण गरड तसेच मुलीचे कुटुंबीय असराबाई मुळे, लक्ष्मण मुळे, राम मुळे, वडील भरत मुळे व आई मनीषा मुळे आदींची उपस्थिती होती.

ही मदत मिळवून देण्यासाठी पैठण तालुक्याचे आमदार विलास भुमरे यांनी पाठपुरावा केला होता.

### शेतकऱ्यांना योजनांचा लाभ सुलभ रितीने मिळण्यासाठी ग्रिस्टॅक योजना

# शेतकरी ओळख क्रमांकासाठी जिल्ह्यात १६ डिसेंबरपासून मोहीम

## मोहिमेच्या दिवशी उपस्थित राहून शेतकऱ्यांनी ओळख क्रमांक प्राप्त करुन घ्यावा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०३ डिसेंबर**

कृषि क्षेत्रात डिजीटल सेवांचा वापर करुन शासनाच्या विविध योजनांचा जलदगतीने व परिणामकारकरित्या लाभ देणे सुलभ व्हावे यासाठी राज्यात ग्रिस्टॅक योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक गावात सर्व शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) तयार करण्यात येत आहेत. नांदेड जिल्ह्यात यासाठी १६ डिसेंबरपासून मोहिम राबविण्यात येत आहे. तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोहिमेच्या दिवशी उपस्थित राहून आपला शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करुन घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

शेतकरी ओळख क्रमांकामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित फायदा होणार आहे. पीएम किसान योजनेअंतर्गत अनुदान प्राप्त करण्यासाठी आवश्यकतेच्या अटी पूर्ण करुन लाभ प्राप्त करण्यामध्ये सुलभता येणार आहे. यामुळे सर्व पात्र लाभार्थी समाविष्ट करुन घेण्यास सहाय्य मिळेल. पिकासाठी कर्ज मिळण्यासाठी किसान क्रेडिट कार्ड आणि कृषि इन्फ्रास्ट्रक्चर फंड व शेतीच्या विकासासाठी इतर कर्जे उपलब्ध करुन घेण्यात सुलभता राहील. पिक विमा तसेच आपत्ती व्यवस्थापना अंतर्गत शेतकऱ्यांचे देय नुकसान भरपाईसाठी सर्वेक्षण करण्यात सुलभता येईल, किमान आधारभूत किंमतीवर खरेदीमध्ये शेतकऱ्यांचे नोंदणीकरण ऑनलाईन पध्दतीने होऊ शकेल.

शेतकऱ्यासाठी कृषि कर्ज, वित्त, निविष्ठा आणि इतर सेवा देणाऱ्या यंत्रणाना कृषि सेवा सहजपणे उपलबध करुन देता येईल. विविध सरकारी योजनांचा लाभ , कृषि व संलग्न विभागांना शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संचच्या उपलब्ध आकडेवारीच्या आधारे योजनांचा लाभ वितरीत करण्यामध्ये सुलभता येणार आहे. तसेच लाभार्थ्यांना वारंवार प्रमाणिकरणाची आवश्यकता राहणार नाही. शेतकऱ्यांना वेळेवर कृषि विषयक सल्ले, विविध संस्थाकडून संपर्क करण्याच्या संधीमध्ये वाढीसह नाविण्यपूर्ण कार्यक्रमांच्या विस्तार व प्रचारात सफलता प्राप्त होणार आहे.

तरी शेतकऱ्यांनी शासकीय योजनांचे लाभ प्राप्त करुन घेण्यासाठी आपल्या गावात मोहिमेच्या दिवशी शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करुन घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# स्त्रीजीवनाच्या गुंतागुंतीवर भाष्य करणाऱ्या 'सेल्फी' नाटकाचे सादरीकरण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०३ डिसेंबर**

६३ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्यस्पर्धेत भारतीय स्त्रीजीवनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारे आणि स्वतःकडे अंतर्मुख होण्याचा संदेश देणारे सेल्फी हे दोन अंकी नाटक गोपाला फाऊंडेशन, परभणीच्या वतीने सोमवारी (ता.२) यशस्वीपणे सादरीकरण करण्यात आले. सुप्रसिद्ध लेखिका शिल्पा नवलकर यांच्या लेखणीतून साकारलेले हे नाटक स्त्रीच्या जीवनातील संघर्ष, तिच्या अंतर्मनातील घुसमट, आणि समाजाने लादलेल्या विविध बंधनांवर संवेदनशील भाष्य करते.

ाटकाचे शीर्षक सेल्फी आजच्या डिजिटल युगात स्वतः कडे नव्याने पाहण्याचा, स्वतः च्या अंतर्मनाशी संवाद साधण्याचा आग्रह करते. याच भावनेला केंद्रस्थानी ठेवून नाटकाच्या कथानकात पाच स्त्रियांचे प्रवास उलगडले आहेत. रेल्वे स्थानकाच्या वेटिंग रूममध्ये आपापल्या प्रवासाची वाट पाहणाऱ्या या पाचजणींमध्ये सुरू



झालेला संवाद हळूहळू त्यांच्या आयुष्याच्या जटिल प्रवासाचा आरसा बनतो. वरवर सुखात आणि परिपूर्ण आयुष्य जगत असल्याचा आभास निर्माण करणाऱ्या या स्त्रिया, प्रत्यक्षात मात्र सामाजिक, कौटुंबिक आणि वैयक्तिक पातळीवर संघर्ष करत आहेत.

नाटकातील मुख्य पात्रांमध्ये मध्यमवयीन स्वाती (कल्पना कुलकर्णी) ही एक गृहिणी आहे, जी सतत आपल्या परिपूर्ण संसाराचा डंका पिटवत असते, पण आतून मात्र ती स्वतःला हरवून बसलेली आहे. विभा (सुषमा कुलकर्णी), एक प्राध्यापिका, जी मूल नको असा ठाम निर्णय घेतल्याचे दाखवत असली तरी प्रत्यक्षात मूल होण्यासाठी व्याकुळ आहे. मिनाक्षी (कांती दैठणकर) ही उच्च पदावर असलेली अधिकारी आहे, जी लग्नाला नकार देत प्रेमाच्या शोधात भटकते, पण अपेक्षित जोडीदार न मिळाल्याने आत्महत्येचा प्रयत्न करते. तनुजा (पूनम श्रीरामवार) ही दोन वेळा विवाहबंधनात अडकूनही समाधान न मिळाल्यामुळे अस्वस्थ आहे. तर शाल्मली (सीमंतिनी कुंडीकर) ही टीव्ही अभिनेत्री आहे, जी गरोदरपणाची बातमी समजल्यानंतर आपले करिअर धोक्यात येईल या भीतीने अस्वस्थ आहे. या पाच स्त्रियांच्या संवादातून बाहेरून सुखी वाटणाऱ्या स्त्रियांचे अंतरंग हळूहळू प्रेक्षकांसमोर उलगडते.

स्त्री म्हणून त्यांना येणाऱ्या अडचणी, सामाजिक दबाव आणि त्यांच्या स्वप्नांच्या उड्डाणावर येणाऱ्या मर्यादा यांचा वेध घेत नाटकाची कथा पुढे सरकते. त्यांच्या अंतर्मुख प्रवासात एकमेकांचे अनुभव आणि संवेदना उलगडताना, या स्त्रिया स्वतःला नव्याने समजून घेतात. नाटकाचे दिग्दर्शन स्नेहल किशोर पुराणिक यांनी केले असून, प्रत्येक पात्राची अंतर्गत अवस्था प्रेक्षकांसमोर प्रभावीपणे उभी करण्यात त्यांनी यश मिळवले आहे. नेपथ्याच्या जबाबदाऱ्या अर्चना सिद्धार्थ नागठाणकर आणि द्रोपदी भगत यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडल्या. प्रकाश योजनेंतर्गत साक्षी नारायण त्यारे आणि अनुष्का पुराणिक यांनी प्रत्येक प्रसंगाला अनुरूप प्रकाशयोजना केली.

रंगभूषा व वेशभूषेसाठी उषा कुडूंकर आणि ऐश्वर्या पुराणिक यांनी पात्रांच्या व्यक्तिमत्त्वाला न्याय दिला. पार्श्वसंगीतासाठी रेणुका पुराणिक आणि उज्वला पाटीत यांनी मेहनत घेतली असून, त्याने नाटकातील भावनिक क्षण अधिक प्रभावी झाले. सहाय्यक भूमिकांमध्ये चायवाला (विश्वजीत खरात), समोसेवाला (शुभम गोरे), आणि प्रवासी १ ते ४ म्हणून वैजनाथ बनसोडे, प्रतिक कांबळे, मधुकर भगत, अतुल पांचाळ यांनी आपापल्या भूमिका उत्कृष्टरीत्या साकारल्या. रंगमंच व्यवस्थापनासाठी संगीता किरण डाके आणि शारदा हरिभाऊ कदम यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. या कार्यक्रमास प्रेक्षकांनी प्रतिसाद दिला.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागातर्फे सुरु असलेली ही मराठी राज्य नाट्य स्पर्धा स्पर्धा अप्पर मुख्य सचिव श्री.विकास खारगे, संचालक विभीषण चवरे, सह-संचालक श्रीराम पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून या स्पर्धेसाठी सांस्कृतिक विभागाचे समन्वयक म्हणून किरण चौधरी आणि त्यांची टीम परिश्रम घेत आहेत.

# समाज घडवतानाच पत्रकाराने स्वतःच्या आरोग्याकडेही लक्ष द्यावे : आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे

## मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त पत्रकार आरोग्य तपासणी शिबिराला उत्तम प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०३ डिसेंबर**

लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून आपण माध्यमांकडे पाहतो. नेहमीच माध्यमाने समाजाच्या जडणघडणीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे . शोषित , पीडित, वंचितांच्या न्याय हक्कासाठी आपल्या लेखणीतून आणि टीव्ही चॅनलच्या माध्यमातून लढा उभारणाऱ्या पत्रकारांनी नेहमीच संघर्ष केला आहे. हा संघर्ष करत असताना आणि लोकशाहीला बळकटी देत असताना पत्रकारांनी स्वतःच्याही आरोग्याकडे लक्ष द्यावे असे आवाहन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी केले आहे.

मराठी पत्रकारितेची मातृसंस्था असलेल्या मराठी पत्रकार परिषद मुंबई च्या ८६ व्या वर्धापन दिनानिमित्त नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघ आणि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने आज संग्रामजी पोमदे महापालिका रुग्णालय,जंगमवाडी येथे पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते . यावेळी जिल्हा मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तथा ज्येष्ठ संपादक गोवर्धन बियाणी , महापालिकेचे उपायुक्त अजितपालसिंग संधू , महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश बीसेन , विभागीय संघटक प्रकाश कांबळे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिराचे सूत्रसंचालन जिल्हा सरचिटणीस राम तरटे यांनी केले तर आभार नरेश दंडवते यांनी मांडले.

आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य शिबिरात पत्रकारांच्या विविध रक्त चाचण्या करण्यात आल्या. नेत्र तपासणीही यावेळी करण्यात आली . या शिबिरात ४५ पत्रकारानी सहभाग नोंदवला. दरम्यान यावेळी बोलताना आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे म्हणाले की, पत्रकारांचे जीवन हे सतत धावपळीचे आणि अस्थिर असे



आहे. त्यामुळे त्यांना आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. खरे तर पत्रकार हा चोवीस तास कामावर असतो . परिणामी त्याला स्वतःच्याच आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी वेळ मिळत नाही. सर्वसामान्य नागरिकांच्या न्याय हक्कासाठी संघर्ष करणारा पत्रकार स्वतःकडे लक्ष देत नाही. त्यामुळे त्याच्या आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्यानंतर त्याचे दुषपरिणाम त्याच्या कुटुंबाला भोगावे लागतात. ही बाब लक्षात घेता पत्रकारांनी आपल्या अत्यंत व्यस्त दैनंदिन कामातूनही स्वतःसाठी किमान एक तास काढून आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी . अशा शिबिरांचा लाभ घ्यावा . ज्यामुळे आपण सुखी राहिल्यानंतर आपले कुटुंब सुखी राहील याची जाणीव ठेवणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. प्रास्ताविक व्यक्त करताना जिल्हाध्यक्ष तथा ज्येष्ठ संपादक गोवर्धन बियाणी म्हणाले की , मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी राज्यभर पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे कार्यक्रम आयोजित केले जातात . नांदेड जिल्ह्यातही नांदेडसह तालुका पातळीवर ही अशी आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आली आहेत . खऱ्या अर्थाने पत्रकारांचा कणा म्हणून एस एम देशमुख यांच्या नेतृत्वाकडे आपण पाहतो. त्यांच्या आदेशानुसारच आजचे हे शिबिर पार पडत आहे . खरे तर पत्रकारांनी स्वतःच्या आरोग्याची अधिक काळजी घेणे गरजेचे आहे. कारण आपल्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर आपल्या कुटुंबाचे आभाळ होते याची जाणीव ठेवण्याची आवश्यकता असल्याचे बियाणी यावेळी म्हणाले.

नांदेड वाघाळा शहर महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ.सुरेशसिंह बिसेन यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.हनमंत रिठ्ठे,डॉ.बद्दीओद्दीन, डॉ. कल्याण पवार यांच्यासह शेख रफिख,विनोद सोनकांबळे, स्वाती शेषेराव सरोदे,प्रभा रामचंद्र वाघमारे,अमोल दत्तात्रय कावळे,मनीषा मारोती मुनेश्वर, पुजा राजेंद्र दुधाडे,नसरिन मो. साब पिंजारी,महादेवी पंडित गजभारे,प्रविण चिंचोलकर, शिला देशमुख,राहुल दाचावार आदी महापालिका व महालॅबच्या आरोग्य कर्मचारी आणि आशा वर्कर यांनी रक्तचाचणी व आरोग्य तपासणीसाठी परिश्रम घेतले. तर लायन्स क्लबचे अध्यक्ष राजेश लोटिया,सेक्रेटरी प्रविण अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली लायन्स क्लबचे मॅनेजर (व्यवस्थापक) शेख सुलेमान यांच्यासह डॉ.मंजेश्री पवार,डॉ.वैशाली दगडे,राम शिंदे,गजानन शेंडेराव,सोमनाथ माने,नम्रता भुताडे आदींनी पत्रकारांची नेत्रतपासणी केली.

## अग्रलेख...

# ज्याचा त्याचा आत्मक्लेश

योगायोग-चमत्कार आदी बाबी म्हणजे निव्वळ अंधश्रद्धा असतात, याबाबत बहुधा कोणाचेच दुमत नसले, तरी कधी कधी सामान्य समजुतींना अचंबित करावयास ज्या काही घटना घडून जातात, त्यांना नेमके काय नाव द्यावचे, असा प्रश्न योगायोग किंवा चमत्कारांस न मानणाऱ्यांनाही पडतो. त्यास चमत्कार वगैरे संबोधून अंधश्रद्धांच्या समजुतीस खतपाणी घालणे जमतही नाही आणि तो चमत्कार नाही हे मान्य करणेही जमत नाही, अशी अवघड स्थिती होऊन बसते. धूर्त माणसांनी अशा घटनांकरिता एक पर्यायी व निरुपद्रवी शब्द शोधून काढला आहे. हा शब्द वापरल्यास त्यांच्यावर अंधश्रद्धेचा असा शिक्का बसत नाही; असा हा सरळमार्गी शब्द म्हणजे, अनाकलनीय! कोणत्याही अनपेक्षित घटनेचे विश्लेषण करण्यासाठी हा शब्द अशा लोकांस पुरेसा असतो. त्यामध्ये चमत्काराचा अंश असतो, निव्वळ योगायोगाची शंकाही असते; अंधश्रद्धेचा मात्र लवलेश नसतो. म्हणूनच महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा प्रचंड धुव्वा उडून महायुतीस प्रचंड बहुमत मिळाले. विश्लेषणाची नेमकी आफत टाळण्यासाठी काही धूर्त राजकारण्यांनी निकालाचे विश्लेषण करताना 'अनाकलनीय' अशा एकाच शब्दाचा वापर केला. पण सगळेच राजकीय पक्ष तसे नसतात. त्यांना निकालाचे विश्लेषण करावयाचे असते आणि आपल्या वाट्याला जे काही आले आहे, त्याच्या नामुष्कीला स्पर्श न करता दुसऱ्याच्या वाट्यास आलेले खोटे आहे हेदेखील दाखवायचे असते. म्हणूनच निवडणुकीच्या निकालानंतर वेगवेगळ्या कारणांचे खापर वेगवेगळ्या व्यवस्थांवर, नेत्यांवर व पक्षांच्या माथ्यावर फोडण्याची जणू चढाओढ लागली आहे. या चढाओढीत आपल्या वाट्याला आलेल्या परिणामांची प्रामाणिक मीमांसा करण्याचे धाडस अजून कोणी उघडपणे दाखविलेले नाही. आपल्या पराभवास अन्य बाबी कशा कारणीभूत आहेत, हे दाखविण्याची स्पर्धा मात्र सुरू झाली आहे. म्हणूनच मुख्यत्वेकरून आजपर्यंतच्या जवळपास सर्व निवडणुकांच्या निकालानंतर घेतला जाणाऱ्या मतदान यंत्रांवरील आक्षेपाचाच आधार यावेळीदेखील घेतला जात आहे. साहजिकच महायुतीच्या महाविजयास मतदान यंत्रातील संशयास्पद फेरफार हेच कारण असल्याचा निराधार आक्षेप घेऊन त्या मुद्यावर रान उठविण्याचा विरोधकांचा विचार असतानाच आता निवडणूक आयोगाने त्याबाबत ठोस भूमिका घेतली हे योग्य झाले. 'बाप दाखव नाही तर श्राद्ध कर' अशी एक म्हण आहे. ती आठवावी अशी स्थिती आयोगाच्या नव्या भूमिकेमुळे विरोधकांच्या वाट्याला आता येईल, तेव्हा या आक्षेपाची आक्रमक धार कदाचित कमी होईल, पण पराभवाची प्रामाणिक मीमांसा करण्याची गरज मात्र अजूनही कोणाच्या फारशी लक्षात आली नाही. या निवडणुकीने नेमका कोणता धडा शिकविला आणि त्यापासून आपण नेमका कोणता बोध घ्यावा, हे गोंधळलेल्या विरोधकांनी अजूनही लक्षात घेतलेले नाही.

लोकशाही राज्यव्यवस्थेत प्रबळ विरोधक हा सत्ताधाऱ्यांवरील अंकुश मानला जातो. आपली अवस्था अधिकाधिक क्षीण करून घेणाऱ्या विरोधकांनी लोकशाहीची ही अपेक्षा पूर्ण करण्याकरिता किमान आवश्यक कार्यक्रम राबविला पाहिजे. त्यासाठी भूतकाळातील असंख्य चुका शोधण्याकरिता आत्मपरीक्षण करण्याची त्यांना गरज आहे. पण तसे न होता, महाविकास आघाडीने किंवा भाजपाने विजयाच्या वारूवर आपली मांड कशी ठोकली, याचा शोध घेण्यातच सारे विरोधक अजूनही चाचपडत आहेत असे दिसते. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक हानी काँग्रेसची झाली आहे. राष्ट्रीय स्तरावरील या पक्षाची महाराष्ट्रातील कामगिरी मात्र ऐतिहासिक नीचांकी ठरावी एवढी खाली घसरली आहे. त्यामुळे पराजिताच्या रांगेतील अन्य पक्षांच्या सुरात सूर मिसळून केवळ मतदान यंत्रांवर खापर फोडण्यापेक्षा रडगाणी गाण्याऐवजी आत्मपरीक्षणाचा प्रामाणिक प्रयत्न करावयास हवा. तो तसा होणे सद्य:स्थितीत तरी फारसे शक्य दिसत नाही. मतदान यंत्रांच्या नावाने सुरू असलेली मोहीम कायम ठेवण्याचा कटु व आत्मवंचना करणारा निर्णय काँग्रेसला नाईलाजाने घ्यावा लागला असावा. महाराष्ट्रातील कराड मतदारसंघातून पराभूत झालेले माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण हे काँग्रेसमधील संयमी व प्रामाणिक नेते म्हणून ओळखले जातात. मतदान यंत्रांच्या नावाने घेतले जाणारे आक्षेप योग्य नाहीत, असा सुरुवातीस लावलेला सूर आता त्यांनाही बदलावा लागेल व श्रेष्ठींच्या सुरात सूर मिसळावा लागेल, असे दिसत आहे. दुसरीकडे ठोस पुरावे असल्याखेरीज मतदान यंत्रांवर आक्षेप घेता येणार नाही, असा सावध सूर लावणाऱ्या शरद पवारांच्या पक्षात मात्र सर्व स्तरांतून मतदान यंत्राविरोधाचे आवाज सातत्याने उमटत आहेत. नव्वदीच्या घरातील ज्येष्ठ कामगार नेते बाबा आढाव यांनीही मतदान यंत्रावर प्रश्नचिन्हे उमटवत सुरू केलेल्या आत्मक्लेश आंदोलनामुळे जणू विरोधकांना मोठेच बळ मिळाल्याचे चित्र महाराष्ट्रात उभे करण्याचा विरोधकांचा प्रयत्न सुरू झाला आहे. ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे यांच्या आश्वासनानंतर बाबा आढाव यांनी आपले आत्मक्लेश आंदोलन समाप्त केले. त्याआधी शरद पवारांनी जातीने बाबा आढाव यांची भेट घेऊन या वयातही त्यांनी स्वीकारलेला आत्मक्लेशाचा मार्ग योग्य असल्याचा निर्वाळा दिला. राज्यातील विरोधकांची उरलीसुरली शक्ती मतदान यंत्रांच्या विरोधाकरिता एकवटत असताना निवडणूक आयोगाने आता कठोर पावले उचलून संभ्रमाचे वातावरण पसरविण्याच्या प्रयत्नांस पूर्णविराम देण्याची भूमिका घेतली हे योग्यच ठरले आहे. या यंत्रात कोणत्याही रीतीने आणि तंत्रज्ञानाने छेडछाड केली जात नाही, असा ठाम दावा आयोगाने वेळोवेळी केला आहे. हे यंत्र वायफाय किंवा ब्लूटूथ नेटवर्कला जोडले जाऊ शकत नाही. ते एक स्वतंत्र यंत्र असल्याने त्यामध्ये कोणतेही फेरफार करणे अशक्य असून देशाच्या सर्वोच्च न्यायालयानेही या यंत्राच्या विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब केले आहे. मतदान यंत्राबाबत कोणतीही शंका असल्यास त्याचे निवारण करण्याचे असंख्य मुद्दे आयोगाने आपल्या संकेतस्थळावर प्रसृत केले आहेत. त्याशिवाय यंत्रात छेडछाड केली जाऊ शकते हे सप्रमाण सिद्ध करून दाखविण्याचे आव्हानही आयोगाने वारंवार दिले आहे. तथापि, ते आव्हान न स्वीकारता, दोरीला साप समजून भुई थोपटण्याचा सोपा मार्ग स्वीकारून जनतेची दिशाभूल करण्याचे विरोधकांनी ठरविलेले दिसते.

थोडक्यात, मतदारांनी सजगपणा दाखवून आपल्यास स्पष्टपणे नाकारले हे वास्तव स्वीकारण्याची विरोधकांची तयारी नाही, हेच सध्याच्या निराधार आक्रस्ताळेपणावरून स्पष्ट होते. त्याखेरीज जनादेशाची मोडतोड करून सत्तासंपादनाच्या गणितात छेडछाड करण्याची संधी यावेळी विरोधकांस मिळणार नाही, याची सावध खबरदारीही मतदारांनी घेतली आहे. हा या निकालांचा अर्थ समजून घेण्याची विरोधकांची तयारी नसावी. पाच वर्षांपूर्वी २०१९ च्या निवडणुकीत मतदारांना राजकारणाचे अज्ञात असलेले डावपेच लढवून जनादेश डावलून सत्ता संपादन करता येते हे महाविकास आघाडीच्या राजकारणाने दाखवून दिले होते. मतदारांच्या भावना खुंटीवर टांगता येणे शक्य आहे, असाच त्या कृतीचा अर्थ होता. मतदारांस ती चूक पुढच्या पाच वर्षांतील राजकारणावरून उमगली आणि त्या चुकीची पुनरावृत्ती होणार नाही किंवा तशी पुसटशी संधी विरोधकांस मिळणार नाही, याची पुरेपूर खबरदारी घेऊनच मतदार मतदान केंद्रांवर पोहोचला, हे वास्तव समजून घेण्याची विरोधकांना इच्छा नसेल, तर केवळ मतदान यंत्रांच्या नावाने भुई थोपटून मतदार संभ्रमात पडेल हा समज असमंजसपणाचा ठरेल. ठोस निर्णय घेण्याची वेळ आली आहे, असा स्पष्ट दावा काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी शुक्रवारी पक्षाच्या कार्यकारिणी बैठकीत बोलताना केला. पण तसे निर्णय घेतल्यास ज्या काही नेत्यांवर कठोरपणे पराभवाचे खापर फोडावेच लागेल, त्यांचे नाव घेण्याची तरी पक्षाची हिंमत आहे का, याचे उत्तर शोधावेच लागेल. ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे हे अजूनही महाराष्ट्राचे कुटुंबप्रमुख असल्याच्या समजुतीतच मश्गूल आहेत. या निकालाने शिकविलेला धडा पचविणे सोपे नाही, हे महाराष्ट्रास ठावूक आहे. त्यामुळे केवळ आक्रस्ताळेपणा करणाऱ्यांस काही काळ तशी संधी देऊन आत्मक्लेशाचे दुःख हलके होऊ द्यावे, हेच योग्य!

## आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# कॅनडात खलिस्तान्यांची एवढी वरवर का?

(उत्तरार्ध)

कॅनडामध्ये चार भारतीय नागरिकांवर हरदीप सिंग निज्जरच्या हत्येशी संबंध असल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. करण ब्रार, आमंदीप सिंग, कमलप्रीत सिंग आणि करणप्रीत सिंग अशी या चार आरोपींची नावे आहेत. अशा प्रकरणी काही प्राथमिक स्वरूपाचे टप्पे पार पाडायचे असतात. यामुळे आरोपींवर ठेवण्यात आलेले आरोप ज्या साक्षीदारांच्या कथनावर आधारित असतात, त्यांची उलटतपासणी करण्याची संधी आरोपींच्या वकिलांना मिळत असते. ही संधी न देता एकदम वरिष्ठ न्यायालयातच खटल्याला प्रारंभ केला जाणार आहे. हे सर्व खलिस्तान्यांना खूश करण्यासाठी केले जात आहे.

कॅनडामध्ये खलिस्तान्यांची एवढी वरवर का केली जाते, हा प्रश्न भारतात सर्वसाधारण नागरिकाला पडणे साहजिक आहे. याबाबत कॅनेडियन राजकारण्यांचे म्हणणे असे आहे की, 'वैशाखी'सारख्या सणासुदीच्या दिवशी जेव्हा आम्ही लाखांवर लोक एकत्र आलेले पाहतो तेव्हा त्यांची मते आपल्याला मिळावी म्हणून त्यांच्याशी जवळीक साधावी, असाच विचार कोणताही राजकारणी करील. त्यांना दुखावणे व त्यांची मते गमावणे आमच्यासाठी शहाणपणाचे ठरणार नाही. काही शिखांच्या अतिरेकी विचारसरणीची आणि खलिस्तानप्रश्नी त्यांनी केलेल्या कारवायांची माहिती कॅनडा प्रशासनाला नव्हती, असे नाही. सुरुवातीच्या शासकीय अहवालात शिखांचा अतिरेकी व्यवहार, खलिस्तानी कारवाया, असे शब्दप्रयोग असतसुद्धा! पुढे पुढे मात्र हे शब्द वगळले जाऊ लागले. त्यावेळचे पंजाबचे मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदर सिंग यांनी या अनुल्लेखावर टीका केली होती, याची आठवण अनेकांना असेलही. याशिवाय अमरिंदर सिंग यांनी स्वत: कॅनडाच्या पंतप्रधानांच्या हाती, म्हणजे खुद्द ट्रुडो यांच्या हाती, कॅनडातील शीख अतिरेक्यांची तपशीलवार यादी सोपविली होती. मुख्य असे की, या यादीत हरदीप सिंग निज्जर याचेही नाव होते. कॅनेडियन शासनाच्या आजकालच्या प्रकटनांमध्ये अतिरेक (एक्स्ट्रिमिझम) हा शब्दप्रयोग एखाद्या समुदायाच्या बाबतीत करणे योग्य ठरणार नाही. ती एक वृत्ती आहे, ते एक तत्त्वज्ञान (आयडिऑलॉजी) आहे. त्या तत्त्वज्ञानाचा विरोध व्हावा, एखाद्या समुदायाचा नाही, अशी भूमिका घेतली जाताना का दिसते, या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण नाही. कॅनडात १३ एप्रिल २०२४ ला खालसा दिन (खालसा पंथाचा स्थापना दिवस) साजरा झाला. त्याला पंतप्रधान ट्रुडो आणि विरोधी पक्ष नेतेही उपस्थित होते. याबाबत आक्षेप असण्याचे कारण नाही; पण यावेळी त्यांच्या उपस्थितीत खलिस्तानचे समर्थन करणाऱ्या घोषणा देण्यात आल्या होत्या. म्हणून भारतातील कॅनडाच्या डेप्युटी हायकमिश्नरांना बोलावून भारताने याबाबतचा आपला निषेध नोंदविला होता.

२०२५ मध्ये कॅनडात सार्वत्रिक निवडणुका आहेत. मात्र, परिस्थिती ट्रुडो यांना अनुकूल नाही. महागाई, बेरोजगारी, आरोग्य यंत्रणेची दुरवस्था आदी अनेक कारणांमुळे मतदार नाराज आहेत. त्यांचे प्रतिस्पर्धी आणि हुजूर पक्षाचे नेते पियर पॉलिव्हर यांनी कल चाचण्यांत ट्रुडो यांच्यावर आघाडी घेतली आहे. ट्रुडो यांच्या नेतृत्वाखाली लिबरल पक्षाने निवडणूक लढविल्यास सत्ता मिळणार नाही, असा आरोप करून त्यांच्याच पक्षातील नेते त्यांचा राजीनामा मागत आहेत. या पृष्ठभूमीवर ट्रुडो वेगवेगळ्या समाजघटकांना आपल्या बाजूने वळवण्याच्या खटपटीत आहेत. कॅनडात साडेसात लाखांहून अधिक असलेल्या शीख समाजाची एकगठ्ठा मते टिकून राहावीत, यासाठी ट्रुडो यांची धडपड सुरू आहे. त्यातच जगमित सिंग धालीवाल यांच्या 'न्यू डेमोक्रेटिक' पक्षाने ट्रुडो यांच्या लिबरल पक्षाचा पाठिंबा काढून घेतला आहे. भारतात खलिस्तान्यांविरुद्ध सरकारने सुरू केलेल्या मोहिमेनंतर अनेक खलिस्तान्यांनी कॅनडात आश्रय घेतला आहे. त्यातले अनेक जगमितचे मतदार आहेत. खुद्द ट्रुडो यांच्या मतदारसंघातही अनेक शीख मतदार आहेत. त्यांची मर्जी राखण्यासाठी ट्रुडोंनी त्यांच्या देशात खलिस्तान्यांना मोकाट तर सोडले आहेच; पण ते त्यांच्या वतीने भारतावर आरोप करीत असतात. त्यातूनच निज्जर प्रकरणात ते भारतावर आरोप करीत आहेत. निज्जर हत्या प्रकरणाचा संबंध भारताशी जोडून ट्रुडो यांनी खलिस्तानवाद्यांना चुचकारण्याचा प्रयत्न चालविला आहे. ट्रुडो यांचे वडील पियर ट्रुडो यांनीही आपल्या कार्यकाळात हेच राजकारण केले होते. खलिस्तानींचा पाठिंबा मिळविण्यासाठी त्यांनी भारताशी वितुष्ट घेतले. त्यानंतर आता पुन्हा दोन्ही देशांतील संबंध ताणले गेले आहेत. ट्रुडो यांना 'जशास तसे' उत्तर तर द्यायलाच हवे. ट्रुडो म्हणजे कॅनडा नाही, हे विसरून चालणार नाही.

कॅनडात मारल्या गेलेल्या मूळच्या भारतीय नागरिक असलेल्या हरदीपसिंग निज्जरवर भारतामध्ये ९ खटले प्रलंबित आहेत. भारताच्या नॅशनल इन्व्हेस्टिगेटिंग एजन्सीने कॅनडा शासनाकडे त्याच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत पाठविण्याची विनंती केली होती. हे प्रमाणपत्र भारतातील खटल्यातील पुढील कारवाईसाठी आवश्यक होते. पण ही विनंती मान्य न करता कॅनेडियन अधिकाऱ्यांनी काही प्रतिप्रश्न उपस्थित केले आहेत आणि उलट विचारले आहे की, आमच्या नागरिकाच्या मृत्यूच्या प्रमाणपत्राची प्रत भारताने का मागावी?

प्रत्यार्पणासाठी भारताने पाठविलेल्या २६ पैकी फक्त ५ विनंत्याच कॅनडाने मार्गी लावल्या. बाकीच्या प्रलंबित आहेत. भारताच्या नॅशनल इन्व्हेस्टिगेटिंग एजन्सीने इंटरपोलकडे गुरपतवंत सिंग पन्नू विरुद्ध रेडकॉर्नर नोटीस जारी करण्याची मागणीही केली आहे. गुरपतवंत सिंग पन्नू हा खलिस्तानी दहशतवादी अमेरिकेचा नागरिक आहे. नॅशनल इन्व्हेस्टिगेटिंग एजन्सीला सहा गुन्ह्यांच्या संदर्भात त्याची चौकशी करायची आहे. या प्रश्नीही अजून काहीही घडले नाही. गुरपतवंत सिंग पन्नूला न्यू यॉर्क येथे मारण्याचा प्रयत्न झाला होता. या प्रकरणातही भारतीय अधिकाऱ्याचा संबंध आहे, असे अमेरिकन शासनाचे मत आहे. गेल्या आठवड्यात विकास यादव या भारतीय रिसर्च ॲण्ड ॲनालिसिस विंगच्या माजी अधिकाऱ्याचा हात आहे, असा आरोप अमेरिकेने केला आहे. भारताचे अधिकारी कॅनडामध्ये गुन्हेगारी कारवायात गुंतले आहेत, ही माहिती आम्ही अगोदर जनतेला न सांगता वॉशिंग्टन पोस्टच्या वार्ताहराला दिल्याचे कॅनडाने मान्य केले आहे. दुसऱ्या बाजूकडून (भारताकडून) प्रसारित झालेल्या वृत्ताला उत्तर म्हणून आम्ही असे केले, असेही लंगडे स्पष्टीकरण कॅनडाच्या अधिकाऱ्यांनी दिले आहे.

जोपर्यंत थेट पुरावे मिळत नाहीत (आणि ते नसल्यामुळे मिळणारही नाहीत), तोपर्यंत या प्रकरणात फार काही होणार नाही. कॅनडात पुढच्या वर्षी ऑक्टोबरमध्ये संसदीय निवडणुका आहेत. तोपर्यंत ट्रुडो हे प्रकरण लावून धरतील. नंतरचे निवडणूक निकालावर अवलंबून राहील. पन्नू प्रकरणात भारताने चौकशी समिती नेमून अमेरिकेचे काहीसे समाधान केले आहे. अमेरिकेतील निवडणूक झाल्यानंतर नवीन सरकार आले आहे. त्याच्याशी वाटाघाटी करून तोडगा काढण्याचा प्रयत्न होईल. पण एक गोष्ट नक्की की, या प्रकरणांवरून मतपेटीच्या राजकारणासाठी भारताशी संबंध बिघडविणे कॅनडा किंवा अमेरिका यांना परवडणारे नाही. २०१५ पासून ट्रुडो सरकार कॅनडात सत्तेवर आहे. २०२५ मध्ये कॅनडात सार्वत्रिक निवडणुका आहेत. ट्रुडो यांच्या लिबरल पार्टीला असलेला जनाधार दिवसेंदिवस घसरत चालला आहे. शिखांची मनधरणी करूनही त्यांच्या पक्षाला पाठिंबा देणाऱ्या शिखांची संख्याही रोडावतच चालली आहे. एवढी वरवर करूनही शिखांचा एकमुखी पाठिंबा मिळविण्याचा मूळ हेतू साध्य होईल का?

९४२२८०४४३०

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# जगण्याच्या कलेत सामावलाय आनंद!

माणसाचे आयुष्य हे सुख-दुःख, यश-अपयश, आशा-निराशा, अचानक येणारी संकटे आणि अनेक अडचणींनी भरलेले असते. जीवनामधील प्रतिकूलतेवर, संकटावर आणि बिकट परिस्थितीवर मात करून आपल्या जगण्यामध्ये आनंद फुलविणे ही एक कला आहे. ती आत्मसात केली तर मनुष्याचे जीवन जगणे सहज सोपे होते. सहजासहजी सुखावह आणि आनंदी जीवन जगणे कोणालाच शक्य नसले, तरी आनंदाने जगणे ही एक कला आहे. ती सहज शक्य होईल असेही नाही. ही कला आत्मसात करणे जर मनुष्याला जमले तर जीवन हे आनंदगाणे होते. जगण्याच्या वाटेवरचा प्रवास सुखकर होतो. आजच्या आधुनिक आणि धावपळीच्या काळामध्ये प्रत्येक जण आपल्यावर असलेल्या जबाबदारीच्या ओझ्याखाली दबून पायाला चाके लागल्यागत धावपळ करीत असतो. कोणत्याच व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीसाठी वेळ नाही. नात्या-नात्यांमधील हरविलेली आपुलकी सर्वाधिक दुःखाचे कारण असल्याचे अमेरिकेमध्ये झालेल्या एका संशोधनाने सिद्ध केले आहे. एकटेपणा हा माणसाचा सर्वांत मोठा शत्रू असून त्यामुळे मनुष्य नैराश्याच्या गर्तेमध्ये लोटला जात आहे. जगामधील ही सर्वाधिक गंभीर समस्या आहे. जीवनामध्ये आलेल्या आधुनिकतेने प्रत्येक व्यक्ती भरकटत चालली आहे. अध्यात्म आणि संस्कृतीशी फारकत घेऊन आम्ही आधुनिकतेचा मार्ग स्वीकारल्यास त्याचे परिणामही त्याच स्वरूपामध्ये आमच्या पदरात पडतील याचा आम्ही कधीच विचार करीत नाही. भारतामध्ये एकत्रित कुटुंब पद्धतीचा दिवसेंदिवस ऱ्हास होत असल्याने त्यापासून मिळणाऱ्या आनंदाला नवीन पिढी मुकली आहे. सदैव आनंदी राहण्यासाठी नेहमी सकारात्मक विचार केला पाहिजे. नकारात्मकतेचा मनावर आणि शरीरावर गंभीर व विपरीत परिणाम होतो. तणाव हा आयुष्याचा शत्रू आहे, हे माहीत असूनही आम्ही तणावापासून मुक्त होत नाही. जगामधील कोणतीच व्यक्ती



परिपूर्ण नाही आणि असे होणे हे कदापिही शक्य नाही. त्यामुळे जे काही आहे, ते सांभाळून जीवनाची वाटचाल सुरू ठेवली तर जीवन जगणे सहज सुकर होते. त्यासाठी स्वतःमधील उणिवा ओळखून होत असलेल्या चुकांना सुधारण्याचा प्रयत्न करायला हवा. प्रत्येक व्यक्तीमध्ये काहीतरी दोष असतातच; त्या दोषांची उजळणी करून त्या आपल्या आयुष्यातून हद्दपार केल्यास तीच व्यक्ती स्वतःला सांभाळून यशाच्या मार्गावर मार्गस्थ होते आणि जीवनामध्ये खऱ्या आनंदाचा संचार होतो. 'आनंद' हा बाजारामध्ये सहज मिळणारी कोणती वस्तू नव्हे; ती मनाला प्रसन्न करणारी एक आल्हाददायक अनुभूती आहे. ही अनुभूती जीवनामध्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. त्यासाठी सदैव सकारात्मक बाबींना जवळ करून दुसऱ्यालाही आनंद वितरित करायला शिकले पाहिजे. लोकांना त्याचे जीवन आनंदाच्या रंगांनी भरण्यास मदत केली पाहिजे. त्यामुळे स्वतःला परमोच्च आनंदाची अनुभूती होईल. या अनुभूतीसमोर जगामधील सर्वच बाबी गौण आहेत. लक्षात ठेवा, तुम्ही जगाला जे काही देता त्याच्या दुप्पट परतावा मिळतो, हा सृष्टीचा अलिखित नियम आहे. त्यासाठी काहीही खर्च करण्याची गरज नाही. चंचल मनाला आवरून भौतिक सुखाच्या नादी लागून मनुष्य स्वतः दुःखाला आमंत्रित करीत असतो. क्षणिक सुख हे अपार दुःखाचे कारण ठरू शकते. क्षणिक सुख हे मृगजळासारखे असते, हे सर्वांनाच समजते. तरीही आपण त्यामागे धावून आयुष्याची राखरांगोळी करतो. आनंदी जीवन जगण्याचा अर्थ असाही नाही की, जीवनामधील सर्व समस्या आपोआप नाहीशा होतील. आपल्या काटेरी मार्गावर येणाऱ्या प्रत्येक आव्हानांना न भिता सामोरे गेल्यास जीवनातील चढ-उतार स्वीकारणे सहज शक्य होते. जीवनामध्ये येणारी प्रत्येक समस्या ही आपल्या सोबत त्याच्याशी लढण्याची ताकद घेऊन येत असते. खरी समस्या आहे त्यास सकारात्मकतेने ओळखण्याची. एक मनुष्य म्हणून आपण वेदना, दुःख आणि येणाऱ्या अडचणींपासून मुक्त असे जीवन जगण्यास धडपड करीत असतो. आपले अस्तित्व सर्व समस्यामुक्त असावे, अशी प्रत्येकाची इच्छा असते. त्यासाठी आपली सर्व धडपड असते. परंतु, ही मानसिकता म्हणजे जीवनामधील परमोच्च आनंदाचा क्षण आहे का? हा एक गंभीर चिंतनाचा विषय आहे. जीवनामध्ये केलेल्या कर्माचे फळ प्रत्येकाला स्वतः भोगावे लागते, या निसर्गाच्या नियमाला न डावलता शुद्ध मनाने दुसऱ्यास आनंद देणारे कर्म केल्यास हेच कर्म भावी आयुष्यात आपणास नक्कीच सव्याज परत मिळते.

९८८१७१७८५६

## इतस्तत:

**दत्तात्रेय आंबुलकर**

# उद्योगपूरक प्रगतिशील संशोधन व तंत्रज्ञान

आजच्या माहिती-तंत्रज्ञान युगात भारतातील जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये संशोधन प्रक्रियेने वेग घेतलेला दिसतो. त्यातच मोदी सरकारच्या 'नॅशनल रिसर्च फाऊंडेशन'सारख्या नव्या मोहिमेमुळे ही प्रक्रिया अधिक गतिमान झाली आहे. त्यानिमित्ताने भारतातील विविध क्षेत्रांतील लक्षवेधी तंत्रज्ञानाधारित संशोधनाचा हा घेतलेला आढावा.

प्रत्येक देशाच्या उद्योग-विकासाच्या प्रगतीसह एकूणच अर्थकारणाला गती देण्यासाठी अभियांत्रिकी-तंत्रज्ञानासह उद्योग प्रक्रियेला सातत्याने अधिकाधिक प्रगत व अद्ययावत करण्याची गरज असते. आपला देशही त्याला अपवाद नाही. विशेषत: सद्य:स्थितीत जागतिक स्तरावर वेगाने आपल्या विकासाचा डंका वाजवणाऱ्या भारताच्या आर्थिक-औद्योगिक संदर्भात तर ही बाब विशेष महत्त्वपूर्ण ठरते. या पृष्ठभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नव्यानेच घोषित केलेल्या देशाच्या संशोधन क्षेत्रातील कामगिरी व योगदान विशेष गतिमान करण्यासाठी 'नॅशनल रिसर्च फाऊंडेशन' या नव्या मोहिमेचा नव्या संदर्भासह आढावा घेणे महत्त्वाचे ठरते. सकृद्दर्शनी या नव्या संशोधनप्रधान मोहिमेसाठी आगामी पाच वर्षांसाठी ५० हजार कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये उद्योग-व्यवसायाची नजीकच्या भविष्यासह आगामी काळातील गरजा लक्षात घेऊन व त्याचा अभ्यास करून भारताला संशोधन-समृद्ध करण्यावर भर दिला जाणार आहे, हे विशेष. योजनेच्या निमित्ताने पंतप्रधानांनी मांडलेली भूमिका म्हणजे आपण संशोधन क्षेत्रात केवळ पाश्चात्त्यांसह परकीयांचे अनुकरण करणेच पुरेसे नसून देशांतर्गतच नव्हे, तर परदेशातील उद्योगांना आवश्यक अशा ज्ञान-तंत्रज्ञानाच्या गरजांची पूर्तता करण्याचे आव्हान यशस्वीपणे स्वीकारणे गरजेचे आहे. यासाठी त्यांनी आधुनिकता व कल्पकतेच्या आधारे विज्ञान-तंत्रज्ञानाच्या जोडीलाच अनुसंधान म्हणजेच संशोधनाची कास धरण्यावर भर दिला आहे.

केंद्र सरकारचा संशोधनावर भर देणारा हा धोरणात्मक निर्णय अनेक कार्यांना महत्त्वाचा व दूरगामी स्वरूपात परिणामकारक ठरणारा आहे. यासंदर्भातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, आज आपली आर्थिक-औद्योगिक प्रगती व परिस्थिती ही उत्साहवर्धक असली, तरी त्याला अद्याप संशोधनाची पुरेशी साथ मिळालेली नाही. याचाच परिणाम म्हणून भारताला प्रामुख्याने अमेरिकेसारख्या देशावर तंत्रज्ञानापासून अंतराळ संशोधनासारख्या महत्त्वपूर्ण विषयातील संशोधन व प्रगत ज्ञान मिळण्यासाठी अवलंबून राहावे लागते. ही बाब केवळ अडचणीची व परावलंबित्वाचीच नव्हे, तर जोखमीचीसुद्धा ठरू शकते. एरवी जागतिक पातळीवर चर्चेत असणारी 'अमेरिकन संशोधन पद्धती' ही मुख्यत: संशोधन व त्याचे प्रकाशन याच पद्धतीवर भर देते. परिणामी तिकडे संशोधनाची भरमार असली, तरी त्याच्या प्रकाशनावर भर देण्यात येत असल्याने व त्याकामी संशोधक-प्रकाशक मंडळींना भरपूर पैसा-मोबदला मिळत असल्याने या संशोधनाचा उपयोग प्रत्यक्ष तंत्रज्ञान वा त्याच्याशी निगडित उद्योग प्रक्रिया अधिक सुधारित व प्रगत होण्यासाठी होतोच असे नाही. अधिकांश संशोधनाचे संशोधन पत्रिकेमध्ये प्रकाशन व त्यांचे संकलन इथवरच त्यांची मजल असते. त्यामुळेच इतर प्रगत अथवा प्रगतिशील तुलनेत 'संशोधन' या विषयावर अमेरिका कित्येक पटींनी अधिक खर्च करीत असली, तरी तेथील संशोधनाचा प्रत्यक्ष उपयोग अथवा उपयुक्तता मर्यादित स्वरूपातच राहते.

याउलट आपल्याकडील 'दर्प' म्हणजेच "Defence Advanced Research Projects Agency" सारखे उदाहरण विशेष उल्लेखनीय म्हणून देता येईल. या संशोधन प्रयोगाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, या संशोधनाचा मूळ विषय व मुख्य संगणक पद्धतीच्या माध्यमातून सार्वजनिक स्वरूपात संबंधितांच्या संदर्भ व अभ्यासासाठी उपलब्ध आहेत. त्याचा फायदा अभ्यासक-संशोधक या उभयतांना होत असतो. संशोधनाचा गोषवारा संगणकीय पद्धतीने उपलब्ध करून देण्याचा हा पायंडा जागतिक संशोधनाच्या संदर्भात मान्यताप्राप्त ठरला आहे. याचेच प्रमुख उदाहरण म्हणजे 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी मद्रास'द्वारा विशेष जागतिक पुढाकार स्वरूपात भारतीय उद्योग व शैक्षणिक संशोधन संस्थांच्या विशेष सहकार्यातून सुरू केलेल्या 'हेल्थ केअर टेक्नॉलॉजी इनोव्हेशन सेंटर'चे उदाहरण देण्यात येते.

चेन्नई येथे 'आयआयटी'मध्ये प्रस्थापित झालेल्या व जागतिक स्तरावर सक्षमपणे काम करणाऱ्या 'एचटीआयसी' संशोधन केंद्राने अल्पावधीतच उल्लेखनीय काम केले असून त्यामध्ये संशोधनावर आधारित असे विकसित तंत्रज्ञान अद्ययावत पद्धतीने सर्वदूर पोहोचविण्याचा विशेष समावेश करण्यात आला आहे. परिणामी देशांतर्गतच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर वैद्यकीय माहिती व त्याच्या उपचार पद्धतीसाठी करता येणारा प्रयोग आणि उपयोग आता ग्रामीण व दूरवरच्या वैद्यक-उपचार केंद्रांप्रमाणेच मोबाईल म्हणजेच चालत्या-फिरत्या वैद्यकीय केंद्रांना होऊ शकतो. 'मद्रास आयआयटी'चे हे संशोधन जागतिक स्तरावर अशाप्रकारे क्रांतिकारी ठरले आहे.

वैद्यक क्षेत्राशी संबंधित महत्त्वपूर्ण असे दुसरे उदाहरण म्हणून 'सुधा गोपाळकृष्णन् ब्रेन सेंटर'च्या संशोधन कामगिरीचा उल्लेख केला जातो. या केंद्राने मेंदू विकार व त्यावरील विशेष उपचार या संदर्भात 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा आधार घेण्याचे नवे व उल्लेखनीय असे काम केले आहे. मूलभूत सुविधा व इमारत बांधकाम क्षेत्रात 'आयआयटी मद्रास'ने जागतिक स्तरावर उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. या तंत्रज्ञानाच्या नावीन्याला व संशोधनपर तंत्रज्ञानाला पाश्चात्त्य देशांनी आधीच दाद दिली आहे. मुख्य म्हणजे, हे संशोधन पाश्चात्त्य देशांमध्ये अशा प्रकारच्या संशोधनासाठी येणाऱ्या खर्चाच्या तुलनेत कितीतरी पटींनी कमी आहे. याचाच आर्थिक विरोधाभास की काय, पण आज 'जागतिक बँक', 'आंतरराष्ट्रीय नाणेनिधी' व पाश्चात्त्य देशातील आर्थिक गुंतवणूक संस्था भारत आणि भारत सरकारला तंत्रज्ञान-संशोधनावर अधिक खर्चाची गुंतवणूक करण्याचा अनाहूत व फुकाचा सल्ला देत आहेत. या पाश्चिमात्य संस्थांनुसार सद्य:स्थितीत भारताची संशोधन क्षेत्रातील गुंतवणूक भारताच्या सकल घरेलू उत्पादन म्हणजेच जीडीपीच्या ०.६ टक्के आहे तर अमेरिकेची संशोधनावरील गुंतवणूक जीडीपीच्या दोन टक्के आणि चीनची तर तीन टक्के आहे, याचा दाखला दिला जातो. प्रत्यक्षात आज भारतात सेमीकंडक्टरसह कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक तंत्रज्ञान, सेंसर्स, नॅनो-टेक्नॉलॉजी या अधिकांश क्षेत्रात भारताने यापूर्वीच संशोधन केले आहे. याशिवाय अंतराळ तंत्रज्ञान यासारख्या प्रगत व खर्चीक क्षेत्रात भारताने केव्हाच यशस्वी आघाडी घेतली आहे. परिणामी भारताच्या प्रचलित व प्रस्तावित संशोधन गरजा लक्षात घेता, मर्यादित खर्चासह संशोधन करणे भारताला सहज शक्य आहे. पंतप्रधानांच्या नव्यानेच केलेल्या 'नॅशनल रिसर्च फाऊंडेशन'च्या संकल्पाने या विषयाला अधिक बळकटी लाभली आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### माझा पुनर्जन्मावर विश्वास बसला, तुमचाही बसावा

देवेंद्र फडणवीस हा नाना फडणवीसांचा पुनर्जन्म आहे असे मला नक्की वाटते. कारण, महायुतीचा लोकसभेत पराभव झाल्यावरही विधानसभा निवडणूक त्याच महायुती सोबत लढणे वाटते तितके सोपे नव्हते. विरोधी काय स्वकीय पण नाराज दिसत होते. अशा वेळी अत्यंत शांतपणे व मुत्सद्दीपणे जागावाटपाच्या वेळी त्यांनी मित्रपक्षांना दिलेल्या काही जागांवर भाजपाचे उमेदवार त्या पक्षांच्या चिन्हाखाली लढले पाहिजेत असा आग्रह धरला. त्या जागांसाठी शिंदे आणि अजित पवार यांच्याकडे तगडे उमेदवार नाहीत, असा तर्क त्यांनी दिला व तो त्यांच्या पचनी पाडला. जी फारच कठीण गोष्ट होती. उमेदवार भाजपाचे, चिन्ह शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे.

जेव्हा तुम्ही चांगली गोष्ट करता तेव्हा सज्जन शक्ती तुम्हाला मदत करतातच. यावेळी देखील संघ, समिती, संत मंडळी, विहिंप, बजरंग दल, जागरूक हिंदू संघटना महायुतीच्या मागे खंबीरपणे उभ्या राहिल्या. शत-प्रतिशत मतदान, राष्ट्र हित में मतदान, बटेंगे तो कटेंगे, एक है तो सेफ है, लाडकी बहीण, लाडका भाऊ, वृद्ध निराधार योजना सगळ्यांची अंमलबजावणी सुरू झाली. आता खरे संकट पुढे होते, जसे मागील वेळी भाजप १०६+ व शिवसेना ५६ असे १६१+ बहुमत असूनही शिवसेनेने ऐनवेळी दगा देत भाजपाला विरोधी बाकावर बसवले होते, बाकी इतिहास आपल्याला माहीत आहेच.

भाजपाला लढायला जागा मिळाल्या १५२, भाजपाचे विजयी उमेदवार १३२. शिवसेनेच्या चिन्हावर भाजपाचे ११ उमेदवार विजयी. राष्ट्रवादी अजित पवारांच्या चिन्हावर भाजपाचे ८ उमेदवार विजयी. अशा प्रकारे एकटी भाजपा आधीच १५१ जागांवर आहे. सरकार स्थापनेसाठी १४५ जागा हव्या तो आकडा पार करत भाजपाने पूर्ण बहुमत मिळवले आहे. या दोन्ही मित्रपक्षांपैकी कोणीही काही दगाफटका केला तर... (ते तसे बिलकूल करणार नाही) पण... पण.... राजकारणात केव्हाही काहीही घडू शकते आणि त्यावेळी भाजपचे हे १९ आमदार भाजपला साथ देतील. १३२+१९=१५१.

पण मला तरी वाटते देवेंद्र फडणवीस हेच नाना फडणवीसांचा पुनर्जन्म आहे. हिंदू अंधश्रद्धा म्हणा हवे तर, पण नाना फडणवीसांचा तोच करारीपणा, मुत्सद्दीपणा, शांतपणे करेक्ट कार्यक्रम करणे हे सर्वच गुण या माणसांत कसे?

**रवी वाघमारे**/नागपूर.

### हेल्मेटसक्ती नको

सध्या पुण्यासह महाराष्ट्रामध्ये रायडर आणि पिलिअन अशा दोघांनाही हेल्मेटसक्ती करण्याचा प्रयत्न होत आहे. यापूर्वीही अनेकदा हेल्मेटसक्तीचे प्रयोग झाले पण ते जनतेनेच उधळून लावले. बहुतेक शहरांमध्ये रस्त्यांची दुरवस्था आणि प्रचंड वाहतूक, यामुळे वेगात दुचाकी चालवणे अशक्य होते आहे. त्यामुळे दुचाकींचे अपघात अपवादानेच होत आहेत. त्यातही अशा काही अपघातांमध्ये हेल्मेट वापरल्यामुळे जीवाचा धोका टळेल असेही नाही. उलट हेल्मेट वापरल्यामुळे



वाहतुकीमधून दुचाकी चालवणे अवघड होते आणि इतरही अडचणी येतात, हा अनुभव अनेकांनी घेतला आहे. तेव्हा सरकारने असे निर्णय घेण्याऐवजी रस्त्यांची दुरुस्ती, सिग्नल्सची कार्यक्षमता, वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यावर भर द्यावा.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### काँग्रेसचे अदानी रडगाणे

काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी सातत्याने संसद अधिवेशनापूर्वी उद्योगपती गौतम अदानी यांच्यावर आरोप लावत असतात. नुकतेच अमेरिकेत अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांच्यावर तेथील न्यायालयाने आरोप केले आहे. यावरून आता विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी परत एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार टीका केली आहे. अदानींना अटक करायला हवी, पण पंतप्रधान मोदी हे करू शकत नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदींमध्ये अदानींना अटक करण्याची ताकद नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

या आधीही उद्योगपती गौतम अदानी यांच्या समूहाबाबत अमेरिकन हिंडेनबर्ग कंपनीद्वारा प्रकाशित झालेल्या अहवालावर सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेतील एकूणच आरोपाबाबत सत्यता पडताळून पाहण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने या क्षेत्रातील जाणकार तज्ज्ञांची समिती गठित केली होती. या समितीद्वारा तयार करण्यात आलेल्या अहवालानुसार अदानी आणि कंपनी यांनी कोणतेही चुकीचे अथवा गैर काम केले नसल्याचे सांगण्यात आले होते. जर राहुल गांधींना अदानींवरील भ्रष्टाचाराच्या आरोपांमध्ये तथ्य वाटत असेल तर त्यांनी आपल्या पक्षाच्या तेलंगणा, हिमाचल प्रदेशमधील काँग्रेस सरकारला त्यांच्याद्वारा केलेले अदानी समूहाशी केलेले करार रद्द करण्यास का सांगत नाही.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जि.प. प्रशालेत दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.३ डिसेंबर -**
देवणी तालुक्यातील जवळगा येथील जिल्हा परिषद प्रशालेत (ता.३) मंगळवारी दिवाळी अंकाचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनात विविध दिवाळी अंक उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

कार्यक्रमांची सुरूवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन पत्रकार आनंद अंकुलगे यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक सुरेंद्र चौहान होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे दिवाळी अंक वाचायला मिळावे यासाठी जि.प. प्रशालेत प्रथमच उपक्रम राबविण्यात आला असून दिवाळीनंतर वेगवेगळे दिवाळी अंक उपलब्ध करून दिले आहेत. दिवाळी अंकाची माहिती मिळावी म्हणून या दिवाळी अंकाचे प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. एकूण ३५ दिवाळी अंक प्रदर्शनात ठेवण्यात आले आहेत.

यावेळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष अनिल पाटील, मुख्याध्यापक सुरेंद्र चौहान, दत्तात्रय कदम, विठ्ठल केंद्रे, मंजुषा सुडे, सुनीता सावंत, लक्ष्मण चिंते, शिवकुमार बिरादार, विद्यार्थी आदि उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...



### नटवर्य श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे उद्घाटन

**लातूर, दि.३ डिसेंबर -**
नटवर्य श्रीराम गोजमगुंडे हे चित्रपट तसेच नाट्य कलेला पूर्णपणे वाहून घेतलेले महान व्यक्तिमत्व होते. आज त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही बाब मराठवाड्यातील कलाक्षेत्रासाठी अतिशय अभिमानस्पद असल्याचे प्रतिपादन बालरंगभूमी, मुंबईच्या उपाध्यक्षा दीपा क्षीरसागर यांनी केले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद जिल्हा शाखा लातूर आणि दयानंद कला महाविद्यालय (नाट्यशास्त्र विभाग) लातूरच्या वतीने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या नटवर्य श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे उद्घाटन रविवारी पार पडले. याप्रसंगी स्पर्धेचे निमंत्रक विक्रांत गोजमगुंडे, नाट्य परिषदेचे लातूर जिल्हाध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर, धनंजय बेंबडे, अजय गोजमगुंडे, निलेश सराफ, अमोल नानजकर, संघटक उमाकांत हुरदुडे, अविष्कार गोजमगुंडे, अनिल कांबळे, कल्याण वाघमारे, डॉ. अशोक आरदवाड, बाळकृष्ण धायगुडे, प्रदीप भोकरे, संजय अयाचित, अपर्णा गोवंडे, सुरेखा मदने, डॉ. भाग्यश्री कुलकर्णी, डॉ. मुकुंद भिसे, श्रुतिकांत ठाकूर, दीपरत्न निलंगेकर, अॅड. राणी स्वामी, सुधन्वा पत्की आदी मान्यवर उपस्थित होते.



### वीरशैव लिंगायत समाजाच्या वधू-वर परिचय मेळाव्याला प्रतिसाद

**लातूर, दि.३ डिसेंबर -**
वीरशैव लिंगायत समाजातील विवाह इच्छुकासाठी सर्वाधिक नोंदणी असलेली माहितीपुस्तिका दरवर्षी प्रकाशित केली जाते. महाराष्ट्रातील सर्वात मोठा विनामूल्य लिंगायत वधू-वर परिचय १२ वा राज्यस्तरीय मेळावा ३ नोव्हेंबर रोजी व्यापकरित्या पार पडला. त्याचा दुसरा भाग १ डिसेंबर रोजी वीरशैव समाज सांस्कृतिक भवन, खंडोबा गल्ली लातूर येथे मोठ्या थाटात पार पडला. यावेळी या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी विजयकुमार चितकोटे हे होते. यावेळी व्यासपीठावर पुन प्रमुख विवेक जानते, संयोजक नागेश कनडे, अध्यक्ष अभिषेक चौडे, प्रसाद नागुरे, वैभव विभुते, बालाजी पिंपळे, राजाभाऊ हलकुडे, दिलीप होनराव, अशोक अप्पा उपासे, उमाकांत नागोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



### सात एकर ऊस जळून खाक


**निलंगा, दि.३ डिसेंबर -**
निलंगा येथील शेतकरी राजेंद्र शिवबसप्पा सोरडे (बारापुडे) या शेतकऱ्यांचा सात एकर ऊस महावितरणच्या विद्युत पोलवरील तारेला पार्किंग होऊन कारखाना तोडणीस आलेला सात एकर उभा ऊस जळून खाक झाला आहे. याबाबत सोरडे यांनी महावितरणकडे नुकसान भरपाईची मागणी केली आहे. निलंगा शिवारातील राजेंद्र शिवबसप्पा सोरडे यांनी गट नंबर १६५/क या जमिनीवर ७ एकर जमीनीमध्ये ऊस पिकाची लागवड केलेली होती. परंतु दि.२६ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ ते ४ वाजण्याच्या सुमारास महावितरण विभागाच्या मेन वायरचे स्पारकिंग होऊन वायर तुटुल्यामुळे व ऊस पिकामध्ये शॉटसकिटमुळे ऊसामध्ये ठिणगी पडुन ऊसाला आग लागून संपुर्णपणे ऊस जळुन गेला. त्यामुळे राजेंद्र सोरडे यांचे जवळपास ५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

# लातूरच्या अरिहंत ऑइल्स कंपनीला सहा कोटींचा गंडा

## बनावट पावत्यांच्या माध्यमातून फसवणूक; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.३ डिसेंबर -**
संगणकावर बनावट पावत्या तयार करून लातुरातील अरिहंत व्हेज ऑइल्स प्रा.लि. कंपनीला तब्बल ५ कोटी ७८ लाख ५१ हजार ७० रुपयांना गंडविल्याची घटना घडली. ही फसवणूक जानेवारी २०२० ते ऑक्टोबर २०२४ या काळात करण्यात आली आहे. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनंतर चौघांसह इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, फिर्यादी उत्कर्ष अशोकराव संगवे (वय ५५, रा. परशुराम पार्क, हरंगुळ बु. रोड, लातूर) यांनी पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. विशाल राजेंद्र वजरंगे (वय २७), वैभव राजेंद्र बजरंगे (वय २९, दोघे रा. सोना नगर लातूर), विजय झोडगे, राजकुमार जाधव याच्यासह इतरांनी संगनमत करून करणाऱ्या व्यक्तींनी कट रचून वजनामध्ये फेरफार करुन, सोयाबीन लातुरातील अतिरिक्त एमआयडिसी, परीक्षण गुणवत्तेत बदल करत चिंचोलीरावwadी परिसरात असलेल्या त्यानुसार संगणकावर बनावट पावत्या अरिहंत व्हेजऑइल्स प्रा.लि. या तयार केल्या. या बनावट पावत्याच्या कंपनीला ५ कोटी ७८ लाख ५१ हजार माध्यमातून सोयाबीन पुरवठादार ७० रुपयांना गंडा घालत फसवणूक ट्रेडिंग कंपनीचे मालक, त्यांना पैसे केली. हा गुन्हा जानेवारी २०२० ते ३१ पाठविणारे व्यक्ती, वाहन मालक ऑक्टोबर २०२४ या काळात घडला चालक आणि त्यांच्याशी संगनमत आहे.




याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनंतर विशाल वजरंगे, वैभव बजरंगे, विजय झोडगे, राजकुमार जाधव याच्यासह इतरांविरोधात गुरनं ८४८/२०२४, कलम ३१६ (४), ३१८ (क), ३३६ (३), ३३८, ३३९, ३४०, ३४४, ६१ (२) बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलिस निरीक्षक सुधाकर देडे हे करीत आहेत.

## डॉ. नाकाडे यांचे मराठवाड्याच्या विकासातील योगदान कायम स्मरणात राहील

### आ. अमित देशमुख यांचे प्रतिपाद...

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.३ डिसेंबर -**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू, तसेच लातूर येथील दयानंद विधी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य, डॉ. शिवराज नाकाडे यांच्या अकस्मित निधनाचे वृत्त दु:खद असल्याचे माजी मंत्री आम. अमित देशमुख यांनी म्हटले आहे, शैक्षणिक सामाजिक आणि मराठवाड्याच्या विकासातील त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील, असेही त्यांनी म्हटले आहे.



आ. अमित देशमुख यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे की, डॉ. शिवराज नाकाडे यांनी शिक्षण संस्थाचालक, कुलगुरू, प्राचार्य म्हणून शिक्षण क्षेत्रात बहुमोल योगदान दिले आहे.

मराठवाडा वैज्ञानिक विकास मंडळाचे सदस्य म्हणूनही त्यांनी मराठवाडयाच्या विकासाला चालना दिली. स्व. विलासराव देशमुख यांच्याशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. नाकाडे कुटुंबीयांच्या या दु:खात मी व देशमुख कुटुंबीय सहभागी आहोत.

त्यांना हे दु:ख सहन करण्याची शक्ती मिळो ही ईश्वरचरणी प्रार्थना, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करतो, असे शेवटी आमदार देशमुख यांनी म्हटले आहे.

## अंधत्व निवारण कार्य पुर्ण परिमंडळात करु : डॉ. अर्चना भोसले



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३ डिसेंबर -**
वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनचा अंदाज आहे की, ८० टक्के व्हिज्युअल हानी एकतर टाळता येण्याजोगा किंवा उपचाराने बरा होऊ शकतो. यामध्ये मोतीबिंदू, ऑन्कोसेरसि आसिस, ट्रॅकोमा, काचबिंदू, डायबेटिक रेटिनोपॅथी, अपवर्तक त्रुटी आणि बालपणातील अंधत्वाची काही प्रकरणे यांचा समावेश होतो. रोग नियंत्रण आणि प्रतिबंध केंद्राचा अंदाज आहे की, युनायटेड स्टेट्समधील अर्धे अंधत्व टाळता येण्यासारखे आहे. या धरतीवर आपण ही या परीमंडळात अंधत्व निवारण जनजागृती मोहीम यावर काम करू. असे डॉ. अर्चना भोसले यांनी सांगितले.

त्या उदयगिरी लायन्स धर्मादाय नेत्ररूग्नालय उदगीर येथे आयोजित १९ वा वर्धापन दिन कार्यक्रमात बोलत होत्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.रामप्रसाद लखोटीया हे होते. प्रमुख पाहुणे डॉ. अर्चना भौसले उपसंचालक आरोग्य सेवा विभाग, डॉ. प्रदीप ढेले शल्यचिकित्सक लातूर, राजू गायकवाड दिव्यांग विभाग लातूर, डॉ. संजय ढगे साह्यक उपसंचालक आरोग्य सेवा लातूर, डॉ. दोडके, डॉ. शशिकांत देशपांडे, डॉ. हारीश सुळे, डॉ. दोडके, ईश्वरप्रसाद बाहेत, प्रदीप बेद्रे आदीसह मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते शिबिर संयोजक यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. रामप्रसाद लखोटीया यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी आदेप्पा यांनी केले.

या कार्यक्रमास उदगीर, जळकोट तालुक्यातील शिबिर संयोजक व उमेद महिला पदाधिकारी मोठ्या संख्येत उपस्थित होत्या.

## महापालिकेच्या वतीने दंत चिकित्सा शिबिर; ११६ नागरिकांनी घेतला लाभ

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.३ डिसेंबर -**
लातूर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील गरजू रुग्णांना कमी दरामध्ये दर्जेदार दंत शल्य चिकित्सा सेवा उपलब्ध व्हावी, याकरिता राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान-लातूर मनपा आणि एम. आय. डी.एस. आर., लातूर यांच्या मध्ये दोन महिन्यापूर्वी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या उपक्रमाची सुरुवात म्हणून महानगरपालिके अंतर्गत शहरातील दोन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दिनांक २ डिसेंबर रोजी भव्य दंत शल्य चिकित्सा शिबिर आयोजन करण्याचे निर्देश आयुक्त तथा प्रशासक श्री बाबासाहेब मनोहरे यांनी आरोग्य विभागास दिले होते. या शिबिराचे उद्घाटन शहरातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र-गौतम नगर येथे लातूर महानगरपालिकेचे उपायुक्त (आरोग्य) डॉ. पंजाब खानसोळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांच्यासह एम.आय.डी. एस.आर. संस्थेमार्फत दंतशल्यचिकित्सा तज्ञ उपस्थित होते. याप्रसंगी शहरातील नागरिकांनी महानगरपालिकेच्या आरोग्य संस्था अंतर्गत उपलब्ध करण्यात आलेल्या दंतशल्यचिकित्सा सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. या सेवेचा गरजू नागरिकांनी लाभ घेण्यासाठी देखील त्यांनी आवाहन केले.



या शिबिरामध्ये एकूण ११६ रुग्णांची दंत शल्यचिकित्सा करण्यात आली व उपचार करण्यात आले. संदर्भ सेवा आवश्यक असणाऱ्या रुग्णांवर पुढील तपासण्या करण्याकरिता संदर्भित केले आहे.

## रब्बी हंगाम पीक स्पर्धेसाठी 31 डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर, दि.३ डिसेंबर -**
कृषि विभागामार्फत रब्बी हंगामा अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांच्या राज्यांतर्गत पीक स्पर्धांचे आयोजन करण्यात आहे. या स्पर्धेसाठी शेतकऱ्यांनी ३१ डिसेंबरपर्यंत तालुका कृषि अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करावेत, असे आवाहन कृषि विभागामार्फत करण्यात आले आहे.

हरभरा, गहू, ज्वारी, करडई व जवस या पिकांसाठी रब्बी पीक स्पर्धा होणार आहे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावे जमीन असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत भाग घेता येईल. पिक स्पर्धेमध्ये सहभागी लाभार्थीच्या स्वतःच्या शेतावर त्या पिकाखाली किमान एक एकर (४० आर) क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.

## तुरीच्या पिकावर अळी पडल्याने शेतकरी चिंतेत



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३ डिसेंबर -**
गेल्या कित्येक वर्षापासून तूर या पिकावर वेगवेगळे रोग पडत आल्यामुळे आणि पीक वाळून जाऊ लागल्यामुळे मध्यंतरीच्या काळात तुर पिक घेणे शेतकरी टाळत होते. मात्र यावर्षी जास्त भाव मिळाल्यामुळे शेतकरी पुन्हा तुरीच्या लागवडीकडे वळला आहे. मात्र शेतकऱ्याच्या अडचणी त्याच्या पाचवीलाच पुजल्या की काय? असे म्हणण्याची वेळ आली आहे.

सध्या ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. तसेच थंडी पडल्यामुळे फुलोऱ्यात आलेल्या तुरीवर अळी पडली आहे. सुरुवातीला अनेक कीटकनाशकांचे फवारणी शेतकऱ्यांनी केली आहे. मात्र तरी देखील ऐन मोसमात तुरीवर अळी पडल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. खरीप हंगामातील दीर्घ मुदतीचे पीक म्हणून तूर ओळखली जाते. शेतकऱ्याचे अर्थचक्र सुधारेल, अशी अपेक्षा तुरीच्या पिकाकडून केली जात होती. मात्र ती अपेक्षाही आता धुळीस मिळत आहे. सोयाबीनच्या पिकाला हमीभाव मिळाला नाही, अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांनी हमीभावाची वाट न बघता मिळेल त्या भावाने सोयाबीन बाजारात विकले आहे. काही शेतकऱ्यांनी घरी साठवून ठेवले आहे. मात्र त्यालाही भाव मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. शेतकऱ्याची पूर्ण बिशाद ही तुरीच्या पिकावर होती, मात्र ढगाळ वातावरणामुळे निर्माण झालेल्या संकटापुढे शेतकरी हातबल झाला आहे.

उदगीर तालुक्यातील ग्रामीण भागातील अनेक छोट्या-मोठ्या खेड्यातून तुरीच्या पिकावर नवे संकट आले आहे. एक तर सुरुवातीच्या काळात सततच्या पावसाने अनेक पिकांचे नुकसान केले होते. मात्र तरी देखील शेतकऱ्यांच्या आशा तुरीच्या पिकावर अवलंबून होत्या.

मात्र त्याही आशा मावळतात की काय? अशी शंका निर्माण झाली आहे. कारण या पिकावर कीड व अळीचा प्रादुर्भाव निर्माण झाला आहे.

### कृषी विभागाने मार्गदर्शन करणे गरजेचे...

तुरीच्या पिकावर मोठ्या प्रमाणात अळीचा व मर रोगाचा प्रादुर्भाव झाला असून यामुळे शेतकऱ्यांना वेळीच कृषी विभागाच्या वतीने मार्गदर्शन करणे गरजेचे होते. मात्र तसे मार्गदर्शन झाले नाही. सध्या इतरत्र शेतीमालाच्या तुलनेत तुरीला हमीभाव व बाजारभाव चांगला आहे. त्यामुळे आंतरिक पीक म्हणून शेतकरी तूर पिकाला प्राधान्य देतात, मात्र सध्या सोयाबीन पीक हातचे गेले आहे. कापसाचे उत्पादन घटले आहे. आता तूर रब्बी पिकावर शेतकऱ्यांच्या अशा असताना मागील काही दिवसापासून ढगाळ वातावरणामुळे कीड रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्याने शेतकऱ्यांमधून विविध कीटकनाशकाच्या फवारणीवर भर दिला जात आहे. मात्र कृषी विभागाकडून नेमक्या कोणत्या कीटकनाशकाचे फवारणी करावी? यासंदर्भात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे गरजेचे असतानाही वेळीच तसे मार्गदर्शन झालेले नाही, ही अत्यंत शोकांतिका आहे. अशी प्रतिक्रिया प्रगत शेतकरी भास्कर कुंडगीर इसमालपूर तालुका उदगीर यांनी व्यक्त केली आहे.

## जगाचा कोरोना संपला, पण गरीबीचा कोरोना कधी संपणार? : बिरादार

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३ डिसेंबर -**



आजपर्यंत अनेक भयान संकटाचे आघात सहन केलेल्या आपल्या देशाने कोरोना १९ या नैसर्गिक आपत्तीचा आघातही सहज सहन केला. परंतू पिढ्यानपिढ्या जो समाज गरिबी, लाचारीच जगणं जगत आहे त्यांचा सामाजिक कोरोना महाभयंकर आहे. अन्न पाण्याविना मरणे, घरा विना राहणे, अनेक संकटाचे सहने, रुढीपरंपरा, सामाजिक, राजकीय, धार्मिक दारिद्र्य या बरोबरच अधिकारी व पदाधिकाऱ्यांची भ्रष्टाचारी व अमानुष प्रवृत्ती इत्यादी गरिबीवरील अन्याय अत्याचाराविरुद्ध समाजाने विचारलेला प्रश्न, जगाचा कोरोना संपला, पण आमच्या गरीबीचा कोरोना कधी संपणार? असा प्रश्न विचारणारी साहित्यकृती म्हणजे गरिबीचा चिरंतन कोरोना हि होय, असे मत प्रसिद्ध साहित्यिक तुकाराम बिरादार यांनी व्यक्त केले.

शिवशंकर पाटील यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या ३२६ व्या वाचक संवादमध्ये तुकाराम बिरादार यांनी गरिबीचा चिरंतन कोरोना या विलास माने लिखित साहित्यकृतीवर संवाद साधताना पुढे म्हणाले, कोविड-१९ अर्थात कोरोना ही नैसर्गिक आपत्ती व काल्पनिक तकलादू होती.

तर गरिबी, भूकमारी, अशिक्षितपणा, बेरोजगारी, अन्याय, अत्याचार, लाचारी इत्यादी कोरोना पेक्षा भयंकर आहेत. या अनुषंगाने लेखकाने मांडलेल्या भूमिका ह्या इमानदार, उपकाराच्या नोंदी चिंतलशील आहेत, असे ते यावेळी म्हणाले.

वाचक संवादावेळी प्राचार्य डॉ. शिवाजी सगर, तुळसीदास बिरादार, मोहन निडवंचे, कचरूलाल मुंदडा, मुरलीधर जाधव, हनुमंत म्हेत्रे व बाबुराव सोमवंशी यांचेसह अनेकांनी चर्चेत सहभाग नोंदवला.

या कार्यक्रमास परिसरातील अनेक वाचक रसिकांसह बालगोपाळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसह दुहेरी लाभ घेणाऱ्या महिलांची होणार पडताळणी

**तभा वृत्तसेवा / सुधीर गंगणे**
**औसा, दि.३ डिसेंबर -**
नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणींना देण्यात येणाऱ्या १५०० रुपयांच्या मदतीत वाढ करुन २ हजार१०० रुपयांची मदत देण्याचे आश्वासन सत्ताधाऱ्यांनी दिले होते. एकीकडे सत्ता स्थापनेच्या हालचाली सुरु असून दुसरीकडे लाडक्या बहिणींना देण्यात येणाऱ्या योजनेत बदलांचे संकेत चर्चिले जात आहे. यामुळे मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणींचे टेंन्शन वाढले असून या योजनेची लाडक्या बहिणीत होत असलेल्या चर्चेने संभ्रम वाढल्याचे दिसून येत आहे.

गेल्या चार महिन्यापासून सुरु असलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेला महिलांतून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. या योजनेमुळे गरजू आणि गरीब कुटुंबाला खुप मोठा आधार मिळाला. याचा मध्यमवर्गीय कुटुंबालाही फायदा झाला. अशा सुरु असलेल्या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी अनेक बहिणींनी या योजनेत सहभाग घेतला. या काळात निवडणुकीची धांदल सुरु असल्याने शासनाने जवळपास सर्वच बहिणींना सहभागी करुन घेत १५०० रुपयांची भेट रुपाने मदत केली.

या काळात झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत बहिंनीनी भावांना सढळ हाताने मतदान करीत भरभरुन साथ दिली. मात्र या निवडणुकीच्या काळात भावांनी १५०० रुपयात वाढ करुन २१०० रुपयांची वाढ करण्याचे आश्वासन दिले होते.

आता निवडणुका संपल्या आहेत. सत्ता स्थापनेचे जोरदार वारे वाहू लागले आहे. तसे लाडक्या बहिणींच्या रकमेत वाढ करण्याच्या हालचालींनी वेग घेतला आहे.



या योजनेत सहभागी झालेल्या कर भरणाऱ्या, नोकरदार कुटुंबातील, खोटी कागदपत्रे, एकाच रेशन कार्डातील दोनपेक्षा अधिक महिलांची पडताळणी करण्यात येणार असल्याची चर्चा आता ग्रामीण पट्यात होत आहे. याचबरोबर पॅनकार्डधारक, आयकर भरणाऱ्या महिला, बोगस आधारकार्डवरुन सहभागी झालेल्या महिलांनाही या योजनेतून वगळण्यात येणार आहे, अशी चर्चा होत आहे.

अशा चर्चेने ग्रामीण भागात जोर धरला असून यासह संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेणाऱ्या महिला व वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या महिलांना या योजनेतून वगळण्यात येणार आहे.

विवाहित, घटस्फोटित, निराधार असलेल्या महिलांचा या योजनेत समावेश करण्यात येणार आहे. यासाठी महिला महाराष्ट्रातील रहिवाशी असणे गरजेचे आहे. तसेच २१ ते ६५ वर्षे वयोगटातील महिलांना या योजनेचा लाभ मिळणार असल्याची चर्चा औसा तालुक्यात होत आहे.

## आ.कैलास पाटील यांचा विजयाबद्दल सत्कार

**तेर, दि.३ डिसेंबर -**
धाराशिव विधानसभा मतदारसंघातील शिवसेना उबाठा पक्षाचे (महाविकास आघाडीचे) विजयी आ.कैलास घाडगे-पाटील यांचा तेर येथील महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी नामदेव कांबळे, अमोल कसबे मंगेश पांगरकर, रियाज कबीर, काका अंबादास राऊत, कानिफनाथ देवकुळे, मुळेवाडी येथील ग्रा.पं. सदस्य आशिष मुळे यांनी पुष्पहार वसंत गोरबाकाकांची प्रतिमा देऊन आमदार पाटील यांचा सत्कार केला.



## संक्षिप्त वृत्त...



### जागतिक एडस् दिनानिमित्त प्रभात फेरी

**धाराशिव, दि.३ डिसेंबर -**
जागतिक एडस् दिनानिमित्त धाराशिव शहरात आयोजित केलेल्या कार्यक्रमात विविध संस्था, शाळा तसेच जिल्हा रुग्णालयातील सरकारी अधिकारी तसेच कर्मचारी यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने करण्यात आली. त्यानंतर एचआयवी बाधित लोकांसोबत भेदभाव कमी करण्याकरिता एचआयवी आजाराविषयी माहिती देऊन उपस्थित सर्वांना शपथ देण्यात आली. त्यानंतर प्रभातफेरी काढण्यात आली. लोकांमध्ये जनजागृती करण्यात आली. तसेच ना साथ रहनेसे, ना छुनेसे एचआयवी फैलता है, असावधानी से... हा नारा विद्यार्थ्यांनी दिला. कार्यक्रमाला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,धाराशिव, जिल्हा एड्स नियंत्रण व प्रतिबंध कार्यालय, दी प्राइड इंडिया, विहान आधार आणि काळजी केंद्र, एआरटी सेंटर,टाटा एआईजी, स्वस्ति, बँगलोर, एनएमपी प्लस, धाराशिव, रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, धाराशिव येथील व इतर कार्यालय, महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते. सदरील संस्थेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधीक्षक गवळी, एआरटी सेंटर, धाराशिवचे सिनिअर मेडिकल ऑफिसर निता पौळ, समग्र विहान सीएससी धाराशिव सीएससी कॉर्डिनेटर ज्ञानदेव डोकडे, टाटा एआईजी, स्वस्ति बंगलोर एनएमपी प्लस संस्थेचे जिल्हा समन्वयक आकाश नालेगावकर व संस्थेचे कर्मचारी मान्यवर उस्थित होते.

### दत्तजयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**येरमाळा, दि.३ डिसेंबर -**
कळंब तालुक्यातील मलकापुर येथे दि.८ डिसेंबरपासुन अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाची सुरुवात दि.८ रोजी सकाळी मलकापूरच्या प्रथम नागरिक रुक्मीणी घोळवे, आबासाहेब लोमटे, राजेश लोमटे यांच्या हस्ते कलश पूजन करून होईल. विना पुजन दत्ता पाटील, नरसिंग लोमटे तर टाळ व मृदंग पुजन एकनाथ विठ्ठल लोमटे व पाशाभाई सय्यद यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. मलकापूर येथील दत्त जयंतीच्या निमित्त होणाऱ्या या सप्ताहाचे ४२ वे वर्ष असुन त्याची सुरुवात वैकुंठवासी ह.भ.प. सुभाष महाराज यांनी केली आहे. या सप्ताहामध्ये दररोज रात्री ९ वाजता किर्तनाचा कार्यक्रम होणार आहे यामध्ये अनुक्रमे ह.भ.प. विष्णु महाराज पंढरपूर, ह.भ.प. नाना महाराज कदम नेकनुर, ह.भ.प. माधव महाराज बोधले गौर, ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज काकडे हावरगाव, ह.भ.प. ॲड. पांडुरंग महाराज लोमटे, यांचे किर्तन होणार असुन ह.भ.प. वैजीनाथ महाराज उस्तुरे औसा यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. कळंब आणि धाराशिव तालुक्यातील अनेक गावातील भजनी मंडळ या उपस्थित राहणार असुन सर्व भाविक भक्तांनी या सप्ताहासाठी व महाप्रसादासाठी उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन कार्याध्यक्ष ह.भ.प. एकनाथ महाराज लोमटे यांनी केले आहे.

### नागरिकांनी घाबरु नये: वनविभाग

**मंगरुळ, दि.३ डिसेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील कसई येथे सोमवार २ डिसेंबर रोजी रात्री ९ वाजता बिबट्या आढळून आल्याची चर्चा सोशल मीडियाच्या माध्यमातून सुरु आहे. यावर वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी कसई शिवारात पाहणी केली आहे. यात पाहणीत कसई शिवारात बिबट्या असल्याचा कोणताही ठोस पुरावा मिळाला नसून परिसरातील नागरिकांनी घाबरुन जावू नये तसेच सतर्कता बाळगावी, असे आवाहन केले आहे. परिसरातील शेतकरी, शेतमजूर नागरिकांनी सतर्कता बाळगून दैनंदिन कामकाज करावे असे आवाहन केले आहे. याबाबत परिसरातील युवकांकडून सोशल मीडियाच्या अनेक तर्क वितर्क लावले जात असून तूर्तास तरी कसई व परिसरातील नागरिकांनी काळजी बाळगावी यापूर्वीही अपसिंगा, कात्री, कामठा, सिंदफळ या परिसरात बिबट्या आढळल्याचे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### बोगस डॉक्टरांची माहिती द्यावी: जिल्हा आरोग्य अधिकारी

**धाराशिव, दि.३ डिसेंबर -**
जिल्हयाच्या ग्रामीण भागात वैद्यकीय क्षेत्रातील कोणतीही पदवी नसताना देखील बोगस डॉक्टर रुग्णालय थाटुन व गावात जावुन डॉक्टर आहे असे सांगुन सामान्य नागरिकांवर उपचार करत आहेत. त्यामुळे बोगस डॉक्टराकडुन नागरीकांच्या जिवाशी खेळ करण्यात येत आहे. बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट अशा बातम्या वृत्तपत्रामध्ये प्रकाशित होत आहे. आारोग्य विभागाने तात्काळ दखल घेऊन त्या अनुषंगाने जिल्हा आरोग्य प्रशासनाने वेळीच खबरदारी घेवुन जिल्हयातील ग्रामीण भागात बोगस डॉक्टरांचा शोध घेवुन त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यासाठी जिल्हा,तालुका व नगरपालीका/ नगर परिषद स्तरावर शासन नियमानुसार समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.तालुकास्तरावर अध्यक्ष म्हणुन गटविकास अधिकारी,सदस्य सचिव म्हणुन तालुका आरोग्य अधिकारी व सदस्य म्हणुन आरोग्य विस्तार अधिकारी पंचायत समिती यांच्याकडून शासन निर्णयानुसार बोगस डॉक्टरावर कारवाई करण्याचे आदेश २ डिसेंबर रोजी देण्यात आले आहेत. संबंधित समितीच्या कार्याक्षेत्रातील बोगस वैद्यकीय व्यावसायिकांचा शोध घेवुन तात्काळ शासन प्रचलीत नियमानुसार योग्य ती कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# नळदुर्गचे अप्पर तहसील कार्यालय असून अडचण... नसून खोळंबा...

## नळदुर्ग शहरातील नागरिकांच्या जल्लोषावर प्रशासन फिरवतोय पाणी

## आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नामुळे झाले आहे मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३ डिसेंबर -**
नळदुर्ग येथील अप्पर तहसिल कार्यालय नेहमी कुलुपबंद असल्यामुळे महाराष्ट्र सरकारने नळदुर्ग शहर व परीसरातील नागरीकांच्या सोईसाठी मंजुर केलेले नळदुर्ग येथील अप्पर तहसिल कार्यालयाची अवस्था सध्या असुन अडचण आणि नसुन खोळंबा यासारखी झाली आहे.

आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी अथक प्रयत्न करून नळदुर्ग शहर व परीसरातील नागरीकांच्या सोईसाठी नळदुर्ग येथे अप्पर तहसिल कार्यालय मंजुर करुन आणले आहे. आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नामुळे राज्यातील महायुती सरकारने नळदुर्ग येथे अप्पर तहसिल कार्यालय सुरु करण्याची मान्यता दिली आहे. त्याचबरोबर याठिकाणी कायमस्वरूपी अप्पर तहसिलदार आणि महसुल सहाय्यक अशा दोन पदाना मान्यताही दिली आहे. नळदुर्ग येथे अप्पर



तहसिल कार्यालय मंजुर झाल्यानंतर नळदुर्ग शहरातील नागरीकांनी मोठा जल्लोष करुन महायुती सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले होते. मात्र सध्या हे अप्पर तहसिल कार्यालय कायम कुलुप बंद असल्यामुळे नळदुर्गकरांची मोठी निराशा झाली आहे.

दि. १२ ऑक्टोबर रोजी विजयादशमीच्या शुभ मुहुर्तावर आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या हस्ते या अप्पर तहसिल कार्यलयाचे उदघाटन झाले होते. हे कार्यालय सुरु होऊन आज ५१ दिवस झाले आहेत. या ५१ दिवसात किती वेळा हे कार्यालय उघडले होते आणि या कालावधीत या ठिकाणी नागरीकांची काय कामे झाली आहेत याची चौकशी होणे गरजेचे आहे.

नळदुर्ग येथील चावडी चौकातील चावडीच्या इमारतीमध्ये शहराच्या मध्यभागी हे अप्पर तहसिल कार्यालय सुरु करण्यात आले आहे. या कार्यालयात अप्पर तहसिलदार म्हणुन अभिजित जगताप यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अभिजित जगताप हे धाराशिव येथे कार्यरत असुन त्यांच्याकडे नळदुर्ग अप्पर तहसिल कार्यालयाचा पदभार देण्यात आला आहे. मात्र कार्यालय सुरु होऊन ५१ दिवस झाले आहेत या दिवसांमध्ये अप्पर तहसिलदार अभिजित जगताप हे नळदुर्ग कार्यालयात किती दिवस आले हे तपासणे गरजेचे आहे. वास्तविकपाहता हे कार्यालय नळदुर्ग शहर व परीसरातील ३८ गावांच्या महसुलच्या कामासाठी उपयोगात येणार आहे. त्यामुळे हे कार्यालय कायम नागरीकांच्या सेवेसाठी उघडे असणे गरजेचे आहे.

महायुती सरकारने नळदुर्ग शहर व परीसरातील नागरीकांची महसुलची कामे याठिकाणी व्हावे यासाठी नळदुर्ग येथे अप्पर तहसिलय कार्यालय सुरु करण्याची मान्यता दिली आहे. मात्र आजही नळदुर्ग शहर व परीसरातील नागरीकांना लहान, सहान महसुलच्या कामासाठी तुळजापुरलाच जावावे लागत आहे हे दुर्दैवाची बाब आहे. धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांनी नळदुर्ग येथील अप्पर तहसिल कार्यालय दररोज सुरु ठेवावे याबाबतचे आदेश काढणे गरजेचे आहे. मध्यंतरी विधानसभा निवडणुक असल्याकारणाने निवडणुकीच्या कामात व्यस्त असल्यामुळे अप्पर तहसिलदार यांना नळदुर्ग येथील कार्यलयात येणे जमले नसेल हे समजले जाऊ शकते मात्र निवडणुक होऊन आता दहा दिवसाचा कालावधी उलटुन गेला आहे तरीही नळदुर्ग अप्पर तहसिल कार्यालय आजही कुलुप बंदच असल्याने नागरीकांमधुन संताप व्यक्त केला जात आहे.

## उप भूमिअभिलेख कार्यालयाला जागा मालकाने ठोकले कूलूप

**परंडा, दि.३ डिसेंबर -**
येथील उपभूमि अभिलेक कार्यालय कार्यालयाचे दरममहाचे भाडे शासनाकडून वेळेत मिळत नसल्यामुळे जागा मालकाने सदरील कार्यालयास कुलुप लावुन कार्यालय बंद केले असल्याची घटना परंडा येथे घडली आहे.

यासंबंधी मिळालेली अशी की, कार्यालयाचे २०१९ पासूनचे आठ लाख रुपये भाडे थकीत असुन जागा मालकानी वेळोवेळी वकीलामार्फत नोटीसा दिल्या असून वरिष्ठ अधिकारी यांनी दुर्लक्ष केल्या आज जागा मालकांनी सदरील कार्यालयास कुलुप लावून कार्यालय बंद केले दिले. संबंधी तहसीलदार परंडा व इतर वरिष्ठ अधिकारी यांना नोटीसा देवुन दुर्लक्ष केले आहे. जोपर्यंत जागा भाडे मिळणार नाही. तोपर्यंत कुलुप काढणार नसल्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे आपल्या विविध कामासाठी आलेल्या शेतकरी व कर्मचाऱ्यांची चांगलीच तारांबळ झाली.

# तानाजी सावंतांच्या विकास कामाला थांबा नाही; दिलेला शब्द पाळला

## स्वखर्चाने तेरखेडा येथील शेतरस्ते करण्यास सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.३ डिसेंबर -**
राज्याचे माजी आरोग्यमंत्री व धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री विद्यमान आमदार तानाजी सावंत यांची विकास एक्स्प्रेस परंडा मतदारसंघात सुसाट वेगाने धावत सुटली आहे. सावंत यांच्या विकास कामाच्या गाडीला थांबाच नसल्याचे दिसून येत आहे. तेरखेडा येथे दिलेला शब्द त्यांनी पाळला असून स्वखर्चातून त्यांनी शेतरस्ता करण्यास सुरुवात केली आहे.



मागील पाच वर्षे झाली मतदारसंघात त्यांनी विकास कामाचा धूम धडाका लावला असून शासनाचा करोडो रुपये निधी खेचून आणत मतदारसंघाचा कायापालट केला आहे. त्याच बरोबर दुसऱ्या बाजूला स्वखर्चाने देखील अनेक विकासकामे केली आहे. शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा विषय म्हणजे शेतरस्ते शेतीला व्यवस्थित शेतरस्ते नसल्यास शेतकऱ्यांना मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागते. याच शेतकऱ्यांच्या भावना जाणून घेत आमदार तानाजी सावंत यांनी मतदारसंघात शेतकऱ्यांना स्वखर्चाने शेतरस्ते करून देण्याचा निर्णय घेतला. मागील पाच वर्षे झाली शेतरस्त्याची कामे मतदारसंघात जोरात चालू आहेत. वाशी तालुक्यातील तेरखेडा जिल्हा परिषद गटात देखील अनेक शेतरस्ते सावंत यांनी केले आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या मधल्या काळात आचारसंहिता लागू असल्याने ही कामे थांबली होती. आता मात्र लगेच आचारसंहिता संपताच शेतरस्त्याची कामे जोरात सुरू करण्यात आली आहेत.

तेरखेडा गावातील सर्व मोठा शेतरस्ता समजल्या जाणाऱ्या चांबारी-येरमाळा रस्त्याची प्रचंड दुरवस्था होती. रस्ता फक्त कागदोपत्रीच होता असेच म्हणावे लागेल.

रस्त्यावर मोठमोठी झाडेझुडपे वाढली होती. त्यामुळे या शिवारातील शेतकऱ्यांना प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागत,असल्याने येथील सर्व शेतकऱ्यांनी आमदार तानाजी सावंत यांचे पुतणे भैरवनाथ साखर कारखान्याचे चेअरमन केशव सावंत यांची भेट घेऊन व्यथा मांडल्या होत्या. यावेळी केशव सावंतांनी आचारसंहिता समाप्त होताच रस्त्याचे काम सुरु करू असा शब्द दिला होता. आता प्रत्यक्ष तेरखेडा गावातील शेतरस्ताचे काम सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे गावातील शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

# अंगणवाडीताईच्या मानधनासह कामाच्या वेळीतही वाढ

## आता नवी वेळ असणाार सकाळी ९:१५ ते दुपारी ३:४५...

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.३ डिसेंबर -**
अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनात महाराष्ट्र शासनाने नुकतेच वाढ केली आहे. मात्र, याचा परिणामही त्यांच्या दैनंदिन वेळेवर पडला असून शासनाकडून त्यांच्या मानधानवाढीच्या अगोदरच्या वेळेपेक्षा दोन तास अधिकचा वेळ वाढवला आहे. आत नवी वेळ ही सकाळी ९:४५ ते दुपारी ३:४५ अशी असणाार आहे.

अंगणवाडी सेविका व मदतनिसच्या पुर्वीच्या कामा पेक्षा दोन तास अधिक झाले आहे. अंगणवाडीसेवीकेच मानधन हे पूर्व दहा हजार होते ते आता १५ हजार करण्यात आले आहे तर मदतनीसचे मानधन हे पाच हजार पाचशे वरून सात हजार पाचशे करण्यात आले आहे. पुर्वी अंगणवाडी ही सकाळी



९ ते दुपारी १ पर्यंत भरत असे परंतु मानधन वाढले की कामाचे तास देखील वाढ करण्यात आले आहे. आता सकाळी ९:१५ ते दुपारी ३:४५ करण्यात आले असून वाढीव तासांचा कालावधीत गरोदर महिला स्तनदा मातांना तसेच कमी वजनाच्या कुपोषित बालकांना आहार व आरोग्य विषयक मार्गदर्शन, समुपदेशन, करण्यात येणार आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांनी अंगणवाडी दैनंदिन कामकाजाचे वेळापत्रक जाहीर केले असून या मध्ये सकाळी ९:१५ ते ९:३० अंगणवाडी उघडणे व पूर्व तयारी करणे ९:३० ते १०:३० पुर्व शालेय शिक्षण देणे, १०:३० ते १०:४५ नाशता देणे, १०:४५ ते १२:३० पूर्व शिक्षण देणे, १२:३० ते १पर्यंत गरम व ताजा आहार देणे, १ ते १:४५ अंगणवाडीतील रेकॉर्ड लिहणे तसेच पोषण टँकरच्या नोदी अद्यावत करणे, १:४५ ते २:१५ संदर्भ सेवा, २:१५ ते ३:४५ गृह भेट यामध्ये गरोदर महिला स्तनदा माता, तसेच कमी वजनाच्या कुपोषित बालकांना आहार व आरोग्य विषयक मार्गदर्शन समुपदेशन असा कामकाजाचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

## शेतकऱ्याची आत्महत्या

**धाराशिव, दि.३ डिसेंबर -**
तालुक्यातील कामेगाव येथील ५८ वर्षीय शेतकऱ्यांने कर्जबाजारीपणाला कंटाळून स्वत:च्या शेतातील शेततळ्यात उडी घेवून आत्महत्या केली. ही दुर्घटना शनिवारी (दि.३०) सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास उघडकीस असून पांडूरंग नागोराव कदम असे या शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांची गावालगत शेती आहे. त्यांच्याकडे राष्ट्रीयकृत व खाजगी बँकेचे कर्ज होते. त्यामुळे ते सतत चिंतेत होते. या कर्जाला कंटाळून त्यांनी शेततळ्यात उडी घेत जीवनयात्रा संपवली. त्यांच्यावर शनिवारी सायंकाळी कामेगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



## मस्टरवरील सह्या बंद, पती-पत्नीचे उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ डिसेंबर -**
आश्रम शाळेवर अधीक्षक म्हणून व त्यात शाळेवर प्रयोगशाळा परिचर या पदांवर शिक्षकेत्तर कर्मचारी म्हणून कार्यरत असलेल्या पती-पत्नी या संस्थाचालक मुख्याध्यापक व जिल्हा परिषदेतील समाज कल्याण विभागाच्या बदमाश अधिकाऱ्यांनी संगणमत करून त्यांच्या नियमबाह्य पद्धतीने मस्टरवरील सह्या बंद केलेल्या आहेत. त्यामुळे त्या पती-पत्नीने न्याय मिळावा या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले असून आजचा ६ वा दिवस आहे.

विशेष म्हणजे पत्नी सुवर्णा यांची प्रकृती खालावली असून त्या उपोषण स्थळीच हीव भरविणाऱ्या थंडीत अंथरुणावर खिळलेल्या आहेत. मात्र गेंड्याची कातडी पांघरलेल्या निगरगट्ट अधिकाऱ्यांना या समस्येकडे पाहण्यास वेळ देखील नाही.

तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथील संत गाडगेबाबा माध्यमिक आश्रम शाळेत योगेंद्र भीमसिंग गिरासे हे अधीक्षक म्हणून कार्यरत आहेत. मात्र त्यांना शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी हजेरी मस्टरवरील दि.१८ ऑक्टोबर २०२३ पासून सह्या घेणे व २०२०- २१ पासून वेतन थांबवलेले आहे. विशेष म्हणजे सोलापूर येथील शाळा न्यायाधिकरणच्या पिठासन अधिकाऱ्यांनी दि.२ मे २०२४ व दि.९ ऑक्टोबर २०२४ रोजी रुजू करून घेण्याचे व सह्या करण्याचे आदेश दिलेले आहेत. मात्र अद्यापपर्यंत त्यांना सह्या करु दिलेल्या नाहीत. आश्रम शाळेचे मुख्याध्यापक, जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी या दोन्ही पती-पत्नीच्या सह्या घेतलेल्या नाहीत. तसेच त्यांचे वेतन देखील दिलेले नाही. त्यामुळे आम्हाला न्याय द्यावा या मागणीसाठी त्या पती-पत्नींनी चिमुकल्यासह आमरण उपोषण सुरू केले आहे. मात्र चिमुरड्याची देखील प्रकृती खालावल्याने त्याला इतरत्र हलविण्यात आले आहे.

# परख सर्वेक्षणातून होणार विद्यार्थ्यांच्या क्षमतांचे मूल्यांकन

## उद्यापासून सर्व्हेक्षणाला सुरुवात... जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचा पुढाकार...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ डिसेंबर -**
शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीचे मूल्यमापन करणे आणि धोरणात्मक सुधारणा करण्यासाठी एन.सी.ई.आर.टी.या राष्ट्रीय शैक्षणिक संस्थेअंतर्गत नवीन शैक्षणिक धोरण-२०२० नुसार स्थापन झालेल्या या संस्थेमार्फत संपूर्ण देशामध्ये ७८२ जिल्ह्यांमधील ८८ हजारपेक्षा जास्त निवडक शाळांतील २३ लक्षपेक्षा अधिक विद्यार्थ्यांचे परख राष्ट्रीय संपादनूक सर्वेक्षण २०२४ चे आयोजन ४ डिसेंबरपासून करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमांच्या शाळांमधीत तिसरीच्या ४३, सहावीच्या ४२ व नववीच्या ४९ अशा एकूण-१२० शाळांमधील १३४ वर्गातील विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण होणार आहे. या सर्वेक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीचे मूल्यांकन केले जाईल. इयत्ता ३ री आणि ६ वी साठी भाषा, गणित आणि पर्यावरण अभ्यास हे विषय तर इयत्ता ९ वी साठी भाषा, गणित, सामाजिक शास्त्र आणि विज्ञान विषयांसाठी सर्वेक्षण चाचणी होणार आहे.

सर्वेक्षणासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धाराशिवचे डॉ. प्राचार्य दयानंद जटनुरे व शिक्षणाधिकारी, (प्राथमिक) अशोक पाटील हे जिल्हा समन्वयक व संस्थेतील मूल्यमापन विभाग प्रमुख प्रा.डॉ.शोभा मिसाळ व प्रा.मिलिंद अघोर हे जिल्हा सहाय्यक समन्वयक म्हणून काम पाहत आहेत.

प्रत्यक्ष सर्वेक्षणासाठी क्षत्रिय अन्वेषक व निरीक्षक यांची नेमणूक करण्यात आली आहे. यासाठी २६ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रत्यक्ष परख सर्वेक्षण घेणाऱ्या क्षत्रिय अन्वेषकांची २९ नोव्हेंबर रोजी परख सर्वेक्षण ज्या शाळेमध्ये होणार आहे, त्या शाळेतील मुख्याध्यापकांची मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली.

या सर्वेक्षणात ४ डिसेंबर २०२४ रोजी इयत्ता ३ री व ६ वी साठी सकाळी ११ ते १२ : ३० या वेळेत तर इयत्ता ९ वी साठी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत संपादनूक चाचणी भरून घेतली जाणार आहे. तसेच शिक्षकांकडून शिक्षक प्रश्नावली व मुख्याध्यापकांकडून शाळा प्रश्नावली भरून घेतली जाणार आहे.

सर्वेक्षणामार्फत जिल्हा, राज्य व देशाचे शैक्षणिक आरोग्य लक्षात येणार असून पुढील प्रगतीसाठी आवश्यक सूचना तयार करण्यात येणार आहेत. धाराशिव जिल्ह्यात परख राष्ट्रीय सर्वेक्षण -२०२४ करीता मूल्यांकन करण्याकरिता इयत्तानिहाय व तालुकानिहाय शाळा संख्या पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे.

धाराशिव जिल्हा -१३४ शाळा, एकूण क्षेत्रीय अन्वेषक संख्या-१७७, यामध्ये इयत्ता ३ री ४३, क्षेत्रीय अन्वेषक-८६, इयत्ता ६ वी ४२, क्षेत्रीय अन्वेषक-४२, इयत्ता ९ वी अशा एकूण १३४ वर्गाचा समावेश आहे.

धाराशिव तालुका-एकूण ३६ शाळा यामध्ये इयत्ता ३ री १५,इयत्ता ६ वी ६,इयत्ता ९ वी-१५ एकूण क्षेत्रीय अन्वेषक -५१, तुळजापूर तालुका-एकूण २२ शाळा. इयत्ता-३ री-६, इयत्ता-६ वी-८, इयत्ता ९वी -८, एकूण क्षेत्रीय अन्वेषक-२८,उमरगा तालुका-एकूण २९ शाळा, इयत्ता-३ री-८, इयत्ता-६ वी -१०,इयत्ता ९ वी -११ एकूण क्षेत्रीय अन्वेषक - ३७ इतकी आहे.

वाशी तालुका-एकूण -३ शाळा, इयत्ता-३ री-१,इयत्ता -६ वी -१,इयत्ता ९ वी -१,एकूण क्षेत्रीय अन्वेषक- ४ लोहारा तालुका-एकूण ८ शाळा,इयत्ता-३ री-३, इयत्ता-६ वी-३,इयत्ता ९ वी-२,एकूण क्षेत्रीय अन्वेषक संख्या-११ आहे.भूम तालुका एकूण -१३ शाळा,इयत्ता ३ री-३,इयत्ता-६ वी-६,इयत्ता ९ वी -४ एकूण क्षेत्रीय अन्वेषक संख्या -१६ आहे.

कळंब तालुका-एकूण - १२ शाळा, इयत्ता-३ री-५, इयत्ता-६ वी -४,इयत्ता ९ वी -३ एकूण क्षेत्रीय अन्वेषक संख्या-१७ आहे. परंडा तालुका-एकूण -११ शाळा, इयत्ता-३ री-२,इयत्ता-६ वी -४, इयत्ता ९ वी -५ एकूण क्षेत्रीय अन्वेषक संख्या-१३ असे आहेत.

धाराशिव तालुका- ३६, तुळजापूर तालुका- २२, उमरगा तालुका- २९, वाशी तालुका- ३, लोहारा तालुका - ८, भूम तालुका- १३, कळंब तालुका- १२, परंडा तालुका- ११,एकूण १३४ शाळातील इयत्ता ३,इयत्ता ६ वी आणि इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांचे परख सर्वेक्षणातून त्यांच्या क्षमतांचे मूल्यांकन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धाराशिवचे प्राचार्य डॉ.दयानंद जटनुरे यांनी दिली.

# निवडणुका पारदर्शीतेत पार पाडण्यात माध्यमांचे सहकार्य : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०३ डिसेंबर**

निवडणूक प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर माध्यमांनी सहकार्य केले, त्यामुळे निवडणुकीचे कार्य अधिक पारदर्शितेत पार पाडणे शक्य झाल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणुकीनंतर पत्रकारांसोबत शासकीय विश्रामगृहात रविवारी अनौपचारिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत बोलत होते.

व्यासपीठावर यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, विभागीय अधीस्वीकृती समितीचे अध्यक्ष तथा जेष्ठ पत्रकार विजय जोशी, जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष गोवर्धन बियाणी,ज्येष्ठ पत्रकार शंतनू डोईफोडे,म. अब्दूल सत्तार आरेफ,केशव घोणसे पाटील, प्रिंट इलेक्ट्रॉनिक्स व समाज माध्यमांच्या प्रतिनिधीची उपस्थिती होती.

यावेळी माध्यमांशी अनौपचारिक गप्पा करताना त्यांनी गेल्या वर्षभरापासून यंत्रणा निवडणुकीच्या संदर्भातील कामांमध्ये व्यस्त असल्याचे स्पष्ट केले.मात्र यावेळी नांदेडच्या प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडियाने निवडणूक कार्यामध्ये उत्तम प्रसिद्धी दिली. त्यामुळे शासनाने सामान्य जनता यामध्ये निवडणुकीची पारदर्शकता आणखी उठून दिसली. विशेषतः नांदेडमध्ये लोकसभा आणि विधानसभा निवडणूक एकत्रित असताना निवडणुकी संदर्भातील प्रत्येक गोष्ट आम्ही माध्यमाला सांगितली. कोणतीही गोष्ट बाजूला ठेवली नाही. लपवून ठेवली नाही. त्यामुळे पारदर्शतेने जनतेपुढे आमचेही कार्य आले. त्यासाठी माध्यमांचे आम्ही आभारी आहोत ,असे कौतुक त्यांनी यावेळी केले.

दोन्ही निवडणुका एकत्रित असल्यामुळे काही ठिकाणी मतदानाची प्रक्रिया खूप वेळेपर्यंत चालली.सहा वाजेपर्यंत मतदान केंद्रावर उपस्थित असणाऱ्या प्रत्येक मतदाराचे मत घेता आले. त्या संदर्भातील सर्व व्हिडिओ फुटेज आमच्याकडे उपलब्ध आहेत. त्यामुळे आम्हाला याबाबत योग्य तो खुलासा करता आला.

**पुन्हा मतमोजणी मागण्याची संधी**

निवडणूक मतमोजणी संपल्यानंतर ४५ दिवसांनंतर उ रपव त ही तपासणी न्यायालयीन प्रकरणाच्या अधीन राहून केली जाते. मतमोजणीतील द्वितीय व तृतीय स्थानावरील उमेदवारांना ठराविक एतच् बाबत शंका असेल ते उमेदवार प्रत्येक ईव्हीएम साठी ४७ हजार दोनशे रुपये भरून चेकिंग वेरिफिकेशन करू शकतात. यात डमी मतदानाद्वारे मशिनची तपासणी केली जाते. तसेच दुसरा पर्याय म्हणजे न्यायालयाकडे दाद मागू शकतात.

# भाजीपाला बाजार भरतो रस्त्यावर; भोकर बाजार समितीचे दूर्लक्ष



**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. ०३ डिसेंबर**

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्डात दररोज भाजीपाला विक्रेते रस्त्याच्या मधोमध आपले बस्तान मांडून आपली दूकाने थाटत असल्याने ग्राहकांना या रस्त्याने दूचाकी चालवणे सोडा पायी चालणे मूश्किल झाले आहे. भोकर बाजार समिती उघड्या डोळ्यांनी पाहून देखील यावर कोणतीही कार्यवाही करित नाही.माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान खासदार अशोकराव चव्हाण यांचे वर्चस्व असलेल्या भोकर बाजार समितीचे सभापती सह संचालक मंडळाचेही बाजार समितीच्या यार्डातील समस्येकडे साफ दूर्लक्ष होत आहे. विकासाच्या गप्पा मारणाऱ्यांना भोकर बाजार समिती यार्डातील भाजीपाला विक्रेत्यांना निर्माण होत असलेल्या समस्या दूर करता येत नसल्याने अश्चर्य व्यक्त होत आहे.परिसरात सर्वत्र घाणच घाण या रस्त्याने जाताना नाकाला रुमाल लावावा लागतो अस्वच्छतेमूळे दूर्गंधी पसरलेली दिसते भाजीपाला व्यापारी रस्त्याच्या मधोमध दूकाने थाटलेली असताना बाजार समिती प्रशासन या व्यापाऱ्यांवर कोणतीही कार्यवाही करीत नाहीत परिणामी सदरील व्यापारी मूजोर झाल्याचे निदर्शनास येत असून तसेच या घाणीमूळे भूसार व किराणा कापड व्यापाऱ्यांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.बाजार समितीने या परिसरात होत असलेल्या घाणीकडे लक्ष देवून भाजीपाला विक्रेत्यांना योग्य त्या सूचना देवून ग्राहकांना रस्ता खूला करुन देण्यात यावा अशी मागणी भोकर शहरातील सूज्ञ नागरीक करित आहेत.

## संक्षिप्त वृत्त




### मुदखेड येथील मूकबधिर विद्यालयात जागतिक दिव्यांग दिन साजरा

**मुदखेड**-शहरातील कृष्णा नगर येथील मुकबधिर विद्यालयात दरवर्षी प्रमाणे याही वर्षी जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला.शहरातील मूकबधिर विद्यालयात जागतिक दिव्यांग दिन प्रतीवर्षा प्रमाणे याही वर्षी दि.३ डिसेंबर रोजी साजरा करण्यात आला आहे. सर्व प्रथम दिव्यांगाची जनक डॉ हेलन केलर यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे सचिव एस.एस. सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर शहरातील मुख्य मार्गाने दिव्यांग विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली व दिव्यांग विद्यार्थ्यांना फळे वाटप करण्यात आले. यावेळी मूकबधिर विद्यालय शाळेचे संचालक एस.जे.सूर्यवंशी, मुख्याध्यापक एच.एस. गवलवाड, बी.एस.वाघ, एस. आर. हजारे, जी.व्ही.बामणे, के.ल. जामुंदे, जी. एम. शिंदे, हसेवाड, एन. एस. वाडेकर, यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती.

### उमाकांत मठपती महाराज यांचे निधन

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर रहिवासी तथा श्री.संगमेश्वर माध्यमिक विद्यालय,बडूर येथील संगीत शिक्षक उमाकांत अप्पा कलयाप्पा मठपती (५३) यांचे अल्पशा आजाराने दि.०२



डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता नांदेड शहरातील खाजगी रूग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी सकाळी १० वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.वीरशैव, वैष्णव संप्रदाय, प्रासंगिक गाव भजन, कीर्तन, प्रवचन सप्ताह, साई शिक्षण संस्थेतील उपक्रम आदि सांस्कृतिक कार्यक्रमात मृदंग, तबला वादक म्हणून त्यांचा मोलाचा सहभाग होता. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, तीन भाऊ, वहिणी, एक बहीण, जावई असा मोठा परिवार आहे. आदमपूर येथील प्रसिद्ध किराणा व्यावसायिक रमाकांत मठपती, शिवकुमार मठपती, मन्मथ महाराज मठपती यांचे ते जेष्ठ बंधू होत.

### प्रेमलाबाई रेवलकर यांचे निधन

**नांदेड**-हडको येथील प्रतिष्ठित महिला श्रीमती प्रेमलाबाई प्रभाकरराव रेवलकर यांचे सोमवार, दि. २ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता वृद्धापकालाने परभणी येथे निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ९० वर्षे होते. प्रेमलाबाई रेवलकर ह्या गेल्या अनेक दिवसांपासून आजारी होत्या. त्यांच्यावर परभणी येथील खाजगी रूग्णालयात उपचार चालू होते. यादरम्यान त्यांना घरी आणले असता त्यांचे निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर सोमवारी सायंकाळी परभणी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात बाँड विक्रेते विनायक, अशोक, दिनकर असे तीन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### विश्वप्रमुख चिन्मय मिशन स्वामी स्वरूपानंद यांचा गीता ज्ञानयज्ञ

**नांदेड**-येथील चिन्मय मिशन शाखा नांदेडच्या वतीने विविध धार्मिक व सामाजिक प्रकल्पांतर्गत येत्या दि. ९ ते १२ डिसेंबर या कालावधीत विश्वप्रमुख चिन्मय मिशन स्वामी स्वरूपानंदजी सरस्वती यांच्या भगवद्गीता ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील कार्यक्रम सायंकाळी ६-३० ते ८ या वेळेत कुसुम सभागृहात संपन्न होणार आहे. कार्यक्रमात भक्तीयोग या विषयावर विवेचन लाभणार आहे. चिन्मय मिशन शाखा नांदेडचे आचार्य स्वामी प्रत्ययानंदजी सरस्वती यांच्या मार्गदर्शनात संपन्न होत असलेल्या गीता ज्ञानयज्ञात दि. १० ते १२ डिसेंबर दरम्यान सकाळी ७-१५ ते ८-१५ या वेळेत ईशावास्योपनिषद या विषयावर स्वामी स्वरूपानंद सरस्वती यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभणार आहे.

# किनवट तालुक्यातील बेसुमार गौणखनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कार्यवाही करा

**सहा. जिल्हाधिकारी मेघना कावली यांना पत्रकार संघटनेचे निवेदन**

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ०३ डिसेंबर**



तहसिल कार्यालयाच्या कार्यकक्षेतील गायरान असुरक्षीत असून ब्लॉस्टींग करुन अमर्याद दगडाचे उत्खनन चालू आहे. रेती/वाळू पैनगंगेसह इत्तर नदी-नाल्यातून प्रचंड उपसा आणि वाहतूक चालू आहे. मुरुमाचेही उत्खनन आणि वाहतूक चालू आहे. किनवट, गोकुंदा, इस्लापूर, शिवणी, मांडवी, सारखणीसह अनेक ठिकाणी अवैध धंद्यांनी उच्चांक गाठला आहे. त्याची जबाबदारी तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांवर निश्चीत करुन कारवाई करा, अन्यथा पत्रकारांच्या वतीने आंदोलन छेडण्याचा इशारा सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

ज्या ज्या सज्जातून अवैध उत्खनन होत आहे तेथिल तलाठ्यावर त्याची जबाबदारी निश्चीत करुन उत्खनन स्थळांचे पंचनामे करुन त्यांच्याकडून नुकसान भरपाई करुन घ्यावी, तरच अवैध धंद्यांना लगाम लागणार आहे. किनवट तालुका सिमेलगतच्या पैनगंगानदी पात्रातील भंडारवाडी, पिंपरी, येंदा, भूजजा-मदनापूर, गोकुंदा, कोठारी, तिनफाटा, लक्कडकोट, मारेगाव, खंबाळासह लहान-मोठ्या दाभाडी, दूधगाव, शनिवारपेठ, खेरडा, मलकापूर अशा विविध ठिकाणाहून रेतीचा उपसा आणि वाहतूक चालू आहे. मुरुमाचाही पुरवठा केला जात आहे. वर्षाकाठी केवळ ३०० ब्रासचा नाममात्र रायल्टीचा भरणा करुन बहूतांश बारमाही विटभट्या चालवल्या जातात. आपल्या कार्यकक्षेतील गायरान जमिनीची भयानक अवस्था आहे. प्लाट व्यावसायीकांनी गिळंकृत करण्यावर भर दिला आहे. कांही ठिकाणी ब्लॉस्टींग करुन दगड काढला जात आहे. संबंधीत तलाठ्यास याची पूर्ण माहिती असतांना त्यांनी तहसिलदारांना कळवले का? कळवले असेल तर तहसिलदारांनी वर्षभरात काय कारवाई केली? असाही पत्रकारांचा सवाल आहे. तलाठ्यांनी तहसिलदारांपासून जाणीवपूर्वक माहिती लपविली असावी, असा अनेकांचा संशय आहे. रेती, मुरुम, दगड शासकीय जमिनीतून चोरीला जात असेल तर ते रोखण्यात संबंधीत तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांनी अकार्यक्षमता दाखवली असल्यास त्यांची जबाबदारी निश्चीत करुन चोरीला समर्थन देणाऱ्यांवर कारवाई करायला हवी. शासनाची मालमत्ता, गौणखनिज, गायरान जमिन अबाधित ठेवण्यात कर्तव्यकसुरता केलेल्यांवर तात्काळ कारवाई करा अन्यथा किनवटच्या उपविभागीय कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशारा ३ डिसेंबर रोजी सहायक जिल्हाधिकारी कावलींना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

# सी सी रस्त्याचे काम दर्जेदार करण्यात यावे मुख्याधिकाऱ्यांकडे नागरिकांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ०३ डिसेंबर**

मुदखेड शहरात विविध विकास कामांचे भूमिपूजन माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते निवडणुकी पुर्वी करण्यात आले होते. शहरातील सुभाष गंज मोंढा लिंबोनीनगर भागात माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते नुकतेच गऊळी समाज मारोती मंदीर ते साई बाबा मंदिर बालाजी गोडसे यांच्या घरापर्यंत सी सी रस्ता बांधकामांचे भुमिपुजन करण्यात आले होते.



सदर सी सी रस्ता हे कमीतकमी एक फुट खोदकाम करुन दर्जेदार करण्यात यावा या रस्त्यावर सिमेंट व घडी पावडर चे १६ चाक असलेले वाहणं तसेच गॅस एजन्सी चे सिलेंडर भरून हांडे वाहन आठवड्यातून चार ते पाच वेळा या रस्त्यावरून वाहतूक होत असुन सदर रस्त्यामध्ये निकृष्ट किंवा थातूरमातूर न करता गजाळी रॉड दर्जेदार सिमेंट वापरून हा रस्ता करण्यात यावा अशा मागणीचे निवेदन येथील रहिवासी पुष्पाबाई सोनी, नागनाथ गोडसे, अरविंद पिंगळे, प्रतिक चिद्रावार, श्रीनिवास वट्टमवार, कमलेश चौदंते, ईश्वर पिन्नलवार, रामराव बोधनकर, श्रीकांत कालाणी, रोहीत आंबरखाणे, पिंटू ठाकूर यांनी मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले.



**हदगाव**-एल. आय. सी. विमा प्रतिनिधींची संघटना ऑल इंडिया लियाफि तर्फे विमाधारक आणि विमा प्रतिनिधींच्या विविध मागण्यांचे निवेदन हिंगोली लोकसभेचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांना देण्यात आले. खासदार महोदयांनी संसदेत हा मुद्दा उपस्थित करण्याचे आश्वासन दिले.यावेळी संघटनेचे बहुसंख्य पदाधिकारी उपस्थित होते.

# समाजाने दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी पुढाकार घ्यावा : मीनल करनवाल

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०३ डिसेंबर**



दिव्यांग व्यक्तींप्रती समाजाने अधिक संवेदनशील असणे आवश्यक असून त्यांच्या सक्षमीकरणसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी केले.

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त नांदेड जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग, महात्मा गांधी सेवा संघ संचालित दिव्यांग पुनर्वसन केंद्र व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे प्रभारी सचिव महेश सोवजी, बालरोगतज्ज्ञ डॉ. आशिष अग्रवाल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, निवृत्त समाज कल्याण अधिकारी बापू दासरी, समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार आदींची उपस्थिती होती.

पुढे त्या म्हणाल्या, जिल्हा परिषदेतील दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती आणि त्यांच्यासमोर येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी मी संवेदनशीलतेने कामे केली आहेत. भविष्यातही दिव्यांग कर्मचाऱ्यांचे हक्क आणि त्यांच्या गरजा पूर्ण करण्यावर प्राधान्य दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगीतले. आयएएस प्रशिक्षणादरम्यान दिव्यांग अधिकारांबाबत घेतलेल्या प्रशिक्षणाचा उल्लेखही त्यांनी यावेळी केला. समाजातील प्रत्येक व्यक्तीने दिव्यांग व्यक्तींसाठी पुढाकार घेऊन त्यांना मदत करण्याची गरज आहे, तसेच दिव्यांगांच्या गरजांकडे लक्ष देणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी केले.

या सोहळ्यात महेश सोवजी यांनी दिव्यांग व्यक्तींना न्यायालयीन तरतुदींबाबत माहिती दिली. तसेच, डॉ. आशिष अग्रवाल यांनी मार्गदर्शन करातांना समुपदेशन हे दिव्यांगांच्या जीवनातील महत्त्वाचे घटक असल्याचे सांगीतले. माजी समाजकल्याण अधिकारी बापू दासरी यांनीही यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार यांनी केले. सुत्रसंचालन नितीन निर्मल तर उपस्थितांचे आभार कैलास मोरे यांनी मानले. या कार्यक्रमाला जिल्हयातील दिव्यांग शाळेतील कर्मचारी, दिव्यांग संघटनेचे पदाधिकारी यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# कुटूंब अर्थसाहाय्य योजने अंतर्गत प्रस्ताव धुळखात

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर,दि. ०३ डिसेंबर**

हिमायतनगर तालुक्यातील गेल्या एका वर्षापासून कुटुंब अर्थसहाय्य योजनेअंतर्गत प्रस्ताव धुळखात पडले असून या बाबीकडे लोकप्रतिनिधींचे अक्षम दुर्लक्ष होत आहे. कुटुंब अर्थसहाय्य योजनेअंतर्गत घरातील कर्ता पुरुष किंवा स्त्री यांचे आकस्मिक निधन झाल्यावर कुटुंबाला अर्थसहाय्य मदत म्हणून २० हजाराची आर्थिक मदत शासनाकडून मिळत असते. पुरुष किंवा स्त्रीचे किमान वय ४५ च्या आत असले पाहिजे. व लाभार्थी हा दारिद्र्यरेषेखालील असला पाहिजे सदरील प्रस्ताव सादर करण्यासाठी घरातील पुरुष किंवा स्त्रीचे निधन झाल्यावर किमान तीन वर्षाच्या आत हे प्रस्ताव सादर करता येतात.

सदर रक्कम ही कर्त्या पुरुषाच्या निधनानंतर कुटुंबाला अर्थसहाय म्हणून तात्काळ मिळणे गरजेचे आहे पण गेल्या एक वर्षापासून तहसीलमध्ये कुटुंब अर्थसहायच्या फाईली धुळखात पडल्या असून या बाबीकडे संबंधित तहसीलदार यांनी लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे. हिमायतनगर तालुक्यातील एकुण १० प्रस्ताव दाखल झालेले असुन यामध्ये ८ प्रस्ताव मंजूर झाले असल्याची माहिती मिळाली असून गेल्या एका वर्षापासून मंजूरी मिळून सुध्दा आजपर्यंत अनुदानाची रक्कम लाभार्थ्याच्या खात्यामध्ये जमा झाली नाही. या गंभीर बाबीकडे जिल्हा अधिकारी अभिजित राऊत तसेच खासदार नागेश पाटील आष्टीकर आमदार बाबुराव कोहळीकर यांनी लक्ष देवून कुटुंब अर्थसहाय्य योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या प्रस्तावाची रक्कम लाभार्थीच्या खात्यात वर्ग करावे अशी मागणी होत आहे.

# इस्लापूर येथील जलजिवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठ्याचे काम निकृष्ट ; ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे जनता त्रस्त

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर,दि. ०३ डिसेंबर**

इस्लापूर येथे जलजिवन मिशन अंतर्गत चे पाणी पुरवठ्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे होत असून, ठेकेदाराकडून मनमानी पद्धतीने निकृष्ट दर्जाचे काम जनतेच्या माथी मारण्याचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. या बोगस व निकृष्ट दर्जाच्या कामाची जायमोक्यावर सक्षम अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करून ठेकेदारांवर कारवाईचा बडगा उगारावा अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

इस्लापूर येथे कायमस्वरूपी पाणी पुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाकडून कोट्यावधी रूपयांचा विकास निधी मंजूर झाला. या प्राप्त निधीतून गेल्या दोन वर्षांपासून अतिशय कासव गतीने या पाणी पुरवठा योजनेचे काम सुरू आहे. या कामात मोठी अनियमितता असून ठेकेदाराने प्रशासकीय यंत्रनेला मॅनेज करून मोठ्याप्रमाणात बोगस व निकृष्ट दर्जाचे काम तेहि निकृष्ट दर्जाचे उरकविले जात आहे. सतत दोन अडीच वर्षापासून चालू कामांमुळे जनता त्रस्त झाली आहे. जलजिवन च्या कामात पाईपलाईन करण्यासाठी अंतर्गत रस्ते खोदून ठेवले असल्याने पावसाळ्यात चिखलाचे साम्राज्य पसरले होते. आणी नागरीकांना मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागले. आता ही पावसाळा संपला तरी रस्त्यावर खड्डेच खड्डे असल्याने नागरीकांना धड पायी चालताना येत नसल्याने मोठा त्रास सहन करावा लागत आहे या बोगस व निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी होणे क्रमप्राप्त ठरत असून, जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी एका सक्षम अधिकाऱ्यांमार्फत व तसेच विशेष समिती स्थापन करण्यात यावी. यासमितीसह क्वालीकंट्रोल मार्फत चौकशी करून ठेकादाराचे नाव काळ्या यादीत टाकून,या कामात मोठी अनियमितता असतांनाही सुधारीत मूल्यांकन करून ठेकेदारास अभय देणाऱ्या शाखा अभियंता, उप अभियंता व उपरोक्त दोषींवर कारवाई चा बडगा उगारावा. अशी मागणी इस्लापूर वाशियं जनतेतून पुढे आली आहे.

**खोदलेले रस्ते दुरुस्ती कधी होणार ? जलजिवनचे पाणी काही मिळेना !**





# नरसी तील भंडारा डोंगरावरील जागृत खंडोबाचा वार्षिक महोत्सव अंतिम टप्प्यात

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. ०३ डिसेंबर**

नरसी येथील भंडारा डोंगरावरील श्री.क्षेत्र खंडोबा देवस्थानचे सवीसावे वार्षिक महोत्सव असुन.या महोत्सवाचे औचित्य साधून. मंदिर कमिटीच्या वतीने मंदिर परिसराची साफसफाई रंग रंगोटी व विद्यूत रोषणाई ची जय्यत तयारी अंतीम टप्प्यात आले आहे. नायगांव तालुक्यातील नरसी येथील भंडारा डोंगरावरील जागृत जाज्वल्य अनेक भक्तांच्या नवसाला पावन होणारे येथील श्री क्षेत्र खंडोबा चे तिर्थक्षेत्र असुन.या ठिकाणच्या श्री क्षेत्र खंडोबा या तिर्थक्षेत्राला नांदेड जिल्ह्यातीलच नव्हे. पर राज्यातून ही हाजारो भाविक सातत्याने दर्शनासाठी येत असतात अशी सर्व दुर येथील श्री.क्षेत्र खंडोबा देवस्थानची प्रसिध्द ख्याती आहे. अशा जागृत जाज्वल्य भंडारा डोंगर माथ्यावरील तिर्थक्षेत्र खंडोबा देवस्थानचा प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मार्ग शिर्षक शुध्द सप्तमी शके १९४६ दि. ८ डिसेंबर २०२४ रोज रविवारी सविसावा वार्षिक महोत्सव आयोजित केला आहे. सविसाव्या वार्षिक महोत्सवाच्या निमित्ताने येथील तिर्थ क्षेत्राच्या स्थळी येणाऱ्या सर्व भाविक भक्तांची विज, पाणी यासारख्या भौतिक सुविधा उपलब्ध असायला हवी या अनुषंगाने येथील मंदिर कमिटीच्या वतीने यामंदिर परिसरात साफ सफाई व रंगरंगोटी विद्यूत रोषणाई ची सध्या जोरदार जय्यत तयारी ही अंतिम टप्प्यात आली आहे.



यंदाचा सविसावा वार्षिक महोत्सव हा दि. ८ डिसेंबर २०२४ रोज रविवारी सकाळी नरसीतील(जुने गांव)होळकर नगरातील श्री क्षेत्र खंडोबा देवस्थानचे पुजारी गणपती मल्हारी पाटे यांच्या निवासस्थानापासून वारु- वाघे,भाविक भक्तांच्या उपस्थितीत खोबरे-भंडारा ची उधळण करीत या पालखी सोहळ्याला सुरुवात होईल. जिल्ह्यातील व पर जिल्ह्यातील भाविक भक्त मंडळीनी सहभागी होऊन यंदाच्या सविसाव्या वार्षिक महोत्सवात सहभाग नोंदवून महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे नरसीतील श्री क्षेत्र खंडोबा मंदिर व्यवस्थापनाचे अध्यक्ष माधव मेकॉले,उपाध्यक्ष मारोती वडगावे, माणिकराव लोहगांवे, नरसी चे माजी सरपंच व्यंकटराव कोकणे, नरसी तंटा मुक्तीचे मा.अध्यक्ष गंगाधर वडगावे, चंद्रशेखर कोकणे देविदास कोकणे, शाम सुंदर कोकणे, संग्राम मुगांवे, नरसी ग्रामपंचायतीचे माजी सदस्य हाणमंत मिसे, शिवाजी नारे, नरसी येथील खंडोबाचे निस्सीमभक्त गोविंदराव टोकलवाड, पांडूरंग बागडे सह सदस्य मंडळींनी आवाहन यावेळी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# विज्ञान उपकरण निर्मितीतून विदयार्थ्यांचा शाश्वत विकास झाला पाहीजे- शिक्षणाधिकारी भगवान फुलारी

## तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३ डिसेंबर**



गट शिक्षणाधीकारी कार्यालय पंचायत समिती माजलगा व श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालय माजलगाव यांच्या संयुक्त विदयमाने आयोजित तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी प्राथमीक विभागाचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी बोलत होते .यावेळी त्यांनी सांगितले की, विज्ञान उपकरण निर्मितीतून विद्यार्थ्यांमधील सृजनशीलता विकसित होऊन वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होतो. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन दिपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करुन झाले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश दुगड, तर उदघाटक माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे, तर विचारपीठावर प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारी, उपशिक्षणाधिकारी हजारे साहेब, उपशिक्षणाधिकारी मोहनराव काकडे, गटविकास अधिकारी श्रीमती ज्योत्स्ना मुळीक, गटशिक्षणाधिकारी माजलगाव रवींद्र महामुनी, गटशिक्षणाधिकारी केज लक्ष्मण बेडसकर, विज्ञान विभाग प्रमुख लक्ष्मण पोटभरे ,माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर इत्यादी उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारी यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी शाश्वत ज्ञान प्राप्त करण्यासाठी आतूर असले पाहिजे यासाठी अत्यंत प्रभावी उदाहरणे त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले. यानंतर गटविकास अधिकारी श्रीमती ज्योत्स्ना मुळीक यांनीही प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण (practical knowledge ) घेण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना प्रकाश दुगड यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना शाश्वत शिक्षण मिळावे यासाठी शासनाने अटलटिंकरिंग लॅब, कार्यान्वित करण्यात आली आहे. यातून विज्ञानाच्या विविध संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होते. प्रास्ताविक रवींद्र महामुनी (गटशिक्षणाधिकारी माजलगाव) यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार सदाशिव ढगे व सुत्रसंचलन श्रीमती सुरेखा गवळी यांनी केले. कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली कल्याण मंत्र विभाग प्रमुख रवींद्र खोडवे यांनी सांगितला. या विज्ञान प्रदर्शनात इयत्ता नववी ते बारावी व सहावी ते आठवी या गटातून तालुक्यातील सर्व शाळांनी सहभाग नोंदवला. यावेळी तालुक्यातील सर्व केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक विद्यार्थी उपकरणासह उपस्थित होते. तसेच संपूर्ण प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे, सचिन मोती , रवि अदमाने , विठ्ठल पवार , पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने सर्व विज्ञान विषय शिक्षक, प्रयोगशाळा परिचर, शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# कलाकारांवर होणारा अन्याय शिवसैनिक कदापि सहन करणार नाहीत; अनिलदादा जगताप यांचा इशारा

**नगर परिषदेने तात्काळ थकीत वीजबील भरून कलाकारांच्या नाट्यगृहाचा अंधार दूर करावा**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ डिसेंबर**

कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून बीडची ओळख सर्वश्रुत आहे असून याच कलाकारांना स्वतःच्या कलेचं सादरीकरण करण्याकरिता बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह एकमेव पर्याय आहे. मात्र कलाकारांच्या या नाट्यगृहाकडे बीड नगर परिषद वारंवार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करताना दिसून येते आहे. राज्य नाट्य स्पर्धा ऐन तोंडावर आलेली असताना सध्य परिस्थितीत कलाकारांचं नाट्यमंदिर अंधारात धूळ खात पडलेलं आहे. काल रोजी नाट्यगृहाचे १ लाख २० हजार रुपये थकीत वीजबील दिले नसल्याने महावितरण अधिकाऱ्यांनी नाट्यगृहाचा वीज पुरवठा बंद केला आहे. बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी सौ नीताताई अंधारे यांनी तात्काळ कलाकारांच्या नाट्यगृहाची वीज थकबाकी भरून नाट्यगृहातील अंधार दूर करावा. कलाकार शहराचे संस्कृतीक वैभव टिकवण्याचे काम करतात. या कलाकारांना कोणी वाली नाही असा गैरसमज मुख्याधिकारी सौ नीताताई अंधारे यांनी करून घेऊ नये. कलाकारांच्या पाठीशी कायम शिवसेना मोठ्या ताकदीने उभी आहे त्यामुळे कलाकारांवर होणारा अन्याय शिवसैनिक कदापि सहन करणार नाहीत. असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी मुख्याधिकारी सौ नीताताई अंधारे यांना दिला आहे.



गेल्या आठ ते नऊ महिन्यांपासून नाट्यगृहातील कर्मचाऱ्यांचा पगार देखील नगर परिषदेने दिला नाही. गोरगरीब कर्मचारी रात्रंदिवस नाटयगृहाची निगा राखतात, नाट्यगृहाची काळजी घेतात असे असताना जर त्यांचा महिन्यानुमहीने पगार होत नसेल तर ही बाब निष्काळजीपणाची आहे त्यामुळे मुख्याधिकारी अंधारे मॅडम यांनी नाट्यगृहातील कर्मचाऱ्यांच्या पगाराची देखील लवकरात लवकर सोय करावी असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी मुख्याधिकारी सौ नीताताई अंधारे यांना केले आहे.

# राज्यमंत्रिपदाचा अनुभव असणाऱ्या आ.प्रकाशदादा सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा

## सभापती नरवडे उपसभापती मोरे यांची पक्षश्रेष्ठीकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३ डिसेंबर**







माजलगाव मतदारसंघाचा विकास आ.प्रकाश सोळंके यांनीच केला आहे.आणि विकासाचा जो बॅगलॉग राहिला आहे.तो पूर्ण करण्याची धमक ही आ.प्रकाशदादा सोळंके यांचीच आहे.त्यामुळे विकास पुरुष असणाऱ्या व राज्य मंत्रिपदाचा अनुभव असणाऱ्या प्रकाशदादांचा पुन्हा मंत्रिमंडळात समावेश करण्याची मागनी बाजार समितीचे सभापती जयदत्तआण्णा नरवडे व उपसभापती श्रीहरीनाना मोरे यांनी पक्षश्रेटीकडे केली आहे.

माजलगाव मतदार संघात विकासाची मुहूर्तमेढ माजी उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांनी रोवली आहे.तोच आदर्श आ. प्रकाश सोळुंके यांनी मतदारसंघात सुरू करून विकासाची गंगा या ठिकाणी ओढून आणली आहे. राज्यमंत्रीपदाच्या आपल्या कार्यकाळात त्यांनी मतदार संघाचा कायापालट केला आहे.मंत्री पदाचा त्यांना अनुभव आहे.मतदारसंघात जो विकास झाला आहे,तो आ. प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली झाला आहे.त्यामुळे नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदार संघातील मतदारांनी आ. प्रकाश सोळंके यांना पाचव्यांदा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली आहे.मागील तीस वर्षांमध्ये आ.प्रकाश सोळंके यांनी मोठ्या प्रमाणात विवीध विकासकामे केली आहेत. विद्यार्थ्यांचे,सुशिक्षित बेरोजगारांचे, त्याचप्रमाणे जलसिंचनाचे,अनेक प्रश्न मार्गी लावल्याने बहुतांशी शेतकरी आज समृध्द झाला आहे. विकासाचे अनेक कामे झाली आहेत.उर्वरित विकासाचा जो बॅकलॉग भरून काढायचा आहे, तोही आ.प्रकाश सोळंकेच काढू शकतात.विकासाची दूरदृष्टी त्यांच्याकडे आहे.मंत्री पदाचा अनुभवही त्यांच्याकडे आहे त्यामुळे आ.प्रकाशदादा सोळंके यांना मंत्रिमंडळात समावेश करण्याची मागणी बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे व उपसभापती श्रीहरी मोरे यांनी शिष्टमंडळाद्वारे पक्षश्रेष्ठीकडे केली आहे.

# समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी मतभेद विसरून एकजूट होण्याची गरज

## श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांची समाजबांधवांना साद; तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या जयंती सोहळ्याला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३ डिसेंबर**



समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी वीरशैव लिंगायत समाज बांधवांनी आपसाआपसांतील सर्व मतभेद विसरून एकजूट करण्याची गरज आहे, समाजासमोर नवा आदर्श प्रस्थापित करावा, असे आवाहन सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाचे विद्यमान मठाधिपती श्रीगुरु चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी केले आहे. दरम्यान, सोमवारी श्री संस्थान मठ माजलगाव येथे लिंगैक्य तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या तृतीय जयंतीनिमित्त सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला समाज बांधवांनी मोठा प्रतिसाद दिला.

लिंगैक्य तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या तृतीय जयंती निमित्ताने श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या नेतृत्वाखाली वीरशैव समाजातील सर्व लिंगायत व पोटजाती यांचा दुसरा वधू-वर परिचय मेळावा मोठ्या थाटात संपन्न झाला. सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाचे पूर्वाचार्य लिंगैक्य प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांचा तृतीय जयंतीनिमित्त विविध धार्मिक विधी आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पुढे बोलताना मठाधिपती श्रीगुरु चंद्रशेखर शिवाचार्य महाराज आपल्या आशीर्वचनात म्हणाले, सामाजिक एकोपा टिकवून ठेवण्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी वीरशैव लिंगायत समाजाने इतर समाजाच्या तुलनेत आदर्श निर्माण करावा जेणेकरून समाजाचे हित होईल, असे आवाहन मठाधिपती यांनी केले. श्री संस्थान मठात सकाळी ८ वाजता ते १० वाजता लिंगैक्य श्रीगुरू तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांचे समाधीस रूद्राभिषेक, १० वाजता आरती व श्रीगुरूंचे आशिर्वचन व वधू-वर परिचय मेळावा झाला. वधू-वर परिचय मेळावा यशस्वी करण्यासाठी डॉ.गजाननआप्पा होन्ना, मनोहरअप्पा जामकर, कैलासआप्पा खुर्पे, राजाभाऊआप्पा लोखंडे, सुचेंद्रअप्पा महाजन, नितीनअप्पा शेटे, संजयअप्पा मोगरेकर, विकासआप्पा पाटील, प्रशांतआप्पा शेटे, रामेश्वरआप्पा काटकर, कैलासआप्पा लांडगे, सुरेशआप्पा कुरूळे, गणेश तोडकरी यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव पेठकर यांनी केले. तर वधू-वरांचा परिचय प्रा.गजानन होन्ना यांनी उपस्थितांना करून दिला.

लवकरच सामुहिक विवाह सोहळा आयोजन

सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठ संस्थान माजलगावच्या वतीने यंदाही भव्य स्वरूपात वीरशैव लिंगायत समाजातील सर्व पोटजातीतील वधू-वर परिचय मेळाव्याचे सोमवारी आयोजन करण्यात आला होते. काळाबरोबर सामाजिक बांधिलकीचा वसा घेत मठातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. आजमितीला समाजाच्या हितासाठी वधू-वर परिचय मेळावा आवश्यक आहे, अशी प्रतिक्रिया मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी दिली. दरम्यान, येत्या ३१ डिसेंबरपर्यंत वधू-वरांची नोंदणी करता येईल, लवकरच सामुहिक विवाह सोहळ्याचेही होणार असल्याचे श्री संस्थान मठा माजलगाव तर्फे कळविण्यात आले आहे.

# शरीरासोबतच बुद्धी व मन सुदृढ असेल तर यश हमखास मिळतेच-सतीश बलुतकर

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३ डिसेंबर**



शरीरासोबतच मनुष्याची बुद्धी व मन सुदृढ असेल तर यश हे हमखास मिळतेच अशी भावना क्रीडा शिक्षक सतीश बलुतकर यांनी व्यक्त केली. ते सोमवार दि २ डिसेंबर रोजी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इ. ५वी ते ९वी इयत्तांच्या वार्षिक किडा महोत्सवाच्या उद्‌घाटन प्रसंगी बोलत होते. याप्रसंगी शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.या क्रीडा स्पर्धेची सुरुवात हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

दरवर्षी विद्यार्थी या स्पर्धांची आवर्जुन वाट पहात असतात. या वार्षिक क्रीडा स्पर्धा महोत्सवात इ ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या धावणे, रिलेरेस, थैला रेस, संगीत खुर्ची, दोरीवरील उडया, कब्बडी त्याचबरोबर खो खो या खेळासह विविध क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा होणार आहेत. या क्रीडा स्पर्धेचे प्रास्ताविक क्रीडा विभाग प्रमुख गायके एन. के. यांनी केले. आतापर्यंत संस्थेतील विद्यार्थ्यांनी तालुका, जिल्हा, राज्य आणि राष्टीय पातळीवरील विविध क्रीडा स्पर्धेत उज्वल यश संपादन करतांना आपल्या संस्थेसोबतच शिक्षक तथा पालकांचे नाव उज्वल केले आहे असल्याचे आपल्या प्रास्ताविकामधुन गायके नानासाहेब यांनी सांगितले.

या कार्यक्रम प्रसंगी उद्घाटक सतिश बलुतकर यांनी आपल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आजच्या मोबाईलच्या काळात सर्वच वयातील विद्यार्थ्यांनी मैदानी खेळासाठी दररोज वेळ देण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.विज्ञान तंत्रज्ञान हे आजच्या युगात माणसाचे अविभाज्य घटक बनले असले तरी मैदानी खेळ देखील तेवढाच महत्वाचा असून त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नसल्याचे बलुतकर यांनी याप्रसंगी नमूद केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेतील संगीत शिक्षक सिनगारे एस.डी.यांनी केले तर किडा स्पर्धेचे प्रमुख कांबळे आर.एस. आणि पंच म्हणुन पाळेकर यु.ए. यांनी आपली भुमिका बजावली. स्पर्धेचे निकालपत्रक लिहण्याची जवाबदारी श्रीमती गजभिये डी.डी. यांनी चांगल्या पध्दतीने पार पाडली. शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी किडा स्पर्धा यशस्वी होण्याकरीता सहकार्य केले.

# आठव्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदान शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.३ डिसेंबर**

किल्ले धारूर : दिलासा संस्थेचे संस्थापक आणि शहरात पाणीपुरवठा व्यवस्था उभारण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे स्व. मधुकर भाऊ धस यांच्या आठव्या पुण्यतिथीनिमित्त किल्ले धारूर युथ क्लबच्या वतीने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. शहरातील बस स्थानक येथे पोलिस चौकीच्या प्रांगणात झालेल्या या शिबिरात शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत रक्तदान केले.

शिबिराचे उद्घाटन बस डेपो व्यवस्थापक नवनाथ चौरे, पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे, माजी नगराध्यक्ष उत्तम भाऊ तोष्णिवाल, डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.मयुर सावंत, युथ क्लब चे अध्यक्ष अभय चव्हाण,पत्रकार अतुल भैय्या शिनगारे, पत्रकार अविनाश ठोंबरे, पत्रकार अविनाश जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाऊंच्या प्रतिमेस हार फुले वाहून अभिवादन करण्यात आले.

या शिबिरात नवभुमी सामजिक संघटनेचे अध्यक्ष सुरेशराव गवळी, जेष्ठ बंडोबा शिंदे, सुभाष शिंदे, तेलंगणा येथील सेवानिवृत्त पोलिस अधिकारी कुलदिपकसिंह चौहान, अजित दादा शिनगारे यांनी उपस्थित राहून शिबिराचे उद्घाटन केले.

माजी अध्यक्ष प्रा.विजय शिनगारे यांनी भाषणात मधुकर भाऊ धस यांच्या कार्याची प्रशंसा करीत सांगितले की, त्यांच्यामुळे शहरात पाणीपुरवठा व्यवस्था उभारण्यात मोलाची मदत झाली. शहरातील तलाव खोलीकरण करण्यात आल्याने पाणीपातळी वाढली आणि शहरातील बोअरवेल व विहीरींना मुबलक पाणी उपलब्ध झाले.

माजी अध्यक्ष सुर्यकांत जगताप यांनी किल्ले धारूर युथ क्लबने गेल्या नऊ वर्षातील कार्याचा आलेख सादर केला. त्यांनी सांगितले की, मधुकर भाऊ धस यांच्यामुळे शहर पाणीदार झाले आणि गेल्या आठ वर्षांपासून त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदान शिबीर आयोजित केले जात आहे.पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी मधुकर भाऊ धस यांच्या पाणीच्या संवेदनशील विषयाकडे लक्ष देण्याच्या कार्याची प्रशंसा केली. त्यांनी किल्ले धारूर युथ क्लबच्या या पुढाकाराचे कौतुक केले.

बस डेपोचे व्यवस्थापक नवनाथ चौरे यांनी शिबिराचा समारोप करीत मधुकर भाऊ धस यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन केले आणि किल्ले धारूर युथ क्लबच्या कार्यास शुभेच्छा दिल्या.या रक्तदान शिबिरात यशोदिप पब्लिक स्कुलचे संचालक विशालसिंह दिख्खत व यशोदिप पब्लिक स्कुलच्या संचालिका तथा प्राचार्य सौ.चित्रा विशालसिंह दिख्खत यांनी सपत्नीक रक्तदान केले. तसेच बाबासाहेब धेवडे, सचिन पिंपळे, बालाजी लोकरे, सुरेश पिंपळे, सुरेश शिनगारे, दत्तात्रय गोरे, विशाल डोंगरे, विश्वानंद तोष्णिवाल,



यशवंतराव गायके, बाबासाहेब पवार, श्रेयश तोष्णिवाल, ऋषिकेश तोष्णिवाल, संदिप पुजदेकर, महादेव भोसले, आयुषकुमार तिवारी, गजानन लोकरे अश्या २० रक्तदात्यांनी रक्तदान केले.किल्ले धारूर युथ क्लबच्या वतीने कै.मधुकर भाऊ धस यांच्या पुण्यतिथीनिमित्त स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाचे रक्तपेढी विभागाचे तज्ञ अधिकारी डॉ.मधुकर गावित, आनंद सिताप, नजिब सय्यद, पवन हजारे, शेख बाबा, मुस्कान सय्यद, प्रियंका राऊत, साक्षी लोखंडे किल्ले धारूर युथ क्लब सामाजिक संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी रक्तदान शिबीर घेण्यास सहकार्य केले.

# सरकारी कार्यालयात संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्याचे श्री शनैश्वर प्रतिष्ठानच्या वतीने आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३ डिसेंबर**



श्री.संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती रविवारी (दि.०८) रोजी सर्व शासकीय,निम शासकीय कार्यालयात साजरी करण्यात यावी यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने परित्रक काढले आहे. त्यामुळे तालुक्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयात जयंती साजरी करण्यात यावी असे आवाहन तेली युवक संघटना, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा व शनैश्वर प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

सदुंबरे जिल्हा पुणे येथील श्री संताजी जगनाडे महाराज हे तुकाराम महाराजांच्या चौदा टाळकऱ्यातील प्रमुख टाळकरी होते. तसेच तुकाराम महाराजांची मुळ गाथा पाण्यात टाकण्यात आली होती. ती संपूर्ण गाथा श्री.जगनाडे महाराजांना मुखोद्गत होती. त्यांनी ही गाथा पुन्हा लिहून काढली. त्यामुळे श्री.संताजी जगनाडे महाराजांना मानणारा मोठा वर्ग संपूर्ण महाराष्ट्रात आहे. रविवारी (दि.०८) संताजी महाराजांचा जन्म दिवस साजरा करण्यात येतो. यासंदर्भात गेल्या दोन वर्षी पासून महाराष्ट्र शासनाने परित्रकात उल्लेख केला आहे. यंदाही महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी संदर्भात परिपत्रक जारी केले असून यामध्ये सर्व शासकीय, निम शासकीय कार्यालयात ८ डिसेंबरला संताजी महाराजांची जयंती साजरी करण्यात यावी असे निर्देश देण्यात आले आहेत. तालुक्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयात ही जयंती साजरी करण्यात यावी असे आवाहन तेली युवक संघटना व महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा, शनैश्वर प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# ईश्वर लोहिया यांचेकडून वसतिगृहातील विद्यार्थीनींना ऊबदार ब्लॅन्केटचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३ डिसेंबर**



शहरातील योगेश्वरी शिक्षण संस्थेअंतर्गत असलेल्या सावित्रीबाई फुले मुलींच्या वसतिगृहातील तीस गरीब विद्यार्थिनींना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा व्यापारी ईश्वर सेठ लोहिया यांनी ऊबदार ब्लॅंकेटचे वाटप केले. संस्था कार्यालयात मंगळवार दिनांक ३ डिसेंबर रोजी केलेल्या आयोजित आयोजित कार्यक्रमास योगेश्वरी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष गणपत व्यास गुरुजी, कार्यकारी उपाध्यक्ष ड. जगदीश चौसाळकर ,संचालक ड. कल्याणी विर्धे ,संचालक अंगद कराड, स्वप्निल लोहिया, राहुल तापडिया, मेजर एस पी कुलकर्णी, रवी मठपती यांची उपस्थिती होती.

सध्या कडाक्याची थंडी आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी उबदार व मऊ ब्लॅन्केटची आवश्यकता असते. योगेश्वरी शिक्षण संस्थेअंतर्गत असलेल्या सावित्रीबाई फुले मुलींच्या वसती गृहामध्ये तीस मुली शिक्षण घेत आहेत. त्यांची थंडीच्या दिवसांमध्ये सोय व्हावी. या उद्देशाने ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा व्यापारी ईश्वरसेठ लोहिया यांनी उबदार ब्लॅंकेट देण्यासाठी पुढाकार घेतला.संस्थेचे उपाध्यक्ष गणपत व्यास गुरुजी, ड. जगदीश चौसाळकर यांच्याकडे या ब्लॅंकेट सुपूर्द करण्यात आल्या. सदर उबदार ब्लॅंकेट विद्यार्थिनींना देण्यात येणार आहेत. संस्थेच्या वतीने ईश्वरसेठ लोहिया ,स्वप्निल लोहिया, राहुल तापडिया यांचा सन्मान व सत्कार करण्यात आला. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वेळोवेळी मदतीचा हात पुढे केला पाहिजे. त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या पाहिजेत. शक्य झाल्यास आर्थिक मदतही केली पाहिजे. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढे यावे असे आवाहन ईश्वरसेठ लोहिया यांनी सत्कारास उत्तर देताना केले. गणपत व्यास गुरुजी, ड. जगदीश चौसाळकर यांनी आपले मत व्यक्त करून लोहिया यांनी केलेल्या मदतीबद्दल आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सेवानिवृत्त प्राध्यापक गणेश पिंगळे यांनी व्यक्त केले.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. ०४ डिसेंबर २०२४



## जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जनजागृती रॅली



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०३ :- जिल्हा परिषद प्रशाला मुलांची पैठण,व म.रा.दिव्यांग विकास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दिव्यांग दिन निमित्त जनजागृती रॅली काढण्यात आली,

ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी हाताला हात दया,दिव्यांगाला साथ दया.

जागतिक दिव्यांग दिनाचा विजय असो. नका दाखवू नुसती सहानुभूती,प्रत्यक्षात करा कुर्ती. अशा विविध घोषवाक्यानी पैठण शहर दनाणुन सोडले.

सदरील रॅलीचे शिवाजी महाराज चौक येथे सभेत रूपांतर झाले. या वेळी दिव्यांग व्यक्तीना पुष्प गुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.या वेळी म.रा. दिव्यांग विकास परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष,समशेर पठाण यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की आम्ही,आमची शाळा व संघटना दिव्यांग व्यक्ती सोबत आहोत. दिव्यांगांनी दैनंदिन जीवनात येणाऱ्या आडी-आडचणीवर मात करून पुढे जायला पाहिजे आपल्या हक्काचे शिक्षण घेतले पाहिजे.शासन स्तरावर दिव्यांगासाठी भरपुर योजना आहेत त्याचा लाभ दिव्यांगांनी घेतला पाहिजे.

या वेळी मदन आव्हाड,नंदू चाटूपळे,पापजी, शिपनकर,एन.सी.सी.प्रमुख ताराचंद हिवराळे,दिलीप तांगडे, राजेश पाखरे,वैशाली कुटे,शेख यास्मिन,जोती बलखंडे,दिव्यांग जन,विद्यार्थी व पालक मोठया संख्येने उपस्थित होते.



साजापूर येथील आठवडी बाजार तळाजवळ खूप मोठ्या प्रमाणात कचरा आणून टाकल्या जात असल्याने त्या ठिकाणी दुर्गंधी सुटली होती परंतु साजापूर ग्रामपंचायतच्या वतीने आज सर्व कचरा हटविण्यात आला.

छाया: संजय निकम

## त्या खुनातील फरार आरोपी अखेर जेरबंद

तभा वृत्तसेवा

कन्नड - दि.०३ डिसेंबर - शहरातील समर्थनगर परिसरात झालेल्या खुनातील फरार आरोपीस अखेर जेरबंद करण्यास कन्नड शहर पोलिसांच्या पथकाला यश आले आहे

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार शहरातील समर्थनगर परिसरात दि.२२ सप्टेंबर रोजी गुरे हाकलण्यावरून वाद झाला होता या वादात शेख इफ्तीयार शेख हे इसम गंभीर जखमी झाले होते त्यांच्या डोक्याला गंभीर इजा झाल्याने त्यांना दवाखान्यात दाखल केले होते उपचार दरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली होती,

दि.२४ सप्टेंबर रोजी कन्नड शहर पोलिस स्टेशनमध्ये खुनाचा गुन्हा दाखल होताच पोलिसांनी चार आरोपींना अटक केली होती तर एक आरोपी फरार होता,पोलिसांच्या पथकाला गुप्त बतमीदारा मार्फत माहिती मिळाली त्या माहितीच्या आधारे दि.०२ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे सापळा लावून आरोपी इस्माईल इब्राहिम शेख वय ४७ वर्ष रा.पांढरी मोहल्ला कन्नड यास ताब्यात घेतले,

कन्नड न्यायालया समोर आरोपीला हजर केले असता न्यायालयाने आरोपीस दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली सदर कामगिरी उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड, पोलिस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी,पोलिस नाईक मोईस बेग,पोलिस कॉन्स्टेबल विजय चौधरी यांच्या पथकाने सदरील कारवाई केली

## आ. संजना जाधव यांचा प्रगती कॉलनीतील महिलांच्या वतीने सत्कार

कन्नड :- दि.०३ डिसेंबर - कन्नड-सोयगाव विधानसभा मतदारसंघातून महायुतीतील शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार संजना जाधव यांनी विजय मिळवत त्यांची आमदारपदी निवड झाली आहे. त्याबद्दल शहरातील विविध प्रभागात त्यांचा सत्कार करण्यात आला.

शहरातील सामाजिक कार्यकर्ते तथा युवा नेते संजना जाधव यांचे कट्टर समर्थक, पॉपुलर हॉटेलचे संचालक सिद्धार्थ निकाळजे यांच्या कुटुंबासह प्रगती कॉलनीतील रहिवाशांच्या वतीने नवनिर्वाचित आमदार संजना जाधव यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कॉलनीतील महिलांची व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी आमदार संजना जाधव यांनी सर्वांचे आभार मानले.

या सत्कार कार्यक्रमाप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते सिद्धार्थ निकाळजे म्हणाले की, आमच्या मार्गदर्शिका तथा नवनिर्वाचित आमदार संजना जाधव यांनी जिल्हा परिषद सदस्या असल्यापासूनच मतदारसंघात शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी अनेक प्रयत्न करत निस्वार्थ भावनेने तालुक्यातील प्रलंबित असलेले विविध विकास कामांचे प्रश्न सोडविले आहेत. यावेळी प्रथमच त्यांनी आमदारपदाची निवडणूक लढवली आणि भरघोस मताधिक्यांनी त्या विजयी झाल्या. याबद्दल सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते असे ते म्हणाले.

## आडगाव खुर्द येथे अक्काताई महाराज यांचे उपस्थितीत दत्त जयंती सोहळा



तभा वूतसेवा

खुलताबाद प्रतिनिधी आडगाव खुर्द येथे दत्त जयंती निमित्त वेरूळ येथील आश्रमाच्या हभप प.पु सद्गुरु अक्का महाराज यांच्या प्रेरणाने ११ ते १५ डिसेंबरच्या दरम्यान फिरता फिरता नारळी अखंड हरिनाम सप्ताह गुरुचरित्र पारायण दत्तयाग गीता जयंती सोहळा आयोजित केला आहे. यहा सोहळ्याचे ध्वजारोहण अभिषेक व पूजन ४ डिसेंबर रोजी होणार आहे. दररोज प. पु स्वामी विनायक महाराज यांच्या अमृतवाणीतून गीता पारायण सद्गुरु सुभाष बाबा महाराज यांचे प्रवचन होईल. या सप्ताहात वाल्मीक महाराज आवारे विजय महाराज जाधव हभप बबन महाराज केदारे पांडुरंग महाराज उगले उमेश महाराज दशरथे शिवाजी महाराज बोकारे.व काल्याची किर्तन सेवा अडबंगनाथ संस्थानचे मठपती स्वामी अरुणातगिरीजी महाराज आदी मान्यवरांचे कार्यक्रम होणार आहे. काल्याचा महाप्रसाद छत्रपती संभाजी नगरचे खासदार संदिपान जी भुमरे . यांच्यातर्फे देण्यात येणार आहे. व फुलंब्री मतदार संघाचा आमदार अनुराधाताई अतुल चव्हाण यांचे विशेष सहकार्य सप्त्यासाठी लाभले आहे.

## तरुण भारतच्या वृत्ताची दाखल — फूटपाथ वर थाटलेली दुकाने हटवली



वाळूज महानगर (प्रतिनिधी): ए एस क्लब परिसरात दोन्ही बाजूच्या फुटपाथवर अवैध रित्या कब्जा करून काही खेळणी विक्री करणाऱ्या विक्रेत्यांनी दुकाने थाटली होती, हे दुकानदार फुटपाथ वर कब्जा करुन वाहतुकीस अडथळा निर्माण करत याठिकाणी एखादा गंभीर अपघात होऊन जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने दैनिक तरुण भारत ने दिनांक १६ नोव्हेंबर रोजी फूटपाथवर थाटली दुकाने या मथळयाखाली वृत प्रकाशित केले होते. आज सकाळीच सिडकोच्या वतीने अतिक्रमण हटाव मोहीम रबविण्यात आले. यावेळी अगोदर सर्व दुकानदारांना आपापले दुकाने आणि साहित्य काढून घेण्याचे आवाहन करण्यात आले होते परंतु या दुकानदाराने आपली दुकाने सुरूच ठेवली होती म्हणून थेट जप्ती मोहीम राबवून काही दुकानदारांचे हातगाड्या व इतर साहित्य जप्त करत हे अतिक्रमण हटविण्यात आले. जप्त केलेले साहित्य परत फूटपाथवर दुकाने न लावण्याचे अटीवर दुकानदारांना देण्यात आले. ही अतिक्रमण हटाव मोहिम सुरूच राहणार असल्याचे सहाय्यक वसाहत अधिकारी स्वाती पाटील यांनी सांगितले. या पथकात स्वाती पाटील, तारामती भिसे , विनया वनवसे , विकास पवार आदींनी सहभाग नोंदवला.

## वक्तृत्व स्पर्धेत आयकॉन पॅराडाइजची देवयानी नरके पहिली



तभा वृत्तसेवा पैठण दि ०३ :- जिल्हा ग्रामीण रुग्णालय पैठण येथे जागतिक एड्स दिनानिमित्त शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'एड्स प्रतिबंधात्मक विषयावर' वक्तृत्व आणि पथनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी एड्स सबंधित विषयावर भाषणे केली. या वक्तृत्व स्पर्धेत आयकॉन पॅराडाइज ज्यू. कॉलेजची इयत्ता अकरावीची विद्यार्थीनी देवयानी नरके हिने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक प्रतिष्ठान महाविद्यालयाच्या सुषमा वाघ यांनी मिळवला तर तृतीय क्रमांक आर्यचाणक्य विद्यामंदिरची ज्ञानदा शामदेव हिला मिळाला.

देवयानी नरके ने आपल्या भाषणात एच.आय.व्ही. एड्स बाबत समाजात असलेले गैरसमज दूर कसे करता येतील यावर भाष्य केले. तसेच एच.आय.व्ही. विषाणूची लागण होऊ नये म्हणून काय काळजी घ्यावी आणि एड्स बाधित व्यक्तीने काळजी कशी घ्यावी याबाबत विचार व्यक्त केले आणि एकत्रितपणे, आपण एचआयव्ही एड्सने मांडलेल्या अडथळ्यांवर मात करू शकतो आणि प्रत्येकाला चांगले आरोग्य लाभेल असे जग निर्माण करू शकतो. असा आशावाद व्यक्त केला.

या स्पर्धेत आयकॉन पॅराडाइज ज्यू. कॉलेज, हिंदस्कॉलर माध्यमिक विद्यालय, प्रतिष्ठान महाविद्यालय, आर्यचाणक्य विद्यामंदिर, मिश्रीलाल पहाडे जैन इंग्लिश स्कूल, गुरुकुल इंग्लिश स्कूल, अब्दुल कादर हायस्कूल पैठण आणि जि. प. शाळा ढोरकीन आदि शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले होते.

या स्पर्धेचे आयोजन जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक जिल्हा रुग्णालय चिकलठाणा छत्रपती संभाजीनगर, ए.आर.टी. सेंटर, आय. सी.टी.सी. हेल्थ युनिट पैठण तसेच संत एकनाथ (मल्टीस्पेशालिस्ट) रुग्णालय पैठण यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गौतम सव्वासे (प्रपाठक) व नोडल ऑफिसर हे होते तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. पंडित किल्लारीकर यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बबलू गायकवाड यांनी केले.

देवयानी ने प्रथम क्रमाक मिळविल्याने विशाल बहुउद्देशीय प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. संतोष तांबे, प्राचार्य आर. बी. रामावत मार्गदर्शक डॉ. जालिंदर येवले, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका एम .के .कोळगे, तसेच आयकॉन पॅराडाइज इंग्लिश स्कूल आणि ज्यू. कॉलेजच्या सर्वच शिक्षकांनी तिचे अभिनंदन व कौतुक केले.

## मल्हारी मार्तंड खंडोबा चंपाषष्ठी उत्सव सोहळ्याला प्रारंभ



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.३ डिसेंबर:

गंगापूर येथील श्री पंच कमिटी खंडोबा मंदिर संस्थान गंगापूर यांच्यावतीने सालाबादप्रमाणे मल्हारी मार्तंड खंडोबा चंपाषष्ठी उत्सवाला सोमवारी ( दि.२) प्रारंभ झाला आहे.या उत्सवादरम्यान दैनंदिन कार्यक्रमात काकड आरती सायंकाळी हरिपाठ रात्री ७ ते हरीकिर्तन नंतर हरिजागर होणार आहे.दरम्यान श्रीक्षेत्र देवगडचे महंत भास्करगिरी महाराज यावेळी सदिच्छा भेट देणार आहेत.

यावेळी दि.२ ला कीर्तनकार हभप मच्छिंद्र महाराज निकम,दि.३ ला कल्याण महाराज पवार, दि.४ ला महंत हरीशरण गिरीजी महाराज,दि.५ ला दादा महाराज वायसळ,दि.६ ला कृष्णानंद महाराज नागे, यांची कीर्तने होणार आहेत. शनिवारी ( दि.७) सायंकाळी सहा वाजता बारा गाड्या मिरवणूक तदनंतर साडेसहा वाजता महाआरती, त्यानंतर सायंकाळी साडेसात वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे महाप्रसादाचे दररोजचे आयोजन हरिचंद्र पाटील डव्हाण, मारुतीअण्णा खैरे, मनोजअप्पा कुलकर्णी , संतोष अंबिलवादे , अविनाश पाटील यांनी केले आहे.रात्री दहा वाजता महाराष्ट्र भूषण पुरस्कार संबोधित अनिल दुधे यांचा जागरण गोंधळाचा कार्यक्रम होणार आहे गायनाचार्य चंद्रकांत महाराज सावंत, अशोकजी महाराज निरफळ, विठ्ठल महाराज औताडे, संदीप महाराज कड्वे, लक्ष्मण पाटील, पांडुरंग भजनी मंडळ, मांजरी, जामगांव, कोळघर, मालूंजा, पंचक्रोशितिल समस्त भजनी मंडळ, अंबेवाडी, गणेशवाडी, कोळघर, मालुंजा, सिरजगांव, नवाबपुर, बोलेगांव, बाबरगांव, मांजरी माहुली, समस्त भजनी मंडळ गंगापुर सहभागी होणार आहेत.

अशी माहिती श्री पंच कमिटी खंडोबा मंदिर संस्थान गंगापूर यांच्यावतीने देण्यात आली आहे.

## ट्रॅक्टरच्या धडकेत महिला जागीच ठार

### एएस क्लब उड्डाण पुलावरील घटना



वाळूज महानगर : धुळे-सोलापूर महामार्गावरील एएस क्लब च्या पुलावरून कांचनवाडीच्या दिशेने जाणाऱ्या मोपेडला (क्रमांक एमएच-२३, एव्ही-३३५१) भरधाव वेगातील विना क्रमांकाच्या ट्रॅक्टरने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने मोपेडस्वार महिलेचा ट्रॅक्टरच्या मागील चाकखाली सापडून जागीच मृत्यू झाल्याची घटना आज सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास घडली. जयश्री भड असे मृत महिलेचे नाव असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

परिसरातील समर्थ रेसिडेन्सीमध्ये राहणाऱ्या जयश्री भड या त्यांचे नातेवाईक सुहास सुपेकर यांच्यासोबत मोपेडवर धुळे-सोलापूर महामार्गाने कांचनवाडीच्या दिशेने निघाल्या होत्या. एएस क्लब येथील उडडण पुलावरून खाली उतरत असताना भरधाव वेगात आलेल्या ट्रॅक्टरने त्यांच्या मोपेडला पाठीमागून जोरदार धडक दिली. यात रस्त्यावर पडलेल्या जयश्री यांच्या डोक्यावरून ट्रॅक्टर ट्रॉलीचे मागील चाक गेले. डोक्याचा चेंदामेंदा झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर त्यांच्यासोबतचे सुपेकर किरकोळ जखमी झाले ' अपघाताची माहिती मिळतात वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सचिन इंगोले, फौजदार मनोज घोडके यांनी घटना स्थळी धाव घेत ट्रॅक्टर चालकाला ताब्यात घेतले.

## साताऱ्यात विधिवत घटस्थापना, 'येळकोट येळकोट' चा जयघोष

### खंडोबाला पंचामृताभिषेक, दर्शनाला उसळली गर्दी

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

प्रतिजेजुरी म्हणून ओळख असलेले सातारा परिसरातील खंडोबा मंदिरात सोमवारी, २ डिसेंबर रोजी मार्तंड भैरव षडरात्रोत्सवानिमित्त पहाटे ४ वा. वाजता पंचामृतभिषेक करण्यात आला. यावेळी पहाटेपासूनच साताऱ्यात मल्हारी मार्तंडाच्या दर्शनासाठी झुंबड उडाली होती.

अहिल्याबाई होळकरांच्या काळात उभारलेले श्रीखंडोबा मंदिर आहे. ७ डिसेंबर, म्हणजेच चंपाषष्ठीपासून साताऱ्याची यात्रा भरणार आहे. ९ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या खंडोबा यात्रेत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो भक्त दर्शनासाठी येतात. सोमवारी पहाटे पुजारी दिलीप धुमाळ यांच्या हस्ते पंचामृत रूद्राभिषेक करण्यात आला. तसेच सकाळी आकाश धुमाळ, विजय धुमाळांसह मंदिराचे विश्वस्तांसह मंदिराचे पदाधिकाऱ्यांनी सातारा गावातील ४० ते ५० भक्तांच्या उपस्थितीत श्रीखंडोबाची विधिवत महाआरती करण्यात आली.

मुहूर्तावर घटस्थापना

श्रीमल्हारी-मार्तंडासमोर धान्याचे अष्टदल काढून त्यावर तांब्याचे ताम्हण ठेवण्यात आले. या ताम्हणात तांब्याचा कलश मांडून त्यात नागवेलची पाच पाने बांधली गेली. कलशाच्या आतसुध्दा पाच पाने ओळीने मांडण्यात आली. अर्ध्या पाण्याने कलश भरून घटाची विधिवत महापूजा करण्यात आली. त्यावर नागवेलीच्या पानाची माळ घालण्यात आली. घटस्थापनेपासून घट उठेपर्यंत गावातील महिला, पुरुष उपवास करतात.

खंडोबा यात्रेनिमित्त मंदिर परिसरात साफसफाई करण्यात आली आहे. भव्य सभामंडप उभारून मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या रांगांची व्यवस्थेचीही पूर्वतयारी झाल्याची माहिती मंदिर विश्वस्त विजय धुमाळ यांनी दिली. यासोबतच यात्रेनिमित्त महापालिकेकडून फिरते स्वच्छतागृह, आरोग्य केंद्राची व्यवस्था मंदिर परिसरात करण्यात आली आहे. भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार याची विशेष काळजी घेण्यात येत असून, यात्रेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून कडक पोलीस बंदोबस्त तैनात राहणार आहेत.

कडक बंदोबस्त

१०० पोलिसांसह खासगी सुरक्षा रक्षक, २०० स्वयंसेवकांचा यात समावेश असेल, असे विश्वस्त धुमाळ यांनी सांगितले. एमआयटीकडून मंदिर मार्गावरील विद्युत खांबांवरील पथदिव्यांची दुरुस्तीची कामेही युद्धपातळीवर पूर्ण करण्यात आली आहेत. भाविकांची गैरसोय होणार नाही, याचे नियोजन महापालिका प्रशासनाच्य वतीने करण्यात आले आहे.

## ढगाळ हवामानामुळे थंडी गायब, तापमान 10 अंशावरून 20 वर

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

दक्षिणेत सुरू असलेल्या फेंगल चक्रीवादळाचा परिणाम शहरासह मराठवाड्यात दिसून येत आहे. दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण असल्यामुळे तापमानात वाढ होत आहे. तीन-चार दिवसांपूर्वी तापमान १० ते ११ अंश सेल्सिअस होते, ते सोमवारी चक्क २०.६ अंशावर आले आहे. चिकलठाणा वेधशाळेने रविवारी, १ डिसेंबर रोजी कमाल तापमान २९.४, तर किमान तापमान १६.० अंश सेल्सिअस एवढे नोंदविले होते. शुक्रवारी आणि शनिवारी १० ते ११ अंश सेल्सिअस एवढे किमान तापमान होते.

ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ डॉ. रामचंद्र सांबळे म्हणाले, बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले फेंगल हे चक्रीवादळ कोलकाताच्या दिशेने जात आहे. दरम्यान, या वादळाचा परिणाम दक्षिणोत्तर राज्यांमध्ये दिसून येत आहे. यात मराठवाड्यासह महाराष्ट्रातील काही भागांचाही समावेश आहे. परिणामी मराठवाड्यातील दक्षिणी जिल्ह्यांमध्ये काही भागांत मुसळधार पाउस कोसळत आहे. परिणामी, छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यात शनिवारपासून ढगाळ वातावरण आहे. ढगाळ वातावरण असल्याने वाऱ्याचा वेग कमी झाला आहे आणि तापमानात वाढ होत आहे. शनिवार रोजी किमान तापमान ११ अंश होते. रविवारी यात तब्बल सहा अंशांनी वाढ होऊन १६ अंशांची नोंद चिकलठाणा वेधशाळेने घेतली. सोमवारी कमाल तापमान २८.२, तर किमान २०.६ अंश सेल्सिअस एवढे नोंदविले गेले आहे. फेंगलच्या प्रभावामुळे मराठवाड्यातील काही भागांत अद्यापही पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असून, मराठवाड्यातील दक्षिणोत्तर असलेले नांदेड, परभणीकडील जिल्ह्यांमध्ये तुरळक पावसाचा अंदाज हवामानतज्ज्ञांनी वर्तविला आहे.

दरम्यान, ६ ते १२ डिसेंबरदरम्यान मराठवाड्यातील काही भागांत पावसाची शक्यता वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील ग्रामीण मौसम विभागाच्या शास्त्रज्ञानी व्यक्त केली आहे.

मुंबई येथील प्रादेशिक हवामान केंद्राच्या वतीने प्राप्त झालेल्या अंदाजानुसार, मराठवाड्यत पुढील तीन दिवस हवामान कोरडे राहणायची शक्यता आहे. तर ३ व ४ डिसेंबर रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

फेंगलचा परिणाम

दरम्यान, दक्षिणी भागात सुरू असलेल्या नैसर्गिक आपत्तीचा परिणाम मराठवाड्यावर होत आहे. ३१ नोव्हेंबरपासून ढगाळ वातावरण सुरु आहे. अशातच मराठवाड्यातील तुरळक ठिकाणांसह राज्याच्या काही भागात पावसाची शक्यता वर्तवण्यात आलेली आहे. ढगाळ वातावरणामुळे शनिवारी तापमानात वाढ झाली होऊन ११ अंश झाली होती, सोमवारी यात आणखी वाढ होऊन पारा २० अंशाच्या वर गेला आहे.

## अग्रसेन विद्या मंदिर शाळेच्या सहा खेळाडूंची शालेय राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



ईटखेडा / प्रतिनिधी - पैठण रोड येथील अग्रसेन विद्या मंदिर शाळेतील खेळाडूंनी विविध शालेय स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी केली तसेच त्यांची शालेय राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

निवड झालेले खेळाडू : शुटींग - श्रीपाद यादव (१४ वर्षे मुले), धनुर्विद्या धिमय पाटील (१७ वर्षे मुले), स्केटिंग तनय कोलपे (१७ वर्षे मुले), अनन्या पाटील (११ वर्षे मुली) वुशु - सुकन्या आगळे (१९ वर्षे मुली), मुष्टियुद्ध (बॉक्सिंग) दिव्या शिंदे (१७ वर्षे मुले). विद्यार्थ्यांच्या नेत्रदिपक कामगिरीसाठी शाळा समितीचे विश्वस्त केशवजी लीला, विदयमान अध्यक्ष राजकुमारजी टिबडेवाला, उपाध्यक्ष राजेशजी भारुका, सचिव निधिजी अग्रवाल, कोषाध्यक्ष पंकजजी अग्रवाल, शाळेचे प्राचार्य संतोष कुमार करवा व उपप्राचार्या मयुरी लोगलवार, अधिक्षक अजय सोनुने, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यांना शाळेचे क्रीडा शिक्षक सोनी खरात, डॉ.कैलास शिवणकर, रविंद्र माळी, अभिजीत शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# राहत सोशल ग्रुप जालना आयोजित २३ व्या मुस्लीम सामुहिक विवाह सोहळ्यात २१ मुस्लिम जोडप्यांचा विवाह पडला पार

## राहत सोशल ग्रुप जालानाला सर्वतोपरी सहकार्य केले जाईल -खासदार डॉ.कल्याण काळे
## राहत सोशल ग्रुप जालना चे सामाजिक उपक्रम कौतुकास्पद आहेत -मा.आ.कैलास गोरंट्याल

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

राहत सोशल ग्रुप जालना आयोजित २३ व्या मुस्लिम विवाह सोहळ्यात आज सकाळी १० वाजता आयेशा लान्स, उर्दू हायस्कूलचया पाठी मागे, जुना जालना येथे २१ मुस्लीम जोडप्यांचा विवाह पार पडला आणि विवाह प्रवचन काजी सय्यद अब्दुल वाहिद यांनी केले . यावेळेस एकबाल पाशा, मोहम्मद नसीम चौधरी, विनायक महाराज फुलंब्रीकर , अयुब खान अक्सा हॉटेल, हाजी शेख अब्दुल वाहिद, फैसल बिन सालेम बिन समियादा चाऊस, साई नाथ पवार जिल्हाध्यक्ष फार्मास्युटिकल असोसिएशन, बशारत अली खान अख्तर, रियाज भाई, गणेश सुपारकर, माजिद भाई उर्फ सलमान भाई, मोहन ईंगळे, डॉ.मुशीर इनामदार, गोपाळ मोरे, अनस चाऊस, हाजी युसूफ खान, प्रसाद कुलकर्णी, अतिक अहमद खान, अब्दुल करीम बिल्डर, काझी सय्यद अब्दुल वाहिद, हाफिज सय्यद इसरार, आदी उपस्थित होते. हाफिज सय्यद इसरार यांनी पवित्र कुराणाचे पठण करून आणि नातिया यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात केली, ,यावेळेसअध्यक्षिय भाषणात माजीआमदार कैलास गोरंट्याल यांनी म्हटले की राहत सोशल ग्रुप जालानाचा उपक्रम प्रशंसनीय आहे कोणत्याही व्यत्ययाशिवाय यशस्वी मुस्लिम सामूहिक विवाह पार पाडणे आणि आता मुस्लिम सामूहिक विवाहाच्या माध्यमातून सहाशेहून अधिक विवाहित जोडप्यांचे विवाह झाले आहेत आणि आम्ही राहत सोशल ग्रुप जलानाच्या नेहमीच पाठीशी आहोत . यावेळी





खासदार डॉ.कल्याण काळे यांनी राहत सोशल ग्रुप जालना आयोजित मुस्लीम समुह विवाहाचे कौतुक केले व ते म्हणाले की, राहत सोशल ग्रुप जालना तर्फे मुस्लिम सामुहिक विवाहाचे यशस्वी आयोजन हे केवळ सामाजिक कार्यच नाही तर देश व राष्ट्रासाठी हिताचे आहे. देशाचे एक महत्त्वाचे कर्तव्य पार पाडायचे असून राहत सोशल ग्रुप जालना हे कर्तव्य चोखपणे पार पाडत आहे आणि आम्ही रहात सोशल ग्रुप जालना ला सर्वतोपरी साथ देऊ.यावेळेस एकबाल पाशा, विनायक महाराज फुलंब्रीकर, गणेश सुप-ारकर यांनीही आपले सुवर्णविचार व्यक्त करून राहत सोशल ग्रुप जालना च्या कामगिरीचे कौतुक केले तसेच जालना जिल्ह्यातील शैक्षणिक, वैद्यकीय, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल जोहरा रब्बानी सरफराज खान, आरती रामेश्वर चौंडीए,, सिद्दीकी ओबेद अब्दुल रहेमान हुदा उर्दू हायस्कूल, नरिमन नगर जालना,इम्रान इनायत खान, अब्दुल्ला चाऊस, जावेद खान सलीम खान, शिक्षिका आयेशा बानो सिकंदर अली, चंदन कबुल मल गेही, शाह नवाज खान, डॉ शेख जावेद, डॉ शेख अब्दुल मतीन, पोलीस कॉन्स्टेबल दिगंबर पैजने, फिरोज बागबान, आणि बुशरा हुसेन बरकतोद्दीन यांना राहत गौरव सन्मन सन्मानित करण्यातआला . कार्यक्रमयशस्वी करण्यात राहत सोशल ग्रुप जालना चे अध्यक्ष शेख अफसर शेख जी, सचिव लियाकत अली खान यासिर जालनावी, शेख सलीम शेख मुहम्मद , शेख सलीम शेख शकूर, सय्यद अख्तर, शेर जमान खान, आदींनी प्रयत्न केले. डॉ.सलीम नवाज हशर जाफराबादी आणि सचिव राहत सोशल ग्रुप जालना लियाकत अली खान यासीर यांनी कार्यक्रमाच्या सुत्र संचालन केले आणि आभार राहत सोशलग्रुपचे अध्यक्ष शेखअफसर शेखजी यांनी केले.

## संक्षिप्त

### लोकप्रतिनिधी म्हणून अगोदर जनतेची सेवा महत्त्वाची; आमदार लोणीकरांचे स्पष्टीकरण



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

राज्यात विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बांधकाम कामगार कार्यरत आहेत जे स्वतःच्या घरापासून दूर ऊन, वारा व पावसात स्वतः ची पर्वा न करता काम करत असतात बांधकाम क्षेत्रातील कामगार हे तुटपुंजा पगारात काम करत असतात त्यामुळे त्याची आर्थिक परिस्थिती कमकुवत असते त्यामुळे त्यांना स्वतःच्या कुटुंबाचा सांभाळ करण्यासाठी व त्यांच्या गरज पूर्ण करण्यासाठी खूप साऱ्या समस्यांचा सामना करावा लागतो तसेच काम करताना त्यांच्याजवळ सेफ्टी किट नसल्यामुळे त्यांना विविध प्रकारच्या अपघातांचा सामना करावा लागतो ज्यामध्ये त्यांना कायमस्वरूपी अपंगत्व येते व काही वेळेला त्यांचा मृत्यू देखील होतो व घरातील कमावणाऱ्या व्यक्तीच्या एकाएकी जाण्यामुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ येते. त्यामुळे राज्यातील बांधकाम कामगाराच्या या सर्व समस्यांचा विचार करून राज्य शासनाने १ मे २०११ रोजी कामगारांसाठी कल्याणकारी मंडळाची स्थापना केली असून बांधकाम कामगारांच्या चांगल्या भविष्यासाठी बांधकाम प्रकल्पांमध्ये गुंतलेल्या मजुरांचे सक्षमीकरण करण्यावर महायुती सरकारचे लक्ष दिले होते आणि यापुढे देखील आवर्जून या सर्व बाबींवर लक्ष राहील असे प्रतिपादन माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आज केले.

माऊली मंगल कार्यालय मंठा येथे आयोजित नोंदीत बांधकाम कामगारांना १७ प्रकारच्या गृहपयोगी वस्तू संचाचे वितरण कार्यक्रम प्रसंगी आमदार लोणीकर बोलत होते यावेळी १३३ बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संचाचे वितरण आमदार लोणीकरांच्या हस्ते करण्यात आले पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, इमारत व इतर बांधकाम या व्यवसायात काम करणाऱ्या बांधकाम कामगारांना संबंधित आस्थापनेचे काम पूर्णत्वास आल्यावर रोज-गारासाठी नविन बांधकाम जेथे सुरु होते तेथे स्थलांतरीत व्हावे लागते. अशा स्थलांतराच्या ठिकाणी त्यांना नव्याने निवास, पाल्यांचे शिक्षण, आरोग्यविषयक समस्या व भोजन याबाबत जुळवुन घ्यावे लागते. त्यांना दैनंदिन भोजन तयार करण्यास सहाय्य व्हावे म्हणून महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने नोंदीत बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच वितरण करण्याचा एक महत्वपूर्ण निर्णय घेतला होता, हा निर्णय यापुढे देखील असाच सुरू राहील यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे देखील लोणीकरांनी यावेळी स्पष्ट केले

बांधकाम कामगारांना गृहपयोगी भांड्यांचे मोफत वाटप करणे त्यांचे जीवनमान सुधारणे हा या मागचा प्रमुख उद्देश असून ताट० ४ , वाटया ०८, पाण्याचे ग्लास ०४, पातेले झाकणासह ०३, मोठा चमचा (भात व वरण वाटपाकरीता) ०२, पाण्याचा जग (२ लीटर) ०१, मसाला डब्बा (७ भाग) ०१, डब्बा झाकणासह (१४ इंच) ०१, डब्बा झाकणासह ०२, परात ०१, प्रेशर कुकर ५ लिटर (स्टेनलेस स्टील) ०१, कढई (स्टील) ०१, स्टीलची टाकी (मोठी) झाकणासह व वगराळासह ० १ असे एकूण ३० नग गृहपयोगी साहित्य या संचामध्ये देण्यात आले आहे. यावेळी गणेशराव खवणे सतीशराव निर्वळ पंजाबराव बोराडे नागेशराव घारे कैलासराव बोराडे संभाजी वारे मोहनराव आढे विलास घोडके सोपानराव वायाळ भगवानराव देशमुख विठ्ठलराव कदम गणेश राव घुगे गजानन शिंदे श्रीराम राठोड आनंद जाधव लक्ष्मण इलग माधव सिंग जनकवार मनोज देशमुख शेख रहीम वैभव नरवडे जयश्री पवार सोनाली खंदारे परमेश्वर शिंदे प्रकाश मोरे दिगंबर कांगणे प्रकाश वाघमारे नरेंद्र पाटील प्रभाकर बोरकर माणिक पवार यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती

## अवैध वाळू माफिया जोमात अंबड महसुल प्रशासन कोमात

**तभा वृत्तसेवा**
**अंबड प्रतिनिधी**



अंबड तालुक्यातील शहागड वाळकेश्वर गोंदी कुरण गोरी कंधारे साष्ट पिंपळगाव या ठिकाणावरून गोदावरी नदीमध्ये वाळू ही केणे टाकून सर्रास वाळू नदीपात्रातून काढल्या जाते याकडे कुठले स्थानिक पोलीस स्टेशन ना कुठलं स्थानिक महसूल अधिकारी कुणाचे लक्ष नाही जसं की शासनाने एखादं वाळूचे टेंडर काढले या पद्धतीने वाळू सर्रास दिवसा ढवळ्या आणली जाते व तिकडून आणून दोदडगाव डोमेगाव डोणगाव या शिवारात रात्रीची शासकीय जागेवर टाकल्या जाते व रात्री साठवण केलेलं वाळू ती वाळू दिवसा संभाजीनगर आडुळ पाचोड अंबड इकडे सर्रासपणे विकल्या जाते सर्वसामान्याला घरकुलासाठी लागणारी वाळू मात्र मिळत नाही याउलट वाळू माफिया दिवसाढवळ्या नदीपात्रातून वाळू सरसपणे काढल्या जाते व विकल्या जाते याकडे प्रशासनाने गंभीरतेने लक्ष देणे गरज ?

## जनतेच्या सेवेत सतीश घाटगे पुन्हा सक्रिय; रवणा दर्गा येथील जनतेला दिलेला सिमेंट रस्त्याचा शब्द केला पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत जनतेने दिलेला कौल विनम्रपणे स्वीकारून समृध्दी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील पुन्हा जनतेच्या सेवेत सक्रिय झाले. निवडणुकीच्या काळात रवणा येथील दर्गा शरीफ येथील महत्वाचा रस्ता सिमेंट कॉंक्रिटने करून देण्याचा शब्द त्यांनी दिला होता. हा रस्ता पूर्ण करून सतीश घाटगे यांनी आपला शब्द पूर्ण केला. गावकऱ्यांच्या उपस्थितित सोमवारी या रस्त्याचे लोकार्पण त्यांनी केले. राजकारणासाठी अनेक जण शब्द देतात. परंतु, निवडणुकीत पराभव होऊनही सतीश घाटगे यांनी आपला शब्द पूर्ण केल्याने गावकरी आश्चर्यचकित झाले. रवणा येथील नागरिक यावेळी गहिवरून गेले होते.



विधानसभा निवडणुकीच्या काळात रवणा येथील दर्गाह शरीफ येथे सतीश घाटगे पाटील दर्शनासाठी आले होते. यावेळी येथील धर्मगुरू आणि जनतेनी दर्गा परिसरातील महत्वाचा रस्ता तयार करून देण्याची मागणी त्यांच्याकडे केली होती. दर्गा शरीफ इथे येणाऱ्या भाविकांसाठी तसेच इथल्या स्थानिक नागरिकांच्या रोजच्या दळणवळणासाठी हा रस्ता अतिशय महत्त्वाचा होता. हा रस्ता पूर्ण करून देण्याचा शब्द सतीश घाटगे यांनी दिला होता. निवडणूक संपताच सतीश घाटगे यांनी सर्वधर्मीय पवित्र दर्गा शरीफच्या ठिकाणी सिमेंट कॉंक्रिटचां रस्ता तयार करून दिला. हा रस्ता पूर्ण झाल्यावर या रस्त्याची सोमवारी त्यांनी पाहणी करून रस्त्याचे लोकार्पण केले. त्यानंतर दर्गा शरीफच्या मजारीवर चादर चढवून जनतेच्या सेवेसाठी बळ मिळो अशी प्रार्थना केली.

घनसावंगी विधानसभेत पहिल्यांदा निवडणूक संपल्यावर आणि पराभव झाल्यानंतरही जनतेला दिलेला शब्द न विसरता सतीश घाटगे यांनी पूर्ण केला. या आदर्श राजकारणामुळे जनतेत त्यांची प्रतिमा जनमानसात घट्ट बनली असून त्यांच्या या कामाची सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे.

## शेतकरी व सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नासाठी रस्त्यावरची लढाई लढणार -मा.आ.दानवे

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन जाफराबाद विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी व राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे उमेदवार मा.आ.चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांच्या संपर्क कार्यालयात विधानसभेतील पराभवानंतर आभार प्रदर्शन व आगामी भुमिका च्या संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी शेतकरी व सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नासाठी रस्त्यावरची लढाई लढणार असून महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणार असल्याचे माजी आमदार चंद्रकांत दानवे यांनी सांगितले.

याविषयी अधिक माहिती अशी की भोकरदन जाफराबाद विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या वतीने राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार म्हणून चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांनी निवडणूक लढविली होती मात्र यामध्ये महाविकास आघाडीचा अल्पशा मताने निसटता पराभव झाला, विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर महाविकास आघाडी



भोकरदन तालुका स्तरिय बैठक माजी आमदार चंद्रकांत दानवे यांच्या संपर्क कार्यालयात संपन्न झाली. या बैठकीमध्ये मार्गदर्शन करताना माजी आमदार चंद्रकांत दानवे यांनी महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना भाजपाच्या काही कार्यकर्त्यांकडून धमक्या देण्याचे काम केले जात आहे. महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी खचून न जाता संघर्षाची तयारी ठेवावी माझ्या कार्यकर्त्याच्या केसाला जरी धक्का लागला तरी त्याची गाठ माझ्याशी राहील असे सांगितले तर माजी खासदार रावसाहेब दानवे व आमदार संतोष दानवे यांनी गरीब कार्यकर्त्यांना त्रास न देता हिम्मत असेल तर माझ्याशी खेटावे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानानुसार जशास तसे उत्तर देण्याचे काम मी व माझे सहकारी करतील असे सांगितले. तर भोकरदन विधानसभा मतदारसंघ निवडणुकित भाजपचा विजय नसून धनशक्तीचा विजय असल्याचे असे कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी मत व्यक्त केले. तसेच या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीचा कार्यकर्ता कुठेही कमी पडला नाही या बलाढ्य लढ्यात तो खचून न जाता शेवटपर्यंत लढला त्यांचे अभिनंदन करत येणाऱ्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये ताकद लावून प्रत्येक संस्था ताब्यात घेण्यासाठी पक्षासंघटन करुन संघर्ष केला जाईल असे युवानेते सुधाकर दानवे यांनी बोलतांना सांगितले तर येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या

## घनसावंगी येथे १५ डिसेंबर रोजी महामेळाव्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशान्वये जालना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा आयोजित करण्याचे निर्देशित केले आहे. त्यानुसार रविवार, दि. १५ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता शासकीय आय.टी.आय. कॉलेज, घनसावंगी येथे विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय सेवा व योजनांच्या महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या महाशिबिराचे नियोजन करण्यासाठी आज दि. ०२ डिसेंबर, २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षेतखाली बैठक पार पडली. बैठकीस जिल्हा न्यायाधीश-३ किशोर एम.जयस्वाल, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव श्रीमती प्रणिता पी. भारसाकडे-वाघ, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, जिपचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. तुबाकले यांच्यासह विविध विभाग प्रमुखांची उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ आणि जिल्हा न्यायाधीश-३ किशोर एम.जयस्वाल यांनी बैठकीमध्ये शासनाच्या सर्व विभाग प्रमुखांना महामेळावा यशस्वी करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना देवून योग्य नियोजन करण्याचे निर्देश दिले. या महामेळाव्यात सर्व शासकीय योजनांची तोंड ओळख, तसेच विविध शासकीय योजनांची माहिती विविध स्टॉल्सच्या माध्यमातून लाभार्थ्यांना करुन देण्यात येणार आहे. या महामेळाव्यात विधी सेवा प्राधिकरण आणि विविध शासकीय विभागांचे स्टॉल एकाच छताखाली येणार असल्याने जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या महामेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहुन योजनांचा लाभ घ्यावा असे, आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव श्रीमती प्रणिता भारसाकडे-वाघ यांनी केले आहे.

## माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांना विधान परिषदेवर घेण्याची मागणी

**तभा वृत्तसेंवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट) च्या वतीने आज दिनांक ०२/१२/२०२४ रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या महिला प्रदेश सरचिटणीस श्रीमती शकुंतला कदम यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत काही महत्त्वाचे विषय मांडण्यात आले असून त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. महाराष्ट्र राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीला घव-घवीत यश मिळाल्याबद्दल लाडकी बहीण योजनेचे शिल्पकार ना.अजितदादा पवार साहेब यांचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मनापासून अभिनंदन केले. तसेच नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत पाथरी विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेले विधान परिषद सदस्य श्री.राजेश विटेकर यांच्या रिक्त झालेल्या जागेवर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांची निवड करण्यात यावी यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते अजितदादा पवार व प्रद-ेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्याकडे मागणी करण्यासंदर्भात बैठकीत एकमताने ठराव घेण्यात आला.

माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी व पक्षाच्या जिल्हयातील सर्वच पदाधिकार्यांनी पाचही विधानसभा मतदार संघात महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार केला.जालना जिल्ह्यात महायुतीचे पाचही आमदार निवडून आणण्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष,पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा खारीचा वाटा आहे. असे पक्षाच्या बैठकीत बोलताना श्रीमती कदम म्हणाल्या. त्यामुळे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांची विधानपरिषदेच्या रिक्त झालेल्या जागेवर निवड करण्यासाठी बैठकीत एकमताने नाव सुचविण्यात आले. यावेळी या विषयास राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस श्री.रविद्र तौर यांनी अनुमोदन दिले. व त्यांनी ही माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांना विधान परिषदेवर घेण्याची मागणी केली.

यावेळी व्यासपीठावर जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण, महिला प्रदेश सरचिटणीस शकुंतलाताई कदम, प्रदेश सरचिटणीस रवींद्र तौर, जिल्हा अध्यक्ष अल्पसंख्यांक सेल शहा आलम खान, शहर अध्यक्ष रशीद पहिलवान, कार्याध्यक्ष चंद्रकांत कारके, महिला जिल्हाध्यक्ष वंदना खांडेभराड,युवक जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर कदम, जिल्हा उपाध्यक्ष मदन तुपे, मराठवाडा कार्याध्यक्ष सतीश वाहुळे ,सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेवंदे ,ओबीसीचे जिल्हाध्यक्ष मयूर गाडेकर, जिल्हा उपाध्यक्ष व जिल्हा नियोजन समितीचे सदस्य अण्णासाहेब चितेकर, जिल्हा शहर कार्याध्यक्ष,व जिल्हा नियोजन समितीचे सदस्य मिर्झा अनवर बेग, यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीस संतोष ढेंगळे तालुका अध्यक्ष जालना, रिंकल तायड शहर जिल्हाध्यक्ष, शितल बारोटे युवती जिल्हाध्यक्ष, मंगला पाटील महिला कार्याध्यक्ष, विठ्ठलराव बुरकुले परतुर तालुका अध्यक्ष, कैलास तात्या मदन बदनापूर तालुका अध्यक्ष, सतीश ढवळे अंबड तालुका अध्यक्ष, सुरेश सपाटे भोकरदन तालुकाध्यक्ष, गणेश घारे मंठा तालुकाध्यक्ष, दत्तू अंभोरे जाफराबाद तालुका अध्यक्ष, रोहित अग्रवाल युवक शहराध्यक्ष, उमेश मोहिते युवक तालुका अध्यक्ष जालना, अब्दुल हाफिज प्रदेश सरचिटणीस ओबीसी सेल, सविता मुळे महिला तालुकाध्यक्ष, कांचन शिरभे जिल्हाध्यक्ष आघाडी, नंदा ढोकळे, श्रीमती नागरगोजे, पद्माकर हांडे सेवादल, कृष्णा गाडेकर विद्यार्थी जिल्हाध्यक्ष, अनिल वानखेडे कामगार आघाडी, विजय सोनवणे भटके विमुक्त आघाडी, अँड विद्यासागर लीगल सेल, अँड



शेखर पाटील लीगल सेल, सतीश फतपुरे जिल्हाध्यक्ष अपंग सेल, नवनाथ लोखंडे ग्रंथालय सेल, संदीप गाडेकर वक्ता सेल, संदीप राठोड, संदीप पाटोळे, संतोष आखाडे, वैभव नालेगावकर,डॉक्टर प्रमोद जगताप, मनोज चांदगुडे, विलास भावले, सरपंच विष्णू दादा भुतेकर, विष्णू घुले, मुक्तार पठाण, आनंद मस्के, शहाजी मस्के, भरत मस्के, गोवर्धन डोंगरे, शंकर मुळे, सरपंच भाऊराव शेजुळ, कल्याण देशमुख,रुषीधर कुडधने, दिनकर दराडे, सिद्धेश्वर शिंदे, भगवान दाभाडे, राम डोंगरे, समाधान राठोड, राम पाटील एखंडे, प्रदीप उबाळे, अमोल खरात, राहुल लष्कर, सचिन ईरछे,यांच्या सह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# जिंतूरात रस्त्यावरील पार्कींगमुळे रहदारीला होतोय अडथळा



## शहरात वाहतुकीची समस्या झाली निर्माण

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर ,/प्रतिनिधी :** शहरातून जाणारा परभणी, येलदरी सेनगाव हिंगोली, फळेगाव जाणाऱ्या रोडवरील मुख्य रस्त्यावर रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोटरसायकल वाहने थांबत असल्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना मोठी अडचण निर्माण होत आहे. याबाबत प्रशासनाकडे अनेक वेळा तक्रारी केले असता नगरपालिका व सार्वजनिक बांधकाम विभाग कडे बोट दाखविली जाते .तर सार्वजनिक बांधकाम विभाग नगरपालिकेकडे बोट दाखवत असल्याने हा प्रश्न ? कायम वाहन चालक व पादचाऱ्यांना भेडसावत आहे.

जिंतूर शहरातून येलदरी मार्गे जाणाऱ्या मुख्य बस स्थानक, भारतीय स्टेट बँक, शिवाजी चौक पुतळा, पोलीस ठाणे,जिंतूर शहर, मोंढा तसेच समोर येलदरी, फाळेगाव जाणारा या राज्य मार्गांना जोडणारा असून रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात अवजड वाहनाचे वाहतूक होते. मात्र या रोडवर अनेक शाळा असून तसेच बेकायदेशीर भर रस्त्याच्या बाजूला पार्किंग करतात. त्यामुळे रस्ता अरुंद होतो.

वाहन चालकांना अनेक वेळेला छोटा -मोठा अपघातात सामोरे जावे लागते .तसेच अवजड वाहने यांना आणाभाऊ साठे चौक ते शिवाजी चौक मार्गे जाताना वळसा घालून जाण्यासाठी मोठ्या शिकारीचे होत आहे .आजूबाजूला फळगाडे, मोटरसायकल,व अतिक्रमण करून चौकातला रस्ता आरूद केला आहे. त्यामुळेच येथील वाहतुकीस अडथळे येणारे रस्ते अतिक्रमण मुक्त करून वाहतुकीस मोकळा श्वास करून द्यावा अशी मागणी नागरिकांमधून व शालेय विद्यार्थी यांच्या वतीने केली जात आहे. शहरातील मुख्य चौकाच्या ठिकाणी अनेक वेळा वाद होत आहेत. अवैध वाहतुकीमुळे होतेय कोंडी त्या ठिकाणी ये-जा करण्यासाठी विद्यार्थ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे तर कधी लहान मुलांना वाहनांचा धक्का पण लागत आहे, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात हॉटेल व दुकानदार यांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करुन दुकानाच्या समोर गाड्या व साहित्या ठेवून रस्ता अरुंद केला आहे, या रस्त्यावरील नगरपालिकेच्या अंतर्गत येतो .तर काही भाग सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत येतो. त्यामुळे या रस्त्याच्या समस्येसाठी नेमके कोणाकडे जायचे? कारण दोघेही एकमेकांकडे बोट दाखवून आपली जबाबदारी झटकत आहेत. त्यामुळे नागरिकांत संभ्रमाचे वातावरण दिसून येत आहे. परंतू प्रशासनाच्यावतीने सदर रस्तयावर वाहतुक शाखेच्यावतीने कठोड अशी शिस्त लावण्याची गरज आहे जेणेकरुन अशाप्रकारे अडथळे होणार नाहीत.

## संक्षिप्त वृत्त...

### श्रीरामजी भांगडीया जयंतीनिमित्त चित्रकला रंगभरण स्पर्धेचे आयोजन



**सेलू,/प्रतिनिधी-** येथील नूतन विद्यालयाच्या चित्रकला विभागाच्यावतीने श्रीरामजी भांगडीया जयंती निमित्त शनिवार ( दि. ०६ ) डिसेंबर रोजी नूतन विद्यालय प्रार्थना मैदानावर इयत्ता पहिली ते सातवी साठी रंगभरन तर इयत्ता आठवी ते दहावीसाठी चित्रकला स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या सोळा वर्षा पासून या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. सेलू शहरातील सर्वच शाळेतील विद्यार्थी या स्पर्धेत आपला सहभाग नोंदवतात.स्पर्धेत जास्तीतजास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन नूतन विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष पाटील, पर्यवेक्षक किरण देशपांडे, रोहिदास मोगल आर डी.कटारे यांनी केले.

### निर्यातक्षम आंबा बागांची मोफत नोंदणी

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी ट्रेसिबिलीटीनेट अंतर्गत मोफत नोंदणी करीता अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी अनिल गवळी यांनी केले आहे.

या जिल्ह्यात विविध फळबाग योजनाच्या माध्यम ातून मोठ्या प्रमाणावर आंबा फळबागांची लागवड होत आहे. त्याद्वारे नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर होवून निर्यातक्षम दर्जाच्या आंबा फळाचे उत्पादन हे उत्पादक घेवू लागले आहेत. जागतिक बाजारपेठेतील ग्राहकांबरोबर स्थानिक बाजारपेठेत ग्राहकांमध्ये आरोग्याच्या सुरक्षिततेबाबत विशेषतः कीटकनाशकांच्या उर्वरित अंशाबाबत मोठ्या प्रमाणात जागृतता निर्माण झाली असून आंबा फळांचे उत्पादन करुन युरोपियन व इतर देशांना हे फळ निर्यात केले जात आहे. युरोपियन देशांनी कीटकनाशके उरर्वत अंश मुक्तीची हमी अट घातल्याने सन २००४-२००५ पासून जिल्ह्यात अपेडाच्या मार्गदर्शनाखाली मँगोनेट या ऑनलाईन कार्यप्रणालीद्वारे निर्यातक्षम आंबा बागांची मोफत नोंदणी करण्यात येत आहे. यावर्षी १ डिसेंबर ते ३१ मार्च या कालावधीत ट्रेसीबिलीटी नेट प्रणालीवर ऑनलाईन नोंदणी करण्यात येणार असून आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी निर्यातीची बाब ओळखून या दृष्टीने अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी गवळी यांनी केले आहे.

### देवनांद्रा येथे घरफोडीतून दागिणे लंपास

**परभणी,/प्रतिनिधी :** पाथरी तालुक्यातील देवनांद्रा येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करीत रोख ३५ हजार रुपये तसेच सोन्या चांदीचे दागिणे असे एकूण १ लाख ६७ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. या गावातील उत्तमराव टेकाळे यांनी पाथरी पोलिस ठाण्यात एक तक्रार दाखल केली. त्याद्वारे, पती घरा कुलूप लावून शेतात कामाला गेल्यानंतर अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून रोख रक्कम व दागदागिणे पळविल्याचे नमूद केले. पाथरी पोलिसांनी या प्रकरणात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### परभणी महापालिकेत पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सुटल्या जाव्यात या दृष्टीने महापालिका प्रशासनाने दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्याचा संकल्प सोडला आहे. राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या निर्देशानुसार आयुक्त स्तरावर महापालिकेद्वार प्रत्योक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्याच्या सक्त सूचना दिल्या आहेत. त्या प्रमाणेच स्थानिक महापालिकेने दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी किंवा त्या दिवशी सुट्टी असल्यास त्यानंतर येणारा कामकाजाचा दिवस लोकशाही दिन म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला आहे. नागरीकांनी महापालिका कार्यालयाशी संबंधित समस्या व तक्रारींचे अर्ज विहित नमून्यात दोन प्रतित महापालिका कार्यालयात सादर कराव्यात, असे आवाहन महापालिका आयुक्त धैर्यशिल जाधव व अतिरिक्त आयुक्त मिनीनाथ दंडवते यांनी केले आहे.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहिराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## कचऱ्याच्या वर्गीकरणाकरिता पथनाट्याव्दारे जागृती

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिका हद्दीतील कचऱ्याच्या वर्गीकरणाकरीता पथनाट्याद्वारे सर्वसामान्य नागरीकांमध्ये जनजागृती केली जात आहे.

स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत महापालिका हद्दीत मोठ्या प्रमाणावर उपक्रम व जनजागृती सुरु आहे. विशेषतः कचऱ्याचे ओला, सुका, घातक असे वर्गीकरण व्हावे या करीता महापालिकेने चार पथनाट्यांची पथके जनजागृतीसाठी तैनात केली आहेत. या पथनाट्याद्वारे ठिकठिकाणी कचऱ्याचा ओला, सुका घातक, असे वर्गीकरण व्हावे या दृष्टीने काही उदाहरणांनिशी मुद्दे पटवून दिले जात आहेत. तसेच ओल्या कचऱ्यापासून घरीसुध्दा खतनिर्मिती कशी करता येईल, प्लास्टिकचा वापर बंद करीत कापडी पिशव्यांचा वापर कसा करता येईल या अनुषंगाने जनजागृती केली जात आहे.

सोमवारी (दि.०२) बसस्थानक, अपना कॉर्नर, गव्हाणे चौक व गंगाखेड नाका या ठिकाणी या पथकांनी पथनाट्य सादर करीत जनजागृती केली. यावेळी शहर समन्वयक तुराब खान, स्वच्छता निरीक्षक श्रीकांत कुऱ्हा, न्यायरत घुगे हे उपस्थित होते.

## रग्णालयाकडे जाणारा रस्ताच बनला मृत्यूचा सापळा

**परभणी/प्रतिनिधी-** जिंतूर रस्त्यावरील वीज वितरण कंपनीच्या अधिक्षक अभियंत्यांच्या कार्यालयापासून स्त्री रुग्णालयाकडे जाणारा मुख्य रस्ताच अक्षरशः मृत्यूचा सापळा बनला आहे. पोकर्णा यांच्या सिमेंट पाईप फॅक्टरीजवळ स्त्री रुग्णालयाची भव्य इमारत उभी राहिली आहे. या नवीन इमारतीत हे रुग्णालय कार्यान्वितसुध्दा झाले आहे.

विशेषतः तत्कालीन जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी या रुग्णालयाच्या इमारतीचे काम दर्जेदार व्हावे व कमीत कमी वेळेत ते काम पूर्ण होवून या इमारतीत हे रुग्णालय कार्यान्वित व्हावे या दृष्टीने प्रयतांची पराकाष्टा केली. त्यामुळेच हे रुग्णालय स्थळालंतरीत होवून सुरळीतपणे सुरुही झाले. परंतु, रुग्णांसह रुग्णांच्या कुटूंबियांना या परिसरातील अनंत अडचणींना सामोरे जावे लागू लागले. विशेषतः जिंतूर रस्त्यावरील वीज वितरण कंपनीच्या अधिक्षक अभियंत्यांच्या कार्यालयाच्या संरक्षण भिंतीपासून आत पोकर्णा यांच्या फॅक्टरीपर्यंतच्या या अरुंद रस्त्यावरील बेसुमार अतिक्रमणे तसेच हजारो खड्डे व त्या खड्ड्यांमधून ये-जा करतांना होणारी आदळ आपट डोकेदुखीच बनली. त्या स्थितीत सुध्दा तत्कालीन जिल्हाधिकारी सौ. गोयल यांनी जिंतूर रस्त्यापासून ते स्त्री रुग्णालयापर्यंतच्या रस्त्यावरील दुतर्फा अतिक्रमणे महापालिकेस कठोर शब्दात सूनावून काढली. त्यासाठी दोन दिवस महापालिकेची यंत्रणा नाल्यापुढील किंवा नाल्यावरील अतिक्रमणे हटवितांना अक्षरशः नाकीनऊ आले. परंतु, अरुंद असा हा रस्ता खूला झाला खरा परंतु, या भागातील नागरीकांनी पुन्हा त्या त्या ठिकाणची जागा बळकावून अतिक्रमणे थाटली. आता हा रस्ता पुन्हा जैसे थे अवस्थेत आला. या रस्त्यावर आधीच खड्डेच खड्डे आहेत. त्या खड्ड्यांमधून चोवीस तास पाणी साचलेले आहे. दुतर्फा नाल्या पूर्णतः तुंबलेल्या आहेत. त्या नाल्यांची कधीच सफाई होत नाही. त्याचा परिणाम या भागात दुर्गंधीचे साम्राज्य कायम राहिले आहे. या पार्श्वभूमीवर सरकारी दवाखाना ते स्त्री रुग्णालयापर्यंतच्या रस्त्यावरील बेसुमार अतिक्रमणे महापालिका प्रशासनाने तात्काळ हटवावीत व खड्डेमय रस्त्याची डागडुजी करावी, अशी मागणी या भागातील सामाजिक कार्यकर्ते सय्यद अकबर अली यांनी केली आहे.



**जिंतूर- मुंबई येथे देवगिरी बंगल्यावर आदरणीय अजित पवार यांची भेट घेऊन संपूर्ण महाराष्ट्रात महायुतीने मिळालेल्या अभूतपूर्व यशाबद्दल दादांना शुभेच्छा दिल्या. यावेळी दादांनी विधानसभा सदस्य पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले.याप्रसंगी रामप्रसाद बोर्डीकर, दिनकर वाघ, प्रभाकर वाघीकर, पपु डोंबे, बाळासाहेब मते दिसत आहेत.**




## मानवत गट साधन केंद्राच्यावतीने जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा

**मानवत / प्रतिनिधी-** जागतिक दिव्यांग दिनानिमित्त मानवत गटसाधन केंद्र मानवत येथे लुई ब्रेल यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दिव्यांग दिन साजरा करण्यात आला.

तसेच गटशिक्षणाधिकारी मा.अमोल चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली मानवत केंद्रातील जिप शाखा २, शाखा ३, ईकरा उर्दू शाळा, नेताजी सुभाष प्राथमिक विद्यालय , के प्रा शाळा मानवत, द्वारकादास लड्डा इंग्लिश स्कूल, सरस्वती भाले पाटील विद्यालय मानवत, शकुंतलाबाई कांचनराव विद्यालय मानवत, जिप कन्या शाळा मानवत. सदरील शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांना चष्मे, गुलाबाचे फुल, पाण्याची बॉटल, चॉकलेट भेट देऊन शैक्षणिक शुभेच्छा देण्यात आले.तर शहरातील व्यापार पेठेत भव्य रॅली काढून जनजागर करण्यात आले.

## कृषि विद्यापीठ व प्रियदर्शनी महिला तंत्रशिक्षण मंडळ यांच्यात सामंजस्य करार



**परभणी,/प्रतिनिधी :** येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ आणि प्रियदर्शनी महिला त्तां शिक्षण मंडळ, श्रीराम पूर यांच्यात कौशल्य विकासाच्या विविध योजनांच्या मार्गदर्शनासाठी आणि समन्वयासाठी कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांच्या अध्यक्षतेखाली आणि कौशल विकास रोजगार उद्योजकतच्या छत्रपती संभाजीनगर येथील उपायुक्त श्रीमती विद्या शितोळे यांच्या समन्वयाने २९ नोव्हेंबर रोजी सामंजस्य करार करण्यात आला.

या सामंजस्य कराराच्या माध्यमातून पंतप्रधान कौशल्य विकास योजना ४.० अंतर्गत कौशल्य आधारित प्रशिक्षण, मूल्यमापन आणि प्रमाणन या गोष्टींवर लक्ष केंद्रित केले जाईल. या उपक्रमाचा उद्देश युवकांना कौशल्य विकासाच्या माध्यमातून रोजगाराच्या आणि उद्योजकते बाबत कृषीशी संबंधित निवडक विषयात शिक्षण देवून सक्षम ीकरण करणे आहे. करारावर वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या वतीने विस्तार शिक्षण संचालक डॉ. भगवान विठ्ठलराव असेवार यांनी स्वाक्षरी केली, तर प्रियदर्शनी महिला त्तां शिक्षण मंडळाच्या वतीने अध्यक्ष नंदकुमार रामनाथ धनवटे यांनी सह्या केल्या.

प्रियदर्शनी महिला त्तां शिक्षण मंडळ, श्रीरामपूर (जि. अहिल्यानगर) यांच्या प्रयतांतून आणि कृषी विद्यापीठाच्या पाठिंब्यामुळे विद्यार्थ्यासाठी कौशल्य विकासाच्या नवीन संधी उपलब्ध होतील. सदर सामंजस्य करारामुळे दोन्ही संस्थांनी एकत्र येऊन कौशल्य विकासाच्या क्षेत्रात नाविन्य उपक्रम राबविले जाणार असून विद्यार्थी आणि युवकांचे सक्षमीकरण साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यावेळी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, कुलसचिव संतोष वेणीकर, मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी डॉ. प्रशांत देशमुख, डॉ. मदन पेंडके, संस्थेचे सचिव प्रफुल्ल वासवे, परभणी येथील कौशल विकास रोजगार उद्योजकता सहाय्यक आयुक्त पी. एस.खंदारे आणि परभणी जिल्ह्याचे कौशल्य विकास समन्वयक दीक्षित आदी उपस्थित होते.



## आ.विटेकर यांच्याहस्ते विकास कामांचे भुमिपूजन

**परभणी,/प्रतिनिधी-** शहरातील खानापूर येथे सिमेंट रोड व नाली बांधकामाचे भूमिपूजन पाथरी मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार राजेश विटेकर यांच्या हस्ते दिनांक ०२ डिसेंबर सोमवार रोजी सायंकाळी ७ वाजता संपन्न झाले.

जिल्हा नियोजन विकास निधी अंतर्गत हि विकासकामे परभणी शहराचे प्रथम महापौर प्रताप भैय्या देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहेत. त्यामुळे खानापूर परिसरातील नागरिकांना अंतर्गत दळणवळण करण्यासाठी चांगली सोय उपलब्ध होईल. बऱ्याच वर्षा नंतर खानापूर मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या माध्यमातून व माजी नगर सेवक राजू शिंदे यांच्या पुढाकारातून विकास निधी उपलब्ध झाला आहे. खानापूर मध्ये ४ कोटी रुपयांचा विकास कामाचा शुभारंभ या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे औचित्या साधून पाथरी विधानसभा विजयाबद्दल खानापूर वासीयांच्या वतीने आ.राजेश विटेकर यांचे अभिनंदन करून सत्कार करण्यात आला. यावेळी प्रथम महापौर प्रताप भैया देशमुख, मा.नगर सेवक राजू शिंदे, शंकरराव भागवत, प्रा. रामेश्वर आवरगंड, सुरेश काळे, सुरेंद्र रोडगे, सुदाम तुपसुंदरे, संजय कदम, माऊली मोहिते, बलिरामजी मोहिते, बाळासाहेब शिंदे, माऊली काळे, बालाजी मोहिते, पांडुरंग शिंदे, गोपाळ शिंदे नंदू राऊत मारुती राऊत वशिष्ठ शिंदे आदी बहुसंख्य परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# हिंगोली जिल्हा परिषदेत लिफ्ट बंद दिव्यांगांची होतेय हेळसांड

## अनेकवेळा प्रशासनाला निवेदन देऊनही लिफ्ट सुरू होईना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ डिसेंबर**
येथील जिल्हा परिषदेमध्ये लाखो रूपये खर्च करून लिफ्ट बसविण्यात आली आहे. परंतु ही लिफ्ट सुरूच नसल्यामुळे येथे येणाऱ्या दिव्यांगांची हेळसांड होत आहे. मंगळवारी काही दिव्यांग बांधव जिल्हा परिषदेत गेले असता ही लिफ्ट बंद असल्यामुळे त्यांना पायऱ्यावरून वरच्या मजल्यावर जावे लागले. अनेकवेळा जिल्हा परिषद प्रशासनाला लिफ्ट सुरू करण्यासंदर्भात निवेदने दिली परंतु याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप दिव्यांग बांधवांनी केला आहे.

हिंगोली जिल्हा परिषदेत तीन वर्षापूर्वी दिव्यांगांसाठी लिफ्ट बसविण्यात आली. काही दिवस ही लिफ्ट सुरू असल्याचे बोलले जाते परंतु त्यानंतर बिघाड झाल्यामुळे मागील अनेक महिन्यांपासून लिफ्ट बंद अवस्थेत आहे. यासंदर्भात दिव्यांग बांधवांनी जिल्हा परिषद प्रशासनाला लिफ्ट सुरू करण्यासाठी निवेदने दिली होती. काही महिन्यांपूर्वी लिफ्ट दुरूस्तीसाठी तंत्रज्ञांना पाचारणही करण्यात आले होते परंतु लिफ्ट सुरू झाली नाही. कुठे पाणी मुरत आहे हे अद्यापही दिवयांग बांधवांना कळाले नाही.

हिंगोली जिल्हा परिषद सध्या अनेक कारणांमुळे चर्चेत येत आहे. जलजीवन मिशनची निकृष्ट झाल्याचा आरोप, औंढा पंचायत समितीमध्ये चौकशीआधी लागलेली आग आणि त्यामध्ये संगणक आणि महत्वाचे दस्तावेज जळून खाक झाल्याची घटना, काही दिवसांपूर्वी जिल्हा परिषदेत लागलेली आग आदीमुळे उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे.

त्यातच दिव्यांगासाठी लाखो रूपये खर्च करून बसविण्यात आलेली लिफ्ट बंद अवस्थेत आहे. जिल्हा परिषदेत ग्रामीण भागातून शेकडो लोक कामासाठी येतात. त्यामध्ये वृध्द, दिव्यांगांचाही समावेश असतो. दिव्यांग व्यक्तींना वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटावयास जाण्यासाठी लिफ्ट बसविण्यात आली आहे. परंतु लिफ्ट बंद असल्यामुळे त्यांना पायऱ्या चढून भेटावयास जावे लागत आहे. शासनाने दिव्यांगांसाठी खास व्यवस्था केली आहे परंतु याकडे जिल्हा परिषद प्रशासन सोयीस्करपणे दुर्लक्ष करीत आहे. मंगळवार दि ३ डिसेंबर रोजी दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष तसेच काही पदाधिकारी जिल्हा परिषदे येथे गेले असता त्यांना लिफ्ट बंद असल्यामुळे पायऱ्यावरून जावे लागले. यावेळी दिव्यांग बांधवांनी तीव्र संताप व्यक्त करीत तत्काळ लिफ्ट सुरू करण्याची मागणी केली आहे. अशीच अवस्था जिल्हाधिकारी कार्यालयातील लिफ्टची असल्याचे दिव्यांग बांधवांनी सांगितले आहे.

# संविधान दिनानिमित्त जागर लोकशाहीची कार्यक्रम संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ३ डिसेंबर**
दरवर्षी प्रमाणे याही वर्षी पूर्णा प्रकल्प वसाहत येथे ७५ व्या भारतीय संविधान गौरव दिना निमित्त जागर लोकशाहीचा कार्यक्रम साजरा करण्यात आला असून सामाजिक कार्यकर्ते आनंद खरे मागील आठ वर्षापासून अखंडितपणे संविधान गौरव दिना निमित्त विविध उपक्रम राबवून कार्यक्रम साजरा करतात.

याही वर्षी दिनांक ३० नोव्हेंबर रोजी आयोजित केला होता कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. रमेश मानवते हे होते, कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. विठ्ठल कांगणे सर हे उपस्थित होते. गायिका तेजस्विनी पांडवीर यांचा भीम गीतांचा कार्यक्रम पार पडला. कुमारी प्रज्ञा आनंद खरे हिने संविधान प्रस्तावनेचे वाचन केले. डॉ. कुंटे यांनी सूत्रसंचालन केले, प्रमुख पाहुणे म्हणून वैद्यकीय अधीक्षक डॉ. गंगाधर काळे, शासकीय गुत्तेदार यंशवंतराव उबारे,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बाळासाहेब अटकोरे, ग्रामसेवक संघटनेचे तालुका अध्यक्ष बाळासाहेब कदम, पोलीस निरीक्षक कुंदनकुमार वाघमारे, कनिष्ठ सहाय्यक प.स.नारायण एंगडे, प्रा.शिक्षण आशिष मगर, माजी नगरसेवक राजूदादा एंगडे,सामाजिक कार्यकर्ते युवराज आवटे, सुरेश दवणे, बालाजी डांगरे,महाराष्ट्र पोलीस गजानन भोपे,सरपंच भीमराव कांबळे, सरपंच राजकुमार एंगडे, पत्रकार अनिल पंडित, नागराज एंगडे, नागेश चव्हाण, कृष्णा देवणे नंदू परदेशी आदीची उपस्थिती होते, कार्यक्रमास विशेष सहकार्य उमाकांत कांबळे व देवा मोरे यांनी केले तर संयोजक संजय वाटोरे, मनोज ओवे, हर्षद आझादे, अनिल जोंधळे, नवनाथ घाते,राहुल धायजे, यशवंत थोरात, विजय दातार, हर्षद खरे, आनंद आवटे, प्रज्वल मोरे, धम्मपाल काळे,राजू गायकवाड, विनोद एंगडे, पंकज लांडगे व कपिल सूर्यवंशी यांनी केले.

# पंचायत समितीतील कॅशबुक, संगणक जळून खाक

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, ३ डिसेंबर**
येथील पंचायत समिती लेखा विभागांमध्ये दि. १ डिसेंबर रोजी शॉर्ट सर्किट मुळे आग लागली अशी तक्रार लेखा विभागाकडून औंढा नागनाथ पोलीस ठाण्यात दिली असून याबाबत स्थळ पंचनामा करण्यात आला. परंतु शॉर्टसर्किटमुळे लेखा विभागातील कागदपत्रे जळाली. याबद्दल मात्र चविष्ट चर्चा होत आहे.

सविस्तर असे की शामराव राऊत राहणार अंतुलेनगर हिंगोली यांचे ९ सप्टेंबर २०२४ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय (विकास) छत्रपती संभाजी नगर यांना प्राप्त पत्रावरून औंढा नागनाथ सेनगाव पंचायत समिती लेखा विभागात बांधकामाचे देयकातून शासकीय कपात रक्कम, विमा, कामगार कल्याण निधी, आयकर, रॉयल्टी, जीएसटी, इतर शासकीय वसुली लेखा विभागातील कर्मचाऱ्यांनी गेल्या पाच आर्थिक वर्षापासून अपहारन केल्याचे नमूद केले. शासकीय रकमेचे धनादेश बँकेच्या नावाने देऊन त्यासोबत खाजगी व्यक्तींच्या नावाची यादी लावून रकमा खाजगी व्यक्तींच्या खात्यात जमा केल्या. शासकीय अभि लेख्यात बोगस चलन तयार करून लावली. या शासकीय चलनाचाकोषागारकार्यालयासोबत ताळमेळ घातल्यास या बाबी निश्चित सिद्ध होतात. सदरील प्रकरणाची चौकशी करण्यासाठी १५ नोव्हेंबर २४ रोजी एस वाय गोबाडे कनिष्ठ सहाय्यक लेखा विभाग यांना जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी लेखा विभागाकडून पत्र देऊन चौकशी करण्याचे आदेश दिले. परिणामी औंढा नागनाथ पंचायत समितीमध्ये संबंधित अधिकारी चौकशी करण्यासाठी २९ नोव्हेंबर रोजी उपस्थित झाले असता लेखा विभागातील शर्मा उपस्थित नाहीत त्यामुळे आज दस्तऐवज पाहायला मिळणार नाहीत असे सांगून त्यांना परत पाठवले. त्यानंतर पंचायत समितीच्या लेखा विभागात शॉर्टसर्किट मुळे आग लागल्याची तक्रार औंढा नागनाथ पोलीस स्टेशनला देऊन पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी स्थळ पंचनामा केला. औंढा नागनाथ पंचायत समिती लेखा विभागामध्ये आग लागली की लावण्यात आली हा मुद्दा सध्या चविष्ट चर्चिला जात असून २०१९-२०,२०२०-२१, २०२१- २२, २०२२-२३, २०२३-२४, या आर्थिक वर्षात कोट्यावधी रुपयाचा विविध प्रकारे निश्चितच अपहार झाल्याचे चौकशी अंतीसिद्ध होणार होते परंतु आता झालेल्या शॉट सर्किट मुळे लागलेल्या आगीत संबंधित दस्तऐवज जळाल्याने प्रकरण कोणत्या दिशेने जाते हे पाहणे खरोखर मजेशीर होणार आहे. गेल्या पाच वर्षाच्या अपहार प्रकरणांमध्ये कोणकोणते अधिकारी व कर्मचारी सहभागी आहेत हे दिसून आल्यानंतर त्यांच्यावर काय कार्यवाही होते हा मात्र खूप कुतूहलाचा विषय बनला आहे.

# रामलीला मैदानावरील गिट्टी खेळाडूंसाठी ठरतेय डोकेदुखी

## महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष, नागरिकांमध्ये संताप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ डिसेंबर**
हिंगोली शहरातील रामलीला मैदानावर आयोजित केलेल्या दसरा महोत्सवाच्या तयारीसाठी समितीप्रशासनाने चिखल होऊ नये म्हणून संपूर्ण मैदानावर गिट्टी टाकली होती. मात्र महोत्सव संपल्यानंतरही गिट्टी हटविण्यात न आल्याने खेळाडू आणि मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या नागरिकांसाठी हे मैदान आता डोकेदुखीचे कारण बनले आहे. मैदानभर गिट्टी असल्यामुळे आता हे मैदान एका कच्च्या रस्त्यासारखे दिसत आहे.

हिंगोलीतील दसरा महोत्सव हा देशभरात दुसऱ्या क्रमांकाचा महोत्सव म्हणून ओळखला जातो. सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या मार्फत याचे आयोजन करण्यात येते. या महोत्सवातून मिळणाऱ्या महसुलावरच महोत्सवातील कार्यक्रमांचे नियोजन होते. यावर्षी पावसाळ्यात होणाऱ्या कार्यक्रमांसाठी चिखल होऊ नये, म्हणून मैदानभर गिट्टी टाकण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, कार्यक्रम काळात पावसाचा एकही थेंब न पडल्यामुळे या गिट्टीचा उपयोग काहीच झाला नाही.

महिन्याभरानंतरही गिट्टी कायम
दसरा महोत्सव संपून जवळपास एक महिना उलटला आहे, पण अजूनही मैदानावरील गिट्टी हटवण्यात आलेली नाही. त्यामुळे या मैदानावर खेळणाऱ्या खेळाडूंना आणि फिरण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. गिट्टीमुळे मैदानावर व्यवस्थित चालणेही कठीण झाले आहे. नागरिकांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

शौचालयासाठी होतोय गैरवापर
मैदानाभोवती उभारण्यात आलेल्या सुरक्षा भिंतीवर आठ ठिकाणी गेट बसविण्यात आले आहेत. मात्र, बहुतेक गेटला कुलूप नसल्याने काही नागरिक या मैदानाचा शौचालय म्हणून वापर करत आहेत. त्यामुळे मैदानात अस्वच्छता वाढली आहे. रात्रीच्या वेळेला मैदानात काही तळीराम मद्यप्राशन करून त्याठिकाणी कचरा करीत आहेत.

हायमास्ट दिवे बंद, कचऱ्याचे ढीग
मैदानात लावण्यात आलेल्या हायमास्ट दिव्यांपैकी पाच ते सहा दिवे बंद आहेत. तसेच, गिट्टीमुळे खेळाडू मैदानात येत नसल्याने काही लोक या ठिकाणी कचरा टाकत आहेत. मैदानाच्या कोपऱ्याकोपऱ्यात कचऱ्याचे ढीग दिसत आहेत. नागरिकांनी प्रशासनाकडे मैदानातील गिट्टी लवकरात लवकर हटवून, खेळाडू आणि नागरिकांसाठी मैदान पूर्ववत सुरू करण्याची मागणी केली आहे. शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या या मैदानात लाखो रूपये खर्च करून वॉकसाठी ट्रॅक तयार करण्यात आले होते परंतु महसुल प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या मैदानाची सध्या दयनीय अवस्था झाली आहे.

## संक्षिप्त वृत्त

### नवउद्योजक लाभार्थ्यांनी मार्जिन मनी योजनेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

हिंगोली- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष भारत सरकार आणि राज्य शासन साजरे करीत आहे. यामध्ये केंद्र शासनाने सन-२०१५ मध्ये स्टँड अप इंडिया ही योजना घोषित केली आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाच्या घटकातील नवउद्योजक लाभार्थ्यांची मार्जिन मनी भरण्याची क्षमता नसल्यामुळे या नवउद्योजक लाभार्थ्यांना एकूण प्रकल्प किंमतीच्या लाभार्थी हिश्श्यातील १५ टक्के मार्जिन मनी उपलब्ध करुन देण्याची योजना सुरु करण्यात आली आहे. जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील इच्छूक पात्र नवउद्योजक व्यक्तींनी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी विहित नमुन्यात तीन प्रतीत प्रस्ताव सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, हिंगोली यांचे कार्यालयात सादर करावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, हिंगोली यांनी केले आहे.

### औंढा पोलिसांकडून पंचायत समिती कार्यालयातील आग प्रकरणाचा पंचनामा



औंढा नागनाथ- औंढा नागनाथ येथील पंचायत समिती कार्यालयाच्या लेखा विभागाला शॉर्ट सर्किट मुळे दि एक डिसेंबर रविवार रोजी रात्री आठ वाजे दरम्यान आग लागली. यामध्ये संगणक सह महत्त्वाचे दस्तावेज जळाली असून परिसरात लागलेल्या आगीची उलटसुलट चर्चा सुरू आहे. दरम्यान दिनांक २ डिसेंबर सोमवारी रोजी दुपारी एक वाजे दरम्यान पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जीएस राहीरे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार मोहम्मद शेख, ज्ञानेश्वर गोरे यांनी पंचनामा केला.यावेळी गटविकास अधिकारी गोपाळराव कलारे, सहाय्यक गटविकास अधिकारी बालाजी गोरे, लेखा विभागाचे कर्मचारी ईंगोले आदी कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान पंचायत समितीचे कार्यालयाच्या लेखा विभागाला आग लागल्याने संगणक असे महत्त्वाचे दस्तावेज जळाल्यामुळे कार्यालयाच्या परिसरात उलटसुलट चर्चा उधाण आल्याचे दिसून आले.

### ३२ वाहनचालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली- जिल्ह्यात अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३२ वाहनचालकांविरूध्द पोलिसांनी कारवाई केली असून त्यांच्याकडून २४९५० रूपये दंड वसूल केला.

# ६ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर शहर पोलिस ठाण्यात शांतता समितीची बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ डिसेंबर**
येत्या ६ डिसेंबर शुक्रवार असलेला महापरिनिर्वाण दिन इतर कार्यक्रम साजरे होणार आहेत. या निमित्ताने शांतता व सुव्यवस्था कायम राहावी यासाठी शहर पोलीस ठाण्याच्या वतीने शहरातील विविध जाती-धर्माच्या प्रमुख लोकांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

हिंगोली शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक पार पडली, यावेळी पो.नि. पाडळकर यांनी उपस्थितांना आवाहन करतांना सांगितले की, सर्व जाती-धर्माच्या लोकांनी सणउत्सव साजरे करताना प्रत्येक जाती-धर्माच्या लोकांच्या भावनांचा आदर करावा कोणाच्याही धार्मिक भावना दुखावतील असे वर्तन करू नये. सोशल मीडियाचा जपून वापर करावा पोलीसांची नजर या माध्यमांवर आहे. कोणत्याही अफवा पसरवून नये असे आवाहन करीत सर्व जाती धर्माच्या लोकांनी कायद्याच्या चौकटीत राहून सण-उत्सव साजरे करण्याचे आवाहन केले.

यावेळी मधुकर मांजरमकर, प्रकाश इंगोले, यू.एच.बलखंडे, नेहाल भैय्या, शे.नईम शे.लाल, अ.हकीम बागवान आदींची उपस्थिती होती.

# दोन खेळाडूंची राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ डिसेंबर**
क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पूणे व जिल्हा क्रीड़ा अधिकारी कार्यालय धुळे यांच्या संयुक्त विदयमाने व कराटे डू असोशिएशन ऑफ महाराष्ट्र सचिव श्री संदिप गाडे यांच्या तांत्रीक सहकार्याने धुळे जिल्हा क्रीडा संकुल इनडोअर हॉल येथे शालेय राज्यस्तरीय स्पर्धा संपन्न झाल्या.

या प्रसंगी आ. मंजुळाताई गावीत, जिल्हा क्रीडाअधिकारी अविनाश टिळे , सल्लाउद्दीन अन्सारी अध्यक्ष व संदिप गाडे सचिव कराटे डु असो.ऑफ महाराष्ट्र, गोपाल इसावे अध्यक्ष स्पोर्ट्स कराटे असोसिएशन हिंगोली, संतोष नांगरे सचिव हिंगोली जिल्हा स्पोर्ट्स कराटे डो असो. हिंगोली, सेन्साई मनोज पतंगे ,शेख मोईन यांच्या सह राज्यातील अधिकृत पंच उपस्थीत होते..

शालेय जिल्हास्तरीय व विभागस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त करूण १४ वर्षा आतील गटात दिप साळवे ,कु. तबस्सुम फातेमा पठाण तर १७ वर्षा आतील गटात श्रध्दा बाबाराव नवघरे या खेळाडुंनी गोल्ड मेडल मिळवुन शालेय राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत त्यांची निवड झाली होती.

दीप साळवे १४ वर्ष वयोगट वजन गट २५ ते ३० पोद्दार इंटरनॅशनल स्कुल ,हिंगोली याने ब्रांझ मेडल,. तबस्सुम फातेमा पठाण १४ वर्षे वयोगट २६ ते ३० वजन गट सत्यनारायण स्कुल हिंगोली सिल्व्हर मेडल तर श्रधा बाबाराव नवघरे १७ वर्षा आतील वयोगटात व ५६ ते ६० किलो वजन गटातील हु. बहिर्जी स्मारक विद्यालय वसमत सहभाग प्रमाणपत्र मिळवुन यश संपादन केले. करिता

जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश्वर मारावार, क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर, गणेश बोडखे, निळकंठ श्रावण, जिल्हा संघटनेचे अध्यक्ष गोपाल इसावे, सचिव संतोष नांगरे यांच्या सह विजय डोंगरे क्रीडा शिक्षक रामप्रसाद व्यवहारे अथलेटिक सचिव रमेश गंगावणे, सायकलिंग असोसिएशन सचिव शिवाजी इंगोले, संगणक चालक वसीम शेख व क्रीडा क्षेत्रातील आदीनी कौतुक केले. खेळाडूंना मार्गदर्शन कराटे मास्टर गोपाल ईसावे यांचे लाभले.

# ब्रम्हवाडी येथून अवैध वाळू उपसा, महसुल प्रशासन झोपेत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ डिसेंबर**
सेनगाव तालुक्यातील ब्रम्हवाडी येथील पूर्णा नदीच्या पात्रातून दररोज राजरोसपपणे ट्रॅक्टर, टिप्परने अवैध वाळूचा उपसा होत आहे. शासनाचा कोट्यावधी रूपयांचा महसून बुडत असून सेनगाव महसुल विभाग आणि पोलिस प्रशासन याकडे डोळेझाक करीत असल्याचे दिसत आहे.

जिल्ह्यात सेनगाव, औंढा, कळमनुरी या भागातून सध्या मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा होत आहे. शासनाचा कोट्यावधी रूपयांचा महसूल बुडत आहे. वाळू माफीया राजरोसपणे नदीच्या पात्रातून प्रमाणापेक्षा जास्त वाळू उपसा करीत असून लाखो रूपयांची कमाई करीत असतांना दिसत आहे.

सेनगाव तालुक्यातील ब्रम्हवाडी येथील पूर्णा नदीच्या पात्रातून दररोज मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा केल्या जात आहे. सदरील वाळू टिप्परद्वारे जिंतुर, रिसोड, वाशिम, हिंगोली आदी भागात वाहून नेली जात आहे. दिवसाढवळ्या या नदीच्या पात्रातून वाळू उपसा होत असून महसून प्रशासन आणि पोलिस विभाग यांचे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे. जिल्ह्यात अवैध वाळू माफीयांचे जाळे चांगलेच पसरले असून त्यांना राजकीय संरक्षण मिळत असल्याची जोरदार चर्चा होत आहे.